# ।। अगाध बोध ग्रंथ ।।
# मारवाडी + मराठी
# सत्संग

महत्वाची सुचना:– रामद्वारा जळगांव यांचे असे निदर्शनास आले आहे की,काही रामस्नेही शेठ साहेब राधाकिसनजी महाराज व जे.टी.चांडक यांनी अर्थ केलेल्या वाणीजी रामद्वारा जळगांव मधून घेऊन जातात व आपल्या वाणीजीचा गुरु महाराज सांगतात तसा पुर्ण आधार न घेता आपल्या मताने समजने,अर्थामध्ये परस्पर बदल करुन टाकतात तरी वाणीजी घेऊन गेलेल्या कोणत्याही संताने परस्पर अर्थामध्ये बदल करु नये.काहीही बदल करायचा वाटत असल्यास रामद्वारा जळगांवशी संपर्क साधावा व नंतर बदल करावा.

✻ वाणीजी आमच्याकडून जशी पाहिजे तशी चेक झालेली नाही,चेक करायला भरपूर वेळ लागतो.आम्ही परत चेक करुन पुन्हा लोड करुन देऊ.याला वर्षभर तरी लागेल. तुमच्या समजण्यापुरता कामात येईल,यासाठी आम्ही वाणीजी वाचण्याकरीता लोड करुन दिली आहे.

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

## ।। अथ अगाध बोध ग्रंथ लिखंते ।।

।। चोपाई ।।

सतस्वरूप निजनाव ।। केवल पद गुरूदयाल ।।
सतगुरू प्रणामं प्रम गते ।। बेरागं प्रम भागं ।।
संतोषं प्रम धनं ।। कुल गिनान तजे निरंतर ।।
सो जोगी नमो नमस्ते ।। सतस्वरूप: केवळ पद ।।
अखंडाय नमस्ते नमस्कारं क्षगत: ।।

सतस्वरुप,निजनाव,कैवल्यपद,काय तर गुरुदयालच म्हणजे तनधारी सतगुरुच अशा सतगुरुला प्रणाम केल्याने परमगती मिळते ज्या जोगीने होणकाळ कुळाचे म्हणजे माया माता आणि ब्रम्ह पित्याचे ज्ञान नेहमी करीता सोडून दिले आहे आणि ज्या योगीत परमभाग्य प्रगट करणारे सतस्वरुप वैराग्य प्रगट झाले आहे आणि संतोष हे परमधन प्रगट झाले आहे अशा योगीला नमस्कार आहे सतस्वरुप केवलपद अशा योगीला अखंडित म्हणजे नेहमी करीता नमस्कार आहे कधीही न मिटणारा नमस्कार आहे.

।। चोपाई ।।

ग्यानी सरब भरम मे भूला ।। से मुज नाय पिछाणे ।।
उलटी करे निंद्या जग माही ।। निरणो छाण न आणे ।।१।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,अशाचप्रकारे माझ्यात सतस्वरुप ओतप्रोत प्रगट झाला आहे व माझ्यात माया व ब्रम्हचा अंश थोडासाही राहीला नाही अशा अस्सल योगीची म्हणजे सतस्वरुपाची सत्ता माझ्यात आल्यावर ही मायेचे आणि ब्रम्हचे ज्ञानी मायेच्या भ्रमात विसरुन गेल्यामुळे माझ्यात सतस्वरुप ओतप्रोत प्रगटला आहे या भावाने नाही ओळखत मायेचे ज्ञानी सतस्वरुप ही माया आणि ब्रम्हचा आधार आहे हे जाणतात आणि तोच सतस्वरुप माझ्यात ओतप्रोत आला आहे याचे ज्ञान समजने पारखून निर्णय करत नाही.याकारणाने माझी म्हणजे माझ्यात प्रगट झालेल्या अस्सल सतस्वरुपाची स्तुती तर करत नाही उलट मला जीव आणि माया समजून माझ्यात प्रगट झालेल्या सतस्वरुपाची निंदा करतात.।।१।।

बेद भेद लग हे बुध सबमे ।। प्रा ब्रम्ह लग सोई ।।
सतस्वरूप कु कोई न जाणे ।। ग्यानी ध्यानी लोई ।।२।।

या सर्व ज्ञानी,ध्यानींची बुध्दी वेद म्हणजे ब्रम्हा,भेद म्हणजे शंकर व जास्तीत जास्त होणकाळ पारब्रम्ह पर्यंतच आहे म्हणून होणकाळ पारब्रम्हच्या पलिकडचा सतस्वरुप काय आहे व त्याला कसे ओळखावे हे ज्ञानी जाणत नाही. ।।२।।

ब्रम्ह ब्रम्ह लग सब ने गायो ।। साधाँ सिधाँ से कोई ।।
सतस्वरूप आनंद पद कहीये ।। सो इण आगे होई ।।३।।

सर्व साधु(सनकादिक,नारद,सुकदेव,दत्तात्रय) व सिध्द (कपील,गोरक्षनाथ,मच्छिंद्रनाथ) या सर्वांनी होणकाळ पारब्रम्ह पर्यंतचे गायन केले आहे या कारणाने यांना होणकाळ पारब्रम्ह पर्यंतच्या पदांचीच प्राप्ती झाली होणकाळ पारब्रम्हच्या पुढच्या सतस्वरुप आनंदपदाची प्राप्ती नाही झाली या कारणाने होणकाळ पारब्रम्हच्या पुढचे सतस्वरुप पद हे साधु, सिध्द जाणत नाही. ।।३।।

**नही नही दोस ग्यान कू भाई ।। कुद्रत कळा न जाणे ।।**
**करणी सकळ जक्त की बंधण ।। ता कु ताण बखाणे ।।४।।**

हे ज्ञानी करणी म्हणजे त्रिगुणी मायेपर्यंतचेच ज्ञान जाणतात.ही माया सर्व जगाच्या जीवांना कर्म करवून होणकाळात बांधून ठेवते.हे ज्ञानी अशा मायेच्या करण्यांना ज्या होणकाळात बांधून ठेवतात,त्याची स्वत: भक्ती करतात आणि वाढवून वाढवून जोर देऊन जगात त्या भक्तीचे वर्णन करतात हे माया आणि पारब्रम्हच्या पलिकडील महासुखाची कुद्रतकला जाणतच नाही म्हणून कुद्रतकलेची भक्ती करत नाही व त्याचे ज्ञान जगात वर्णन करीत नाही. ।।४।।

**ब्रम्हा बिसन महेसर सक्ती ।। ज्याँ अे बंधन दीया ।।**
**सत बेराग बिना नही तूटे ।। ब्हो बिध गाढा कीया ।।५।।**

तरीही हे ज्ञानी निर्दोष आहेत हे बंधन ब्रम्हा,विष्णु,महादेव व शक्ती या देवतांनी जगात बांधले आहेत जीव होणकाळातच रहावे,होणकाळापासून सुटू नये म्हणून ब्रम्हा,विष्णु, महादेव व शक्ती या चारींनी हे सर्व बंधन जगात निर्माण केले त्रिगुणीमायेच्या सुखाच्या इच्छेत जगाचे जीव व ज्ञानी,ध्यानी व जगाचे जीव घटात सतवैराग्य प्रगट करीत नाही तोपर्यंत तुटत नाही शक्तींची कितीही भक्ती केली तरीही हे बंधन तुटत नाही उलट आणखी घट्ट होतात हे बंधन सतवैराग्य प्रगट केले तरच तुटतात. ।।५।।

**नही नही दोस ज्हान कू भाई ।। अे ग्यानी सबे बिचारा ।।**
**तीन ताप मे सब ही बंधिया ।। कोई नही छूट न हारा ।।६।।**

जगाचे जीव व ज्ञानी,ध्यानी हे सर्व तीन तापात अटकले आहेत हे मन,तन तसेच येऊन येऊन पडणाऱ्या तापात बांधले आहेत या तापांमधुन निघण्याकरीता नव्या-नव्या मायेच्या करण्या नेहमीच धारण कराव्या लागतात या कारणाने ब्रम्ह,विष्णु, महादेव आणि शक्ती ने बनविलेल्या मायेच्या करण्यांच्या बंधनाने जगातील जीव आणि ज्ञानी ध्यानी मुक्त होत नाही याकारणाने हे ज्ञानी,ध्यानी तसेच संसाराचे जीव दोषी आहे असे म्हणता येत नाही. ।।६।।

**क्यू कर लखे अगम गत भाई ।। कहीयां किस बिध माने ।।**
**काना सुणी न आंख्याँ देखी ।। ना सत बेद बखाणे ।।७।।**

अगम देशात अनंत सुख आहेत त्या देशात मन,तन व येऊन येऊन पडणारे आधी, व्याधी,उपाधी असे तीन तापाचे दु:ख मागितल्यावर ही नाही आहेत हे सांगितल्यावर ही हंस मानत नाही असा सुखाचा देश आहे हे आजपर्यंत कानांनी ऐकला नाही व डोळ्यांनी पाहीले नाही आणि जे ज्ञान नेहमी ऐकतो व वाचतो असे वेद, शास्त्र,पुराण हे ही त्या सतदेशाचे वर्णन ही करीत नाही याकारणाने मी सांगितले तरी ही जग आणि ज्ञानी, ध्यानींना ही अगम गती समजत नाही. ।।७।।

**नही नही दोस किसी कू भाई ।। ओ इच्रज माडाँ होई ।।**
**सतस्वरूप आनंद पद कहिये ।। आगत लखे न कोई ।।८।।**

सतस्वरुप आनंदपद म्हणजे महासुखांचे आश्चर्याचे पद म्हणजे जे सुख नकल रुपात ही जगात मिळत नाही असे पद प्रगट झालेला मांडाच संत असतो म्हणजे मुश्किलने एखादाच संत असतो म्हणून जगाचे ज्ञानी,ध्यानी व लोक सतस्वरुप आनंदपदाची गती जाणत नाही हे सतस्वरुप आनंदपदाचे ज्ञान जागो जागी नसल्या कारणाने सर्व जगातील लोक,ज्ञानी, ध्यानी या आनंदपदाच्या गतीला समजू शकत नाही म्हणून यांना कोणालाही दोष नाही. ।।८।।

**केवळ बीज सत ओ मारग ।। स्हेज सता घट जागे ।।**
**उलटर हंस चढे गढ ऊपर ।। ध्यान समाधी लागे ।।९।।**

उलट हे केवळ बीज म्हणजे सत प्राप्त करण्याचा मार्ग सहज आहे सतस्वरुप आनंद पदाची गती जाणणारे सतगुरुच्या अनुसार विधी केल्यावर हंसाच्या घटात आनंदपदाचे केवळ बीज सहाजात प्रगट होऊन जाते त्या सत्तेच्या पराक्रमाने हंस संखनाळेकडून उतरुन बंकनाळेने उलटतो बंकनाळेने उलटून दहाव्याद्वाराच्या गडावर चढून जातो तेथे त्याला सहज ध्यान समाधी सदा करीता अखंडित लागून जाते.।।९।।

**आ गत सुणे न जाणे जागी ।। ज्या गढ पवन चडाया ।।**
**सुर्गुण निर्गुण कहो क्या जाणे ।। राज जोग की भाया ।।१०।।**

ज्या योगीने पवन भृगुटीत चढवला आहे व भृगुटीच्या गडावर निवास केला आहे असा योगी राजयोगीची म्हणजे सतशब्दाची गती जाणत नाही राजयोगी सतशब्दाची ध्वनी ऐकतो तशी ध्वनी पवनयोगीला ऐकू येत नाही म्हणून तो पवनयोगी राजयोगीला जाणत नाही इतकेच नाही अशा राजयोगीला सगुण म्हणजे माया व निर्गुण म्हणजे होणकाळ पारब्रम्ह हे दोन्ही ही जाणत नाही तर सगुण भक्तीवाले आणि निर्गुण भक्तीवाले या राजयोगाची गोष्ट काय जाणतील? ।।१०।।

**ग्यानी अरथ माय सो जोवे ।। ओ अरथाँ सूं न्यारा ।।**
**क्यू कर मिले पिंडत कु साहेब ।। सतस्वरूप बिचारा ।।११।।**

हे ज्ञानी पंडित सतस्वरुपाला वेदाच्या करण्यांमध्ये शोधतात वेदाच्या करण्या ह्या माया आहे सतस्वरुप अमर आहे म्हणून मायेहून वेगळा आहे पंडित ज्ञानी मायेच्या करण्या करुन सतस्वरुप शोधण्याचा प्रयत्न करतात.सतस्वरुप मायेहून वेगळा असल्या कारणाने पंडित ज्ञानींना मायेच्या करण्यांनी तो प्राप्त होत नाही. ।।११।।

**अेतो सकळ भ्रम कर जाणे ।। निज रूप के ताई ।।**
**मुख सुं कहे प्रम पद सत्त हे ।। पण पाया समझे नाही ।।१२।।**

सतस्वरुप म्हणजे सतगुरु सतगुरु म्हणजे सतस्वरुप

वेद,व्याकरण,शास्त्र ज्ञानाने सांगतात की जीवाचा उध्दार करण्याचे काम गंगा करते ही गंगा नदीच्या रुपात हिमालय पर्वतातून धरतीवर वाहते.म्हणून जगाचे लोक जिवंत निरोगी अवस्थेमध्ये गंगाधाम जाऊन वाहत्या गंगेतील जल पितात हा उध्दारचा गुण लक्ष्यात ठेवुन काही भक्त लोक गंगाजल झारीमध्ये भरुन आपल्या घरी आणतात आणि घरातील कोण्या मनुष्याचा शेवटची घटिका येते तेव्हा त्याच्या मुखात ते गंगाजल टाकून त्याचा उध्दार करतात ज्याप्रकारे वाहत्या गंगा नदीचे जल व झारीमध्ये भरुन आणलेले गंगा जल हे दोघे ही गंगा आहे याकारणाने जसे गंगा नदीने उध्दार होतो तसाच गंगा झारीने च त्याचप्रकारचे थोडासाही फरक न होता उध्दार होतो अशाचप्रकारे जसे गंगा नदी आहे तसे खंड-ब्रम्हंडचा सतस्वरुप आहे आणि गंगा झारी आहे तो पिंडात प्रगट झालेला सतस्वरुप आहे म्हणून मोक्ष देण्यात खंड-ब्रम्हांडात प्रगट झालेला सतस्वरुप आणि पिंडात प्रगट झालेला सतस्वरुप एक सत्तेचे आहे म्हणून सतस्वरुप हा सतगुरु आहे आणि सतगुरु हा सतस्वरुप आहे हे ज्ञानी,ध्यानी परमपद सत्त आहे मायेचे पद खोटे आहे असे तोंडाने सांगतात परंतु जेव्हा सतगुरुच्या रुपात सतस्वरुपाचे निजरुप मिळते तेव्हा त्या निजरुपाला सतस्वरुप समजत नाही अशा सतगुरु मध्येच सतस्वरुपाचे निजरुप ओतप्रोत प्रगट झाले आहे असे वेगवेगळ्या प्रकारे ज्ञानी,ध्यानींना ते सतगुरु समजावतात तरी ही ज्ञानी,ध्यानी समजत नाही उलट अशा सत्ताधारी सतगुरुला भ्रमात आहे असे समजून घेतात. ।।१२।।

**इन की मती भाग ही अेसो ।। क्या अे करे बिचारा ।।**
**द्रसण भेष मान नही सक्के ।। ओ केवळ भेव हमारा ।।१३।।**

हे ज्ञानी,ध्यानी,दर्शन व वेष आमच्य केवलच्या भेदाला मानू शकत नाही या बापड्यांचे भाग्यच हलके आहे याकारणाने यांची मती अनंत सुखांच्या देशात घेऊन जाणाऱ्या केवळच्या भेदावर पोहचत नाही. ।।१३।।

**अे तो सकळ फास मे बंधिया ।। ग्यानी पिंडत सारा ।।**
**अेक ब्रम्ह ज्यां तत्त पिछाण्यो ।। तां कुं ई वार न पारा ।।१४।।**

ज्ञानी,ध्यानी वेशधारी व पंडीत हे सर्व त्रिगुणी माया म्हणजे ब्रम्हा,विष्णु,महादेव,शक्ती यांच्या फाश्यात बांधले गेलेले आहेत.यांच्या फाश्यातून ब्रम्हज्ञानी ज्याने पारब्रम्ह तत्तला जाणले आहे ते मुक्त आहे अशा ब्रम्हज्ञानीला ही माझ्यात प्रगट झालेल्या सतस्वरुप आनंदपदाचा वारपार नाही येत तर हे मायावी ज्ञानी,ध्यानी,पंड्तिांना माझ्यात प्रगट झालेल्या सतस्वरुपाचा काय वारपार येईल ? ।।१४।।

**अे तो सकळ सिष्ट का ग्यानी ।। हुण काळ लग जाणे ।।**
**हुणी सोई होवसी आगे ।। ओ ब्रम्ह ग्यान बखाणे ।।१५।।**

हे सृष्टीचे ब्रम्हज्ञानी होणकाळ पारब्रम्ह पर्यंत जाणतात हे ब्रम्हज्ञानी मी ब्रम्ह आहे आणि जगातील सर्व जीव ब्रम्हच आहेत व होणकाळ पारब्रम्ह हा ही ब्रम्ह आहे असे जाणतात मी माया नाही म्हणून मी मरत नाही आणि जग ही माया नाही म्हणून मरत नाही.मी ब्रम्ह आहे म्हणून माझ्यात कमी-जास्त होत नाही आणि जगातील जीव ही ब्रम्ह आहे म्हणून जगातील जीवांमध्ये ही कमी-जास्त होत नाही मायेत कमी-जास्त आधी ही झाली,आजही होत आहे आणि पुढे ही होत राहिल असे समजतात मी ब्रम्ह आहे म्हणून या मायेच्या कमी-जास्तने म्हणजे जे होणार आहे ते होईल याच्याशी माझा काही संबंध नाही असे ब्रम्हज्ञानींना ब्रम्हज्ञान प्रगट झालेले राहते ते ब्रम्हज्ञान जगाला वर्णन करुन सांगतात. ।।१५।।

**जेसा सुणो सानिया जग मे ।। अेसा सब तत ग्यानी ।।**
**करणी करे रात दिन काटी ।। से क्रसा सम जाणी ।।१६।।**

जगात जसे पागल एखाद्या वस्तु करीता खपत राहतात असेच जगाचे ज्ञानी एखाद्या मायेच्या तत्वाला धारण करतात आणि त्या तत्वाच्या मागे पूर्ण आयुष्य भर वेडे होऊन खपत राहतात ते त्या तत्वाच्या आधीन होऊन खपून जातात परंतु यांना आनंदपद मिळत नाही जसे शेतकरी शेती रात्रंदिवस मेहनत करुन करतो आणि पोटा पुरते धान्य घरी आणतो असेच वेदांचे क्रिया-कर्म करणारे कर्मकांडी रात्रं दिवस करण्यांच्या मागे कष्ट करतात आणि थोडेसे मायेचे सुख प्राप्त करतात परत काळाच्या मुखात पडतात इतके कष्ट केल्यानंतर ही कर्म-कांडांना आनंदपदाचे महासुख मिळत नाही आणि काळाच्या मुखातून मुक्त होत नाही. ।।१६।।

**कथा ब्यास ग्यानी जे जग मे ।। बानी अे बेद सुणावे ।।**
**अे चारण सब भाट कहीजे ।। आनंद पद नही पावे ।।१७।।**

चारण भाट राजाची महीमा करतो राजाची स्तृती केल्यावर राजा चारणभाटाला एखादा इनाम देतो,राजगादी नाही देत अशाच प्रकारे वेद तसेच वाणी ऐकविणारे कथाकार, व्यास व ज्ञानी सतस्वरुप आनंदपदाची महीमा करतात यांच्या आनंदपदाच्या महिमेने

सतस्वरुप यांना आनंदपद कधी देत नाही एखादे मायेचे पद देतो.।।१७।।

**क्रसो सुणो सानियो चारण ।। उदम करे सब लोई ।।**
**भाग पुरस इण सब सें न्यारो ।। राज करे कऊँ तोई ।।१८।।**

जगात शेतकरी वेडे व चारणभाट कष्टाने उद्योग करतात परंतु यांना जगाचे राज्य मिळत नाही याच जगात एखादा भाग्यवान पुरुष राहतो तो थोडे सुध्दा कष्ट करीत नाही तरी ही त्याला जगाचे राज्य मिळते.अशाचप्रकारे ब्रम्हज्ञानी,तत्वज्ञानी,कर्मकांडी, व्यास,पंड्ति वेषधारी,ध्यानी हे सर्व माया-ब्रम्हचे अनेक उद्योग करतात परंतु यांना महासुखाचे आनंदपद मिळत नाही असेच याच जगात एखादा भाग्यशाली हंस राहतो तो माया-ब्रम्हचा काही उद्योग करीत नाही आणि विना उद्योग करुन या माया ब्रम्हचा राजा जो आनंद ब्रम्ह आहे त्याला घटात सहज प्रगट करुन घेतो.।।१८।।

**यू ओ जोग हमारो केवळ ।। सब जोगन को राजा ।।**
**करणी सकळ खड़ी ज्यू बाँदी ।। म्हे सब का सारूँ काजा ।।१९।।**

माझा राजयोग हा माया ब्रम्हच्या सर्व क्रिया,कर्म,पवनयोग,अष्टांगयोग,हटयोग तसेच माया ब्रम्हच्या सर्व योगांचा राजा आहे जागत जसे राजाच्या बांद्या राहतात त्या बांद्यांना काही काम पड्ले तर त्या बांद्या राजा समोर हाथ जोडून राजाला विनंती करत उभ्या राहतात त्यांच्या विनंत्या ऐकून राजा त्यांचे काम पूर्ण करतो असेच मायावी योग व करण्या सतस्वरुप राजा समोर बांदी सारखे उभे राहतात जसे राजा बांदीचे काम पूर्ण करतो तसेच सतस्वरुप राजा योग व करण्यांचे पराक्रम बघून करणीचे सुख करणी करणारे योगी,ज्ञानी,ध्यानी,पंड्ति,दर्शन,वेषधारी इत्यादींना मायेच्या देशात देतो बांध्यांना राजा जसे आपली गादी देत नाही तसेच सतस्वरुप ज्ञानी, ध्यानी,वेषधारी,पंड्ति इत्यादिला आपले आनंदपद देत नाही. ।।१९।।

**सुणज्यो सकळ सिष्ट मे ग्यानी ।। केवळ पंथ हमारा ।।**
**सुर्गुण निर्गुण अे दोय भक्ती ।। माया ब्रम्ह बिचारा ।।२०।।**

राजा जसे बांद्यांचे काम सारतो तसे कैवल्य आनंदपद हे ब्रम्ह व मायेचे काम पूर्ण करतो सर्व सृष्टीचे ऐका,राजा सारखा माझा पंथ आहे असे राजा सारखे पंथात याल तर मी माया ब्रम्हचा राजा आनंदपद हे तुमच्या घटात प्रगट करुन देईल सगुण व निर्गुण या दोघांची भक्ती हंसाला आनंदपदात पोहचवत नाही ती माया ब्रम्हमध्येच ठेवते.।।२०।।

**मात पिता ज्यु जगमे कईये ।। यु अे भक्ती जाणो ।।**
**सत बेराग आणंद पद गुरू हे ।। यु आ सता बखाणो ।।२१।।**

जगात आई वडिल व वेदी गुरु राहतात अशीच सगुण भक्ती ही इच्छा मातेची आहे आणि

निर्गुण भक्ती ब्रम्ह पित्याची आहे जसे जगात माता–पिता राहतात तसेच वेदी गुरु राहतात अशाचप्रकारे सतवैराग्य आनंदपद ही गुरुची भक्ती आहे.आनंदपद गुरुची भक्ती केल्या शिवाय हंसात सत वैराग्याची सत्ता प्रगट होत नाही सतवैराग्य प्रगट झाल्या शिवाय हंसाचे जन्मणे मरणे सुटत नाही. ।।२१।।

**मानो बचन हमारा सत कर ।। नार पुर्ष सब ग्यानी ।।**
**प्रगट कळा हंस कू भ्यासे ।। नही रेहे जग मे छानी ।।२२।।**

सर्व स्त्री पुरुष व सर्व ज्ञानी माझे वचन सत्य आहे असे मानून माझा पंथ धारण करा ज्यांनी–ज्यांनी माझा पंथ धारण केला त्या सर्व हंसांना त्यांच्याच घटात सतस्वरुपाची सत्तकला प्रगट झाली व असे संत जगात छाने रहे अशीच वेळ आज तुमची आली आहे ही संधी गमवू नका. ।।२२।।

**पीछे सकळ झुरो गे भाई ।। अणभे सुण सुण सारा ।।**
**अेसा संत फेर इण जग मे ।। कोई समये प्रगटण हारा ।।२३।।**

या संधीला गमावून दिले तर पुढे अणभय पदाची वाणी ऐकून–ऐकून तुम्ही सर्व हे अणभय पद प्राप्त करण्याकरीता झुराल माझ्या सारखा अणभय पदाचा संत जगात वारंवार प्रगटत नाही नंतर कितीही या पदाची इच्छा केली तरी ही हे पद मिळत नाही असा संत सृष्टीत कधी तरीच प्रगट होतो वारंवार प्रगटत होत नाही. ।।२३।।

**बार बार आ सता न आवे ।। हंस तारण जग माही ।।**
**पीछे धरम सकळ सोई ढरड़ा ।। ता मे कारज नाही ।।२४।।**

हंस तारण्याची सत्ता जगात येत नाही संत मोक्षात गेल्यावर संतांच्या नावावर मागचे लोक संतांच्या सारख्या सर्व वरवरच्या विध्या करुन धर्म चालवितात या वरच्या विधीला ढरडा म्हणतात अशा ढरड्यात मोक्षास जाण्याची सत्ता राहत नाही ती सत्ता संतासोबत चालली गेलेली असते मागे राहत नाही अशा संताच्या नावावर सुरु झालेल्या धर्माला कितीही चतुराईने धारण केले तरी ही मोक्षास जाण्याचे कार्य बनत नाही. ।।२४।।

**बाद बिवाद करे सब जग मे ।। सबे आप दिस ताणे ।।**
**केवळ जोग क्हेण मे नाही ।। किस बिध जक्त पिछाणे ।।२५।।**

जगाचे लोक केवली संतांच्या मोक्षात गेल्यानंतर त्या केवली संतांच्या नावाचा धर्म स्थापन करतात धर्म स्थापन केल्यानंतर त्या धर्मात शिष्य एकत्र होतात त शिष्य मोक्ष गेलेल्या संताच्या कैवल्य योगाला आपल्या बुध्दीनुसार समजतात जशी विधी मताने समजमध्ये येते तशी विधी दुसऱ्या शिष्यावर लादतात दुसऱ्या शिष्याचे कैवल्य योगाच्या बाबतीत काही वेगळे मत राहतात दोघांचे मत मिळत नाही मत न मिळाल्यावर

आपसात वाद–विवाद करतात दोन्ही शिष्य कैवल्य योगाला बुध्दीने समजण्याचा प्रयत्न करतात तो कैवल्य योग बुध्दीच्या समजण्याच्या पलिकडे असतो म्हणून त्यांच्याने जसा आहे तसा पकडला जात नाही म्हणून त्यांच्याने वाद–विवाद करतात आणि ज्या शिष्याने जे मत पकडून घेतले त्याच्याने मोक्षास जाईल हि समज बनवून घेतो असे मागच्या बुध्दीच्या समजने आजपर्यंत कोणीही मोक्षाला गेले नाही. ।।२५।।

**जे कोई अरथ आद सू लेवे ।। राज जोग को भाई ।।**
**जो जो संत केवळी हुवा ।। वे पंथ सोजो जाई ।।२६।।**

आधी पासून आजपर्यंत केवळी संत जगात अनेक झाले त्यांचे सर्वांचे पंथ जगाचे लोक चालवून राहिले आहेत असे आधी पासून आतापर्यंत कैवल्य संतांच्या मागे जे पंथ झाले त्यातील कोणत्या ही पंथात संत मोक्षात गेल्यानंतर मागे राहीलेल्या ज्ञानाने राजयोग प्रगट होण्याची कला आहे का?हे शोधा. ।।२६।।

**जे वा सता पंथ मे अब ही ।। तो जाग जाग जो जागे ।।**
**तो हरजन को कारण नाही ।। भ्रम ग्यान सुंई भागे ।।२७।।**

जर ही राजयोग प्रगट होण्याची कला त्या पंथात आहे तर आज ही त्या सर्व पंथाने अनेक लोक घटात सतशब्द जागृत करुन परममोक्षास जात असतील जर असे होत असेल तर वर्तमानात सत्ताधारी हरीजनाची प्रगटण्याची गरज नाही आणि राहीली गोष्ट शिष्यांच्या भ्रमाची तर शिष्यांचे भ्रम हे केवळी संतांचे ज्ञान समजल्याने नष्ट होऊन जातात. ।।२७।।

**जो हद पड़ी संत ऊनही सें ।। आगे चली न कोई ।।**
**तो तारण हार संत ही जगमे ।। और उपाय न होई ।।२८।।**

संत मोक्षाला गेल्यावर संतांच्या नावाने पंथ चालले परंतु आज पर्यंत त्या पंथाने कोणी मोक्षाला गेला नाही म्हणजे संत मोक्षात गेल्यावर संताच्या मागे मोक्षाला जाण्याची रीत खुंटून जाते पुढे संतांच्या नावाच्या पंथाने मोक्ष जाण्याची रीत चालत नाही. याचा अर्थ भवसागरातून तिरणे आहे तर प्रत्यक्षात मोक्षाला पोहचविणारा सत्ताधारी संतच पाहिजे अशा संताच्या शिवाय दुसरा कोणता उपाय आनंदब्रम्ह प्रगट करवित नाही. ।।२८।।

**समझो सकळ नार नर आणी ।। पंथ आगला त्यागो ।।**
**वेसोई संत प्रगटे जगमे ।। ताँ के चरणा लागो ।।२९।।**

याकरीता सर्व स्त्री–पुरुषांनो पुढे झालेल्या सर्व केवली संतांचे पंथ त्यागून करा आणि त्या केवली संतांच्या सत्तेनुसार प्रत्यक्षात जे सत्ताधारी संत प्रगट आहे त्यांच्या चरणी लागा. ।।२९।।

**आपो खोज समज सो कीजे ।। म्हे उणमे हुं भाया ।।**

आगे हंस तार जन लेग्या || अब म्हे तारण आया ||३०||

आपल्या जवळ अनेक झालेल्या केवली संतांचे ज्ञान आहे त्या ज्ञानाच्या आधारावर हे शोधा की पुढे जे जे संत हंस तारण्यास आले होते तीच तारण्याची सत्ता माझ्या जवळ आहे किंवा नाही त्या संतांच्या ज्ञानाने हे आपल्या समजमध्ये येईल की मी पण त्या संता सारखा मोक्षाला पोहचविणारा सत्ताधारी आहे जसे आधी हंस तारण्याकरीता आले होते तसेच्या तसेच मी आज तारण्याकरीता जगात आलो आहे.||३०||

दरसण भेष जक्त नर नारी || सब मुज पासे आवो ||
राव र रंक सकळ कुंई तारूँ || आ सत सरण समावो ||३१||

याकरीता सर्व दर्शन,वेशधारी,जगातील स्त्री-पुरूष,ज्ञानी,ध्यानी,राजा,रंक सर्व माझ्या जवळ या,माझ्या जवळ जे सत्त आहे,त्याचा शरणा घ्या. ||३१||

चूको मती सत कर मानो || जे आणंद पद चावो ||
डाकर पड़ो जक्त कू छाड़र || तो घट प्रचो पावो ||३२||

माझे वचन सत्य माना सत्य मानण्यात चुकू नका.खरच आनंदपद चाहत असाल तर जगाचा म्हणजे माया-ब्रम्हच्या सुखांचा मागचा पुढचा विचार न करता जसे डोहात उडी मारतांना घर संसाराचा विचार करत नाही तशी उडी मारा आणि लगेच तुमच्या घटात सतस्वरुप आनंदपद प्रगटण्याचा परचा प्राप्त करा. ||३२||

जो जो संत मांड में आया || हंस तारण कू सोई ||
से देह थका निंद्याँ जग कीवी || चरणा पड़्या न कोई ||३३||

जे जे संत जगात हंस तारण्याकरीता प्रगट झाले त्यांची जगाच्या लोकांनी देह थके पर्यंत साधारण मनुष्य समजून निंदाच केली आहे त्यांना सतस्वरुप समजून चरणी कोणी पडले नाही. ||३३||

पाछे सकळ करे जग महिमा || ढरड़े सकळ सरावे ||
ज्यां मे काज नही कुछ काई || सो सब के मन भावे ||३४||

संत निजधाम गेल्या नंतर त्या संताच्या पराक्रमाची सर्व जगत महीमा करते आणि एक महीमा करतो म्हणून दुसरा ही करतो अशी महीमा करण्याची प्रथा बनून जाते अशी महीमा सर्वांच्या मनाला आवडते परंतु या महीमेने एक ही हंसाचे मोक्षाला जाण्याचे कारज बनत नाही. ||३४||

क्या म्हे कहुं जक्त की भाई || इनका येही बिचारा ||
साच बचन साची चल त्यागे || कूडी लगे पियारा ||३५||

जगातील लोकांचे काय वर्णन करावे? जगातील लोकांची हिच बुध्दी आणि मती आहे तारणारे संत राहतील तोपर्यंत निंदा करतील आणि ते संत गेल्यानंतर महीमा करतील

जगातील लोकांना आनंदपदाचे ज्ञान व आनंदपदास चालण्याची विधी प्रिय वाटत नाही परंतु काळाच्या मुखात पडण्याचे ज्ञान जसे वेद,शास्त्र,पुराण,भेद इत्यादी विध्या प्रिय वाटतात याकारणाने काळाच्या मुखातून निघण्याचे ज्ञान त्यागून देतात आणि काळाच्या मुखात ठेवणारे ज्ञान जाऊन–जाऊन धारण करतात. ।।३५।।

**समझ सको सो तो हंस समझो ।। मत जग संग बेहे जावो ।।**
**सतस्वरूप केवळ पद आनंद ।। तां सुँ ओ मन लावो ।।३६।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात हंसानो समजत असाल तर समजा जगातील ज्ञानी,ध्यानी,दर्शनी,वेषधारी,कर्मकांडी,मतज्ञानी,व्यास पंडीत यांच्या ज्ञानासोबत वाहून जाऊ नका यांचे ज्ञान माया–ब्रम्हपर्यंत आहे या ज्ञानात काळाचे भारी महादु:ख आहे काळाच्या दु:खातून निघायचे असेल तर महाआनंद देणाऱ्या सतस्वरुप,केवल आनंदपदात मन लावा. ।।३६।।

**के सुखराम मोख जब पूँछे ।। जग मे सु हंस कोई ।।**
**ऐसा संत आण यहाँ प्रगटे ।। कळा सरूपी जोई ।।३७।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज ज्ञानी,ध्यानी,जगाला सांगतात की,आजपर्यंत जगामधून अनंत हंस मोक्षात गेले.ते कुद्रतकला प्रगट झालेल्या संताच्या आधारानेच गेले दुसऱ्या कोणत्या माया ब्रम्हच्या कलेने नाही गेले तसेच आजही सतस्वरुप संताच्या आधाराने जाऊन राहिले दुसऱ्या कोणत्या माया ब्रम्हच्या कलेच्या आधाराने जाऊन नाही राहिले आणि पुढे ही कैवल्य कला प्रगट झालेल्या संताच्याच आधाराने जातील दुसऱ्या कोणत्या माया–ब्रम्हच्या कलेच्या आधाराने नाही जाणार हे समजा. ।।३७।।

**कळा कळा मे फेर क्हावे ।। जे समजे नर नारी ।।**
**होण काळ की कळा ब्होत हे ।। से सब तजो बिचारी ।।३८।।**

सतस्वरुपाच्या कलेमध्ये व होणकाळाच्या कलेत खुप फरक आहे होणकाळाची अनेक कळा आहेत ह्या सर्व होणकाळ कला जीवांना काळाच्या मुखात ठेवतात या होणकाळाच्या कलेपेक्षा सतस्वरुपाची कला वेगळी राहते ती जीवांना काळापासून तारते म्हणून स्त्री–पुरुषांनो समज असाल तर समजा मारणाऱ्या होणकाळाच्या ज्या ज्या कला आहेत त्या सर्वांचे त्यागन करा आणि तारणाऱ्या सतस्वरुपाच्या कलेला धारण करा. ।।३८।।

**रिध सिध्ध प्रचा सू बारे ।। होण काळ सू होई ।।**
**ग्याध ध्यान क्रणी सब सारी ।। क्हे मुख सु होई ।।३९।।**

रिध्दी,सिध्दी,पर्चे चमत्कार ह्या होणकाळच्या कला आहेत मायेचे ज्ञान,मायेचे ध्यान, मायेच्या करण्या तसेच तोंडाने बोलल्यावर सिध्द होणाऱ्या विध्या ह्या सर्व होणकाळाच्या कला आहेत यापेक्षा सतस्वरुपाची कला वेगळी आहे.।।३९।।

**तत्त चीन निर्भे थिर होई ।। ब्रम्ह कळा सोई जाणो ।।**
**सतस्वरूप की कळा नियारी ।। वा जन सोज पिछाणो ।।४०।।**

पारब्रम्हच्या तत्तला ओळखून निर्भय होणे,स्थिर होणे ही पारब्रम्ह कला आहे याहून सतस्वरुपाची कला वेगळी आहे सतस्वरुपाची कला पारब्रम्ह कलेपेक्षाहून वेगळी कशी आहे?हे सतस्वरुप व पारब्रम्ह होणकाळचे ज्ञान शोधून ओळखा. ।।४०।।

**वा बिध बिना कोई नही पावे ।। आणंद पद कु भाई ।।**
**पारब्रम्ह सें सब ही ऊपज्या ।। उलट मिल्या ता माही ।।४१।।**

सतस्वरुपाच्या कले शिवाय पारब्रम्ह तसेच मायेच्या अनंत कलांनी आनंदपद कोणी प्राप्त करीत नाही सतस्वरुपाच्या कले शिवाय जगात रिध्दी,सिध्दी,परचे चमत्कार, कर्मकांड इत्यादी जितक्याही कला आहेत त्या सर्व कला पारब्रम्ह आणि इच्छेपासून उपजल्या आहेत याकारणाने या कलांच्या आधाराने जीव पारब्रम्ह मध्येच मिळतो आनंदपदास कधी जात नाही. ।।४१।।

**आगे कदे न पूंते हंसो ।। कोट कळा अे पावे ।।**
**पुर्ण ब्रम्ह लग हंस पहुता ।। फिर फिर पाछा आवे ।।४२।।**

हंसाने पारब्रम्हच्या कोट्यावधी कला म्हणजे सर्व कला प्रगट केल्या तरी ही हंस पूर्णब्रम्हच्या पुढे कधी पोहचत नाही.तो कोट्यावधी कला प्रगट केलेला हंस पारब्रम्ह पर्यंत पोहचतो आणि वारंवार जगात जन्म धारण करुन जगात परत परत येतो.।।४२।।

**ताते कळा सकळ अे झूटी ।। मोख न पहुँचे कोई ।।**
**आवागवण मिटे नही जन की ।। जो ब्रम्ह जेसो होई ।।४३।।**

याकरीता पारब्रम्हच्या सर्व कला खोट्या आहेत याच्याने हंसाचे मोक्षास पोहचण्याचे कार्य होत नाही हंसाचे आवागमन मिटत नाही हंस पारब्रम्हची कला प्रगट करण्याच्या आधी जसा काळाच्या मुखात होता तसाच बनलेला राहतो त्याच्या ब्रम्हमध्ये म्हणजे जीवात सतस्वरुप प्रगट होत नाही त्याचा जीव म्हणजे ब्रम्ह पारब्रम्हच्या कला प्रगट करण्याच्या आधी जसा सतस्वरुपाच्या कले विना होता तसेच पारब्रम्हची कला प्रगट झाल्यावरही राहतो त्या जीवब्रम्हचे ५ आत्मा,मन,त्रिगुणीमाया व काळ निघत नाही याकारणाने तो जीव मोक्षात पोहचत नाही.।।४३।।


**क्हे सुखराम समज रे प्राणी ।। सत्त कळा ज्यां जागे ।।**
**अखंड घट मे हुवे ऊजीयाळो ।। नख चख मे धुन्न लागे ।।४४।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज हंसांना सतस्वरुप कला प्रगट होण्याचे लक्षण सांगून राहीले आहेत ज्या हंसाच्या घटात सत्तकला जागृत होते त्याच्या घटात नखापासून चखापर्यंत अखंडित धुन लागते व अखंडित प्रकाश होतो.।।४४।।

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

**कुद्रत कळा नाव इसही को ।। कोई जन जाणे नाही ।।**
**क्रणी बिना कीयाँ बिन साझन ।। ऊलट आद घर जाही ।।४५।।**

घटात अखंड्ति धुन व प्रकाश होण्याच्या कलेला कुद्रतकला, सत्तकला म्हणतात ही कला होणकाळाचा कोणी साधु,दर्शनी,ज्ञानी,पंडीत,ब्रम्हज्ञानी,तत्तज्ञानी जाणत नाही ही




कला होणकाळाची कोणती क्रिया–करणी तसेच साधन न करतांना घटात प्रगट होते ही कला हंसाला बंकनाळेच्या रस्त्याने उलटून सतस्वरुप आदघरी घेऊन जाते.

आद घर तीन आहेत तीन पद आहेत जीव आधी जेथे होता त्या आद घराचे नाव पारब्रम्ह आहे.जीव वारंवार जन्मतो त्या आद घराचे नाव माया म्हणजे भृगुटी आहे जीव,माया तसेच पारब्रम्हचे आदघर हे सतस्वरुप आहे.।।४५।।

**नख चख माहे अखंड धुन्न लागे ।। निमष न खंडे कोई ।।**
**मुख सु कहया रीत नही आवे ।। वा कुद्रत सुण होई ।।४६।।**

ज्या कुद्रतकलेने सतशब्दाची शिष्याच्या घटात नखापासून तर चखापर्यंत अखंड्ति धुन लागते ती धुन निमिष मात्र ही खंडीत होत नाही या कुद्रतकलेची रीत अनुभवानेचे समजली तोंडाने किंवा मायेच्या कोणत्याही चरित्राने जगाला सांगितली जात नाही. ।।४६।।

**पांच रंग को ना रंग वामे ।। नां पांचु रस भाई ।।**
**पाँच प्रेम सुई पेम नियारो ।। म्हे कहुँ कोण बिध लाई ।।४७।।**

(विठ्ठलारावचा संवादात कुंड्ली नं.३४,३५)
जगात पाच रंग...काळा,हिरवा,लाल,पांढरा आणि पिवळा पाच रस आणि पाच प्रेम..... खारट,आंबट,तिखट,फिका आणि गोड ही कुद्रतकला जगातील सर्व पाच रंग,पाची रस व पाची प्रेमाहून वेगळी आहे याकारणाने जगात समजेल अशी मी कोणती विधी आणून सांगु?।।४७।।

**अेसी बस्त नही जग मांही ।। म्हे नकली मींड बताऊं ।।**
**सब नास्त आ सत नही या बिन ।। किस बिध जोड़े लाऊं ।।४८।।**

जगात अशी कोणती नकली वस्तू ही नाही की ती जोड्याने उभी करुन जगाला कुद्रतकला समजवू शकेल.कुद्रतकले शिवाय सर्व वस्तु नाश होणाऱ्या आहेत कुद्रतकला अमर वस्तु आहे अशा अमर वस्तु सोबत मरणारी कोणतीही वस्तु बरोबरीला येऊ शकत नाही याकारणाने जगाला कुद्रतकला कोणत्या ही मायावी विधीने समजविता येत नाही. ।।४८।।

**भक्त जोग साझन सब तपस्या ।। सर्गुण निरगुण दोई ।।**

सबही असत सत्त ओ नाही ।। क्हाँ लग गिण कहुँ तोई ।।४९।।

सगुण म्हणजे माया आणि निर्गुण म्हणजे पारब्रम्ह अशा माया आणि पारब्रम्हच्या सर्व भक्त्या आणि सर्व योग,सर्व साधना तसेच मन आणि पाच आत्म्याची तपस्या हे सर्व असत्य आहे,हे सत्य नाही यांच्याने मोक्ष प्राप्त होत नाही कुद्रतकला सोडून जगात मोजल्या जात नाही अशा अगणित मायावी भक्त्या आहेत या अगणित भक्त्यांमधून कोणत्या ही भक्तीने आनंदपदास जाता येत नाही काळाचे दु:ख कापता येत नाही म्हणून ही कुद्रतकला सोडून ह्या अगणित भक्त्या हंसाला मोक्षास जाण्यासाठी खोट्या आहेत. ।।४९।।

समज समज सतगुरू संग कीजे ।। ज्यां संग कुद्रत जागे ।।
ओर गुरू तज ग्यान उपायाँ ।। ज्याँ संग धुन नही लागे ।।५०।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात ह्या सर्व मायेच्या तसेच पारब्रम्हच्या भक्त्या असत्य आहेत ह्या तारणाऱ्या नाहीत यांना समजा आणि समजून ह्या मायेच्या भक्त्या सांगणारे वेदी गुरु आणि वेदी ज्ञानी,ध्यानीला त्यागून आणि ज्याच्या संगाने तारणारी कुद्रतकला जागृत होते ते सतगुरु धारण करुन जीवाचे कार्य करुन घ्या. ।।५०।।

केहे सुखराम हंस करणी कर ।। आणंद पद नही पावे ।।
ज्यूं सेंसार राज कर ऊधम ।। कंठ बेद किम गावे ।।५१।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज हंसांना सांगून राहिले की,माया–ब्रम्हची करणी करुन आनंदपदास कोणीही जात नाही जसे कोणी संसारात राजरीत शिकण्याचा उद्योग केला त्याला राजा सारखी राजरीत येईल त्याला ऋषींसारखे वेद कंठस्थ नाही झाले वेद करण्याची रीत केली नाही म्हणून वेद झाले नाही. ।।५१।।

हिरदे ग्यान कोण बिध बेसे ।। दया करे किम कोई ।।
ज्युं ऊधम यूँ सब ही करणी ।। याँ वा सत न होई ।।५२।।

आणि ह्दयात वेदाचे ज्ञान कसे बसेल?आणि कोणी ही दया कशी करेल?जसा उद्योग कराल तसे फळ मिळते(जसे–विहिर खोदली आणि म्हणतो की माझी हवेली तयार नाही झाली जर हवेली बनवत असता तर त्याच पैश्यात हवेली बनून गेली असती आणि विहिर खोदली म्हणून विहिर तयार झाली अशाच सर्व करण्या आहेत जसे कराल तसे फळ मिळेल अशी याचप्रकारे दुसऱ्या करण्या सत्य होऊ शकत नाही. ।।५२।।

ऊधम माय पाँचु सुख सारा ।। नाना बिध का पावे ।।
क्रामात युँ सब करणी में ।। रिध सिध दोडी आवे ।।५३।।

संसारात उद्योग केल्याने उद्योग करणारा नाना विधीचे पाच सुख प्राप्त करेल अशाच प्रकारे मायेच्या करण्या करणाऱ्यामध्ये करामात व रिध्दी–सिध्दी धावून धावून जागृत

होईल आणि त्या करामाती करामातचे तसेच रिध्दी सिध्दीचे नाना विधीचे सुख प्राप्त करेल परंतु तो सत विज्ञानाचे थोडेसे ही सुख कधी प्राप्त करणार नाही. ।।५३।।

**समजवान बिन कोई न समजे ।। म्हे कहाँ लग कहुं बिचारी ।।**
**प्रचा सकळ राज ज्यूँ सारा ।। आ ग्यान दिष्ट सें न्यारी ।।५४।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात मी जगाला कोठपर्यंत समजावून सांगू? आनंदब्रम्हची जगातील लोकांमध्ये समजच नाही.जगातील सर्व परचे चमत्कार माया–ब्रम्हपासून प्रगटतात.जसे जगात प्रजेला राजाकडून जे उद्योग केल्यानंतर सुख मिळतात असेच जीव हंसाला करण्या केल्यानंतर माया–ब्रम्हपासून परचे चमत्काराचे सुख मिळतात आनंदब्रम्ह हे माया ब्रम्हचे परचे चमत्काराच्या समज दृष्टिने समजले जात नाही पर्चे चमत्कारात जी समज येते ती समज सतस्वरुप समजण्याच्या उपयोगात येत नाही सतस्वरुप समजण्या करीता पर्चे चमत्काराच्या समज पेक्षा वेगळी समज लागते ती समज कोण्या समजवानातच राहते तोच समजवान आनंदब्रम्हला समजु शकतो. ।।५४।।

**ओ सत भेद हमारो सुणज्यो ।। आणंद लोक कु जावे ।।**
**सतस्वरूप की कळा प्रगटे ।। सो सत्त सब्द कहावे ।।५५।।**

माझ्या सत्तभेदाने हंस होणकाळातून निघून आनंदलोकास जातो.त्याच्या घटात सतस्वरुपाची कुद्रतकला जागृत होते.त्याच्या घटात सतशब्दाची अखंडित ध्वनी जागृत होते.त्याच्या घटात काळाच्या मुखात जाणारे माया–ब्रम्हचे परचे चमत्कार कधी प्रगट होत नाही. ।।५५।।

**नख चख सोज अगम कूँ ऊडे ।। इण हंसा कु ले जावे ।।**
**फाडर पीठ चढे नित ऊँचो ।। पांछो कबुहन आवे ।।५६।।**

घटात प्रगट झाला तो सतशब्द हंसाच्या घटाच्या नखापासून चखापर्यंत आपली सत्ता प्रगट करतो आणि हंसाला अगमदेश म्हणजे ज्या देशाची ब्रम्हा,विष्णु,महादेव तसेच माया–ब्रम्हला माहिती नाही अशा अगमदेशास उडवून घेऊन जातो हा सतशब्द हंसाला हंसाच्या घटाची पाठ फाडून उंच सतस्वरुपाच्या देशाकरीता नेहमी घेऊन चढतो आणि सतस्वरुपाच्या देशात हंसाला पोहचवून देतो.हंस सतस्वरुपात पोहचल्या नंतर खाली मायेत कधी येत नाही. ।।५६।।

**जात जात ऊँचो नित जावे ।। मिणियाँ सब ही छेके ।।**
**तन बेराट माहे बिध सारी ।। भिन भिन्न कर सब देखे ।।५७।।**

हा सतशब्द नित्य प्रगट झालेल्या स्थानापासून उंचच जात असतो तो पाठीच्या मणक्यांमध्ये ३३ कोटी देवतांचा वास आहे अशाप्रकारे पाठीच्या २१ मणक्यांचे छेदन करतो खंड–ब्रम्हंडच्या माया ब्रम्हच्या सर्व विध्या घटातच वेगवेगळ्या करुन पाहून घेतो.

।।५७।।

**सब ही ध्यान कूंच्या मुद्रा ।। सब स्हेजां सज जावे ।।**
**जोग भक्त निर्गुण सो सर्गुण ।। सब बिध चेन लखावे ।।५८।।**

जगातील लोक खूप खूप कष्ट घेऊन ध्यान,कुंच्या,मुद्रा अनेक प्रकारच्या सगुण भक्त्या व निर्गुण भक्त्या साधतात त्या सर्व भक्त्यांच्या फळांचे चरीत्र सतशब्दाच्या सत्तेने हंसाच्या घटातच सहजात साधली जाते त्याकरीता जगाच्या लोकांसारखे खूप खूप कष्ट घ्यावे लागत नाही. ।।५८।।

**निज नाँव जाग्याँ सब क्रणी ।। स्हेजाँ हुवे सब कोई ।।**
**जेता ध्यान संत पच कर हे ।। जे हाजर यू सोई ।।५९।।**

माया ब्रम्हचे संत पचून-पचून माया ब्रम्हचे ध्यान करतात त्या ध्यानाने संतांना करणीचे फळ लागते ते सर्व फळ घटात निजनाम प्रगट झाल्यावर विना करणीने हजर होते.।।५९।।

**खिड़की सबे सब्द ही खोले ।। मन साझन कुछ नाहीं ।।**
**क्या कहुँ उद बुद बिध भारी ।। जो जाणे ता माही ।।६०।।**

हंसाला आनंदब्रम्ह पोहचतेवेळी रस्त्यात ज्या ज्या खिड्क्या लागतात म्हणजे अड्डो,रोडे लागतात ते सर्व सतशब्दच खोलतो त्या अड्थळ्यांना पार करण्याकरीता हंसाला मन व तनाचा हट्ट करावा लागत नाही हे मन व तनाचा भारी हट्ट भृगुटीचे ध्यान करणाऱ्याला करावा लागतो तरी ही भृगुटीच्या ध्यानींचा काळ सुटत नाही अशी ही अद्‌भुत रित आहे ही रित खुप भारी आहे ही रित ज्याच्यात झाली तोच ती कशी अद्‌भुत आहे हे जाणेल मायेचे ज्ञानी,ध्यानींना ही रित समजणार नाही. ।।६०।।

**ओर जोग ऊतर चड़ जावे ।। जे जन सारे होई ।।**
**राज जोग प्रगटे ओं घट मे ।। मन के बस नही कोई ।।६१।।**

मायेचे सर्व योग संत आपल्या मनाच्या बळाने प्राप्त करतो अशा संताचे मन योगाने उबगून गेले तर संताचा हंस खाली उतरुन जातो म्हणजे हंसाच्या योग साधनेच्या आधी जशी स्थिती होती तशी बनून जाते परत योगाची इच्छा होते परत संत चढून जातो परत उबगून गेला की खाली येऊन पड्तो असे चढणे-उतरणे मायेच्या योग्यांचे त्याच्या मनाच्या वश राहतो असे राजयोगाच्या संतात होत नाही संताला अमरदेशाला चढते वेळी आनंद येतो कंटाळा येत नाही तरीही संत जसे राजयोग धारण करण्याच्या आधी स्थिती होती ती करणे चाहिल तर होत नाही हा राजयोग हंसाने आपल्या मनाच्या बळाने चढवलेला राहत नाही हा राजयोग सतगुरुच्या सतशब्दाच्या बळाने हंसाच्या घटात प्रगट झालेला असतो याकारणाने हंस सतशब्दाच्या वश राहतो.हा

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

सतशब्द नेहमी अमरलोकाकडे जात असतो तो होणकाळाकडे परत फिरत नाही कारण चढवलेला हंस मनाच्या बळाने चढवलेला नसतो सतगुरुच्या बळाने चढवलेला असतो म्हणून या राजयोगात हंसाला खाली उतरविणे परत चढविणे हे मनाच्या वश राहत नाही. ।।६१।।


**आपे मते चडे तन माही ।। क्रम धर्म नही माने ।।**
**जनका अंग कछु नही देखे ।। नित अगम दिस ताणे ।।६२।।**

हा सतशब्द आपल्या सत्तेच्या बळाने हंसाच्या घटात हंसाला घेऊन चढतो तो सतशब्द हंसाचे कर्म,धर्म,स्वभाव काही पाहत नाही हंस निचकर्मी आहे का उंचकर्मी, हंस निचधर्मी आहे का उंचधर्मी आहे, हंस उंच स्वभावाचा आहे का निच स्वभावाचा हे काही पाहत नाही सतशब्द हंसाच्या मन व तनाच्या स्वभावांना मानत नाही सतशब्द फक्त हंसाला पाहतो हंस आधीपासून माझा आहे आज ही माझा आहे व पुढे ही माझाच राहील तो मन आणि पाच आत्म्यांच्या वश होऊन काळाच्या चक्कर मध्ये अटकून गेला मनाच्या तसेच ५आत्म्यांच्या मुळे हंसाकडून हलके भारी कर्म,धर्म बनले आहे म्हणून हंस निर्दोष आहे तसेच हंस आधीपासून माझा आहे याकरीता सतशब्द हंसाच्या धर्म,कर्म,स्वभावाला न पाहता नेहमी अमरलोकाकडे ताणतो. ।।६२।।

**जोग भोग को कारण नाही ।। ना रेहेणी को भाई ।।**
**जे जन तज्यो सब्द कूँ चावे ।। तोई पद बिरचे नाई ।।६३।।**

याकारणाने सतशब्द हंस योगी आहे का भोगी आहे म्हणजे ज्ञानी सारखा उंचकर्मी आहे का नरकीय जीवांसारखा निचकर्मी आहे हा हसांची राहणी पाहत नाही एक वेळा हंसात सतशब्द,प्रगट झाल्यानंतर सतशब्द हंसाला सोड्त नाही याच्या नंतर हंसाने सतपदाला जोर लावून ही त्यागू इच्छीले तरी सतपद हंसाने सुटत नाही. ।।६३।।

**ज्यूं नर आप हात गळ फासी ।। ले झूले कहुँ कोई ।।**
**पीछे कबु खोलणे लागो ।। तो वा नरम न होई ।।६४।।**



जसे कोणी मनुष्य आपल्या गळ्यात फाशी लावून जमीनीवर पाय पोहचणार नाही अशा उंच जागेचे साधन बनवून झुलतो झुलल्यानंतर त्या फाशीला खोलने चाहतो ती फाशी लाख प्रयत्न केले तरीही थोडीही नरम होत नाही ती फाशी जीवाला देहातून काढूनच टाकते तसेच सतशब्द हंसाने धारण केल्यावर हंसाला पिंडातून म्हणजे खंड–ब्रम्हंडातून काढून घेतो तो हंस लाख प्रयत्न करुन दहाव्याद्वारातून कंठकमळ येऊ चाहिल तरी ही परत येऊ शकत नाही तो हंस कंठ कमळातून हृदय कमळात गेला तर हृदय कमळातच राहील आणि

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।।


पुढे नाभी कमळाकरीता प्रस्थान करेल परंतु हंस हृदय कमळातून कंठ कमळात परत कधी येत नाही. ।।६४।।

**असो सत सब्द ओ कहिये ।। अंग को कारण नाही ।।**
**ओतो हंस लेर वां जासी ।। पुरण पद के माही ।।६५।।**

तो हंसाचा स्वभाव पाहत नाही व मानत नाही तो हंसाचा कोणता ही स्वभाव, कर्म, धर्मात अटकत नाही तसेच हंसाला अमरलोकात घेऊन जाते वेळी हंसाचा कोणताही स्वभाव,कर्म,धर्म सतशब्दाच्या आड्वे येत नाही असा हा सतशब्द अद्भुत आहे तो हंसाला होणकाळातून काढून पूर्णपदात घेऊन जातो.।।६५।।

**अटके नही बिचे किस हुसें ।। ना कोई आड़ो आवे ।।**
**माया ब्रम्ह सकळ ही धूजे ।। सब कोई द्रसण चावे ।।६६।।**

असा सतशब्द हंसाला पूर्णपदास घेऊन जातेवेळी ब्रम्हा,विष्णु,महादेव,शक्ती या आकारी




त्रिगुणी माया आणि इच्छा व ब्रम्ह या सर्वांकडून अटकला जात नाही आणि हे या सतशब्दाला अटकावितही नाही हे कोणीही त्या सतशब्दाच्या आड्वे येत नाही त्या सतशब्दाला माया–ब्रम्ह धुजतात(घाबरतात) असे घाबरवणारे माया–ब्रम्ह आणि माया–ब्रम्हपासून उपजलेले कर्म,धर्म,स्वभाव,ब्रम्हा, विष्णु,महादेव,शक्ती हे कसे आड्वे येतील?उलट साकारी संताच्या शरीरात प्रगट झालेल्या सतस्वरुपाचे दर्शन ते करु इच्छिता. ।।६६।।

**मिणियाँ छेक मेर कु बींदे ।। अळा पिंगळा जागे ।।**
**दोनु दिसा गिगन कूं घेर्‍यो ।। ध्यान तुरकुटी लागे ।।६७।।**

हा सतशब्द हंसाच्या घटाला खंड–ब्रम्हंड बनवितो पाठीच्या स्वर्गाच्या २१ मणक्यांचे छेदन करतो इडा,पिंगळा म्हणजे गंगा,यमुना जागृत करतो हे दोन्ही गंगा,यमुना गगनाला घेरतात आणि हंसाची सुरत त्रिगुटीत पोहचवून त्रिगुटीत लागते.।।६७।।

**सुखमण पोळ गिगन की खोलर ।। सिर ऊपर होय आवे ।।**
**त्रुगुटी मेहेल खोल धस माही ।। नेण पलट उलटावे ।।६८।।**

सुखमना म्हणजे सरस्वती गगनाचा दरवाजा उघडून डोक्याच्या वरुन येते डोक्याच्या वरतून सुषमना त्रिगुटी महालात जाऊन गंगा,यमुनेशी मिळते,त्यावेळी हंसाचे डोळे पलटून दहाव्याद्वारात उलटतात. ।।६८।।

**सुख सो रीत क्हेण की सरधा ।। मुख की हाजत नाही ।।**
**जो हंस सुणो जाणसी आ बिध ।। उलट आद घर जाही ।।६९।।**

सतशब्दा सोबत हंस त्रिगुटीत पोहचतो.सतशब्दापासून त्रिगुटी मध्ये जी सुखांची रित आहे ती माझ्या मुखाने मी जगाला सांगू शकत नाही ते सुख मुखाने बोलून वर्णन

करण्याचे माझ्या मुखात बळ नाही जो सतशब्दाच्या या सुखांची विधी जाणेल तोच हंस सर्व महासुखांचे जे आदघर आहे तेथे पोहचेल. ।।६९।।

**क्हाँ लग कहुँ जक्त ईऊँ दिसे ।। ज्यू बाळक जुग होई ।।**
**म्हे ज्यू चड्या सिखर पर ऊँचा ।। ज्यूँ जग बास न कोई ।।७०।।**

जसे कोणी मनुष्य खूप उंच शिखरावर चढतो त्या शिखराच्या खाली उभे असलेले त्याच्या बरोबरीच्या मनुष्याला पाहतो तेव्हा खाली उभे असलेला मनुष्य शिखरावर चढणाऱ्या मनुष्याला बालका सारखे दिसतात अशाप्रकारे मी सतस्वरुपी शिखरावर पोहचून गेलो माझे होणकाळ जगात वास्तव्य राहीले नाही याकारणाने माझे सतस्वरुप शिखरात पोहचण्याच्या समोर होणकाळ जगाचे माया ब्रम्हचे ज्ञानी,ध्यानी बालका सारखे लहान दिसतात. ।।७०।।

**नेणा माहे नीर बेहे चाल्यो ।। तरगड़ म्हारी याँ फाटे ।।**
**ड्रप्यो मन चख नही बंछे ।। सुख अनंत ईण घाटे ।।७१।।**

(माझे खुप उंच चढून जाण्याने)डोळ्यातून पाणी वाहू राहिले आहे आणि तरगड (चाळे) माझे असे फाटून राहीले आहे आणि मन घाबरत आहे ते पाहण्याची डोळे इच्छा करीत नाही त्या घाटावर सुख अनंत आहे.।।७१।।

**ओर तमासा माया रूपी ।। जोत उजाळा होई ।।**
**जिन कूँ करे कहो कुण आरे ।। नाँ नाँ बिध का सोई ।।७२।।**

त्रिगुटीत ज्योतीचे सुख दिसते उजेडाचे सुख दिसते असे नाना विधी मायावी तमाशे दिसतात हे सर्व मायावी तमाशे सतशब्दाच्या सुखां समोर खुप फिके वाटतात तसेच उब आलेल्या सुखां सारखे वाटतात म्हणून माझा हंस सतशब्दाच्या सुखांशिवाय अन्य सुखांना मान्य करत नाही. ।।७२।।

**सब्द सुख भारी गढ ऊपर ।। अेक नकल कहुँ तोई ।।**
**ईंद्रि तेज भग संग कियाँ ।। ओ सुख निस दिन होई ।।७३।।**

सतशब्दापासून त्रिगुटीत रात्रं-दिवस सुख मिळते जगात इंद्रिय भगा सोबत तेज झाल्यावर जे सुख मिळते त्याच्याहून ही भारी सुख रात्रं-दिवस हंसाला त्रिगुटीत मिळते त्या सुखापुढे इंद्रिय भगा सोबत तेज झाल्याने मिळणारे सुख हे एक नक्कल सारखे आहे तेथील अस्सल सुख काही वेगळेच आहे.।।७३।।

**रात दिन सूताँ चल बेठाँ ।। नेक झोल नही खावे ।।**
**अेक रस तेज सदा सुख भारी ।। म्हेमा क्हैत न आवे ।।७४।।**

ते सुख रात्रं-दिवस राहतात ते सुख बसल्याने,चालण्याने किंवा झोपल्याने थोडेसे ही कमी होत नाही त्या सुखांमध्ये नेहमी भारी तेज राहते ते सुख एक रस राहते म्हणजे

एक सारखे राहतात त्या सुखांमध्ये झोल म्हणजे कमी होत नाही त्या सुखांची महिमा सांगितली जात नाही म्हणजे मुखाच्या शब्दांनी वर्णन केले जात नाही. ।।७४।।

**त्रूकुटी छाड़ चले जब आगो ।। सोई जन के बस नही ।।**
**आपे मते उड़े हंस निस दिन ।। प्रबस बंधीयो जाही ।।७५।।**

त्रिगुटी सोडून हंस जेव्हा अगम कडे चालतो तेव्हा त्या संताचे चालणे संताच्या निजमनाच्या वश राहत नाही तो बिना निजमनाच्या बळाने सतशब्दाच्या परवश बांधला जाऊन आपोआप सतशब्द केवल ने रात्रं-दिवस आनंदपदाकडे उडत राहतो. ।।७५।।

**म्हा माया अर जोत प्रगती ।। तहाँ लग चेन अपारा ।।**
**क्हाँ लग कहुँ गिणत नही आवे ।। याँ सूं सब्द नियारा ।।७६।।**

त्रिगुटी सोडल्यावर हंस मायेच्या लोकास जातो पुढे मायेचा लोक सोडून प्रकृतीच्या लोकात जातो प्रत्येक लोकात मोजता येत नाही असे अगणित प्रत्येक देशाचे आपले-आपले अपार सुखाचे चरीत्र राहतात ते सर्व सुख सतशब्दाच्या सुखासमोर फिके वाटतात अशा सतशब्दाचे सुख या सर्व सुखांपेक्षा वेगळे आहे.।।७६।।

**दिन दिन चड़े अगम दिस जावे ।। पाछा नेक न जोवे ।।**
**हंस कू पकड़ कियो मुख आगे ।। आतम पाँचू रोवे ।।७७।।**

सतशब्द हंसाला अशा अगम सुखाकडे रोजच्या रोज पोहचवत राहतो तो सतशब्द हंसाला अगममध्ये पोहचवतांना थोडेसे ही मागे पाहत नाही हंसापासून पाची आत्मा काढून फक्त हंसाला मुखात पकडून अगमदेशाकडे घेऊन चालतो हंसाच्या पाची आत्म्याला सुख पाहिजे म्हणून त्रिगुणी मायेचे कर्म करतो हे कर्म जीवाला पाची आत्म्याद्वारे लागतात या कर्मांमध्ये काळ असतो हा काळ जीवाला कर्मानुसार भारी दु:ख भोगवितो या दु:खात जीव त्राहीमान-त्राहीमान बनलेला राहतो पाची आत्मा ही माया आहे ब्रम्ह अमर आहे.अगमदेश अमर आहे अमरलोकात अमर वस्तुच सामावू शकते अमरलोकात माया सामावत नाही म्हणून सतशब्द हंसाला पाची आत्म्यामधून काढून अगम देशात घेऊन जातो.हंसाच्या ब्रम्हातून पाची आत्म्यांला सुख मिळते हे सुख पाची आत्म्याचे बंद होऊन जातात म्हणून त्या पाची आत्मा हंसापासून वियोग झाल्यावर रडतात. ।।७७।।

**सत्त सब्द की कथा सुणो आ ।। सुणज्यो ग्यानी ध्यानी सारा ।।**
**दसवों द्वार फोड़ कर निकसे ।। नही कोई अटकण हारा ।।७८।।**

सर्व ज्ञानी,ध्यानी सतशब्दाचा पराक्रम ऐका हा सतशब्द हंसाला सोबत ठेवून हंसाच्या घटाचे दहावेद्वार फोडून देतो सतशब्द दहावेद्वार फोडतो तेव्हा त्याला माया,ब्रम्ह तसेच होणकाळाचे कोणते बळ अटकवित नाही त्याला कोणते बळ अटकविणे चाहत नाही आणि ना तो कोणाच्याने अटकतो.।।७८।।

ओर जोग सब फिर फिर आवे ।। दसवे द्वार लग जाई ।।
से हंस सकळ आप बळ चड़ हे ।। ता ते अटके भाई ।।७९।।

राजयोगाच्या बळाशिवाय अन्य सर्व योगाने हंस दहाव्या द्वारापर्यंत जातो दहावेद्वार उघडून पुढे सतस्वरुपात जात नाही सतस्वरुपास जाण्याकरीता दहाव्याद्वाराच्या पलिकड्चा सतस्वरुपाचे बळ पाहिजे असते.ते बळ अन्य योगांमध्ये राहत नाही त्या योगांमध्ये मन ५ आत्मा त्रिगुणी माया तसेच होणकाळ ब्रम्हचे बळ राहते मन आणि पाच आत्मा आणि त्रिगुणी मायेचे बळ आकाशापर्यंत म्हणजे साकारी पर्यंत काम करते.होणकाळाचे बळ पारब्रम्ह पर्यंत म्हणजे निर्गुणपर्यंत काम करते हे सर्व बळ हंसामध्ये आधीपासूनच आहे सतस्वरुप हा खंड–ब्रम्हंड आणि पिंडाच्या पलिकडे आहे या सतस्वरुपाचे बळ सतगुरु मध्ये प्रगट असते खंड–ब्रम्हंड आणि पिंडाच्या पलिकडे आनंदब्रम्ह मध्ये जायचे असेल तर खंड–ब्रम्हंड,पिंडाच्या पलिकडे पोहचलेल्या सतगुरुचा राजयोगच प्रगट करावा लागतो ही राजयोग प्रगट करण्याची विधी इतर पवनयोग, सांख्ययोग,अष्टांगयोग,सोहम जाप अजप्पा योग यात राहत नाही यामुळे हा योग दहाव्याद्वारावर अटकून जातो हा योग दहाव्यादारावर अटकतो म्हणून या योगांना धारण केलेला हंस ही दहाव्याद्वारावर अटकून जातो पुढे आनंदब्रम्हमध्ये जात नाही आनंदब्रम्हमध्ये जाण्याकरीता दहाव्याद्वारी पोहचतो तेथे दहावेद्वार उघण्याकरीता परत–परत प्रयत्न करतो.दहावेद्वार उघडत नाही तेव्हा खाली जगात परत येऊन वारंवार जन्म धारण करतो.।।७९।।

आगे कहो कोण बळ जावे ।। वो तो देस नियारो ।।
माया ब्रम्ह अेक नही जाणे ।। ज्युं जुग ग्यान पियारो ।।८०।।

सतस्वरुपाचा देश खंडाचे ३ लोक १४ भवन आणि ब्रम्हांडाचे ३ ब्रम्हचे १३ लोक यांच्याहून निराळा आहे जगाला माया आणि ब्रम्हचे ज्ञान प्रिय आहे माया आणि ब्रम्हचे योग प्रिय आहेत.सतस्वरुपाच्या देशाला ब्रम्ह आणि माया दोघे ही जाणत नाही मग यांच्या योगसाधल्यावर हंस ब्रम्ह आणि माया याहून निराळा आहे अशा सतस्वरुपात कसे पोहचतील. ।।८०।।

दे उपदेस संत जुग आणी ।। जग कुळ सु जिव काड़े ।।
यूं निज नांव हंस कूं लेग्यो ।। सो हद बेहद छाडे ।।८१।।

जगात आधीपासून कुळ आणि वेदी वैरागी असे दोन पद चालत आले आहे वेदी वैरागी कुळातून जीवाला ज्ञानाचा उपदेश देऊन कुळातून बाहेर काढतात असेच सतगुरु म्हणजे निजनाव हंसाला निजनावाचे वैराग्य ज्ञान देऊन हद बेहदमधून काढतो आणि अगममध्ये पोहचवितो.।।८१।।

नही नही बस हंस को तामे ।। प्रबस पड़ियो भाई ।।

।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

**सतगुरू मेहेर सता घट जागी ।। जिण बस कीयो माई ।।८२।।**

हंसावर सतगुरुची मेहेर होते या मेहेरने सतगुरुची सत्ता हंसाच्या घटात जागृत होते ती सत्ता हंसाला त्याच्या मन आणि पाच आत्म्याच्या वशमधून काढते सोबत ब्रम्ह आणि माया अशा कुळाच्या वशमधून काढते याकारणाने हंसाचा स्वत:चा आणि कुळाचा वश निघून जातो आणि हंस सतस्वरुपाच्या परवश होऊन जातो.।।८२।।

**पथर बांध कूपमे पड़ हे ।। भोळप मे बिष खावे ।।**
**पासी लेर रूंख सूं झुरियो ।। ज्यूँ ओ जोग कहावे ।।८३।।**


जसे कोणी व्यक्ती देहावर भारी दगड बांधून पाण्याने पूर्ण भरलेल्या विहिरीत कुदतो. भारी(जड)दगडामुळे त्याला पाण्याच्या बाहेर निघता येत नाही त्याच्या फुफुसात पूर्ण पाणीच पाणी होऊन जाते ते पाणी त्या प्राणाला श्वास घेऊ देत नाही आणि त्याच्या जीवाला देहातून काढून टाकतो असेच कोणी व्यक्ती भोळ्यापणात विष खाऊन घेतो ते विष त्या जीवाचा श्वास घेणा बंद करुन देतो आणि त्याच्या हंसाला देहातून काढून टाकतो अशाच प्रकारे कोणी व्यक्ती गळ्यात फाशी घेऊन झाडाला लटकतो ती फाशी त्याला सैल करता येत नाही गळ्याला फाशी लावल्या कारणाने फाशी जीवाला श्वास घेऊ देत नाही आणि जीवाला शरीराच्या बाहेर करुन देते ठीक याचप्रकारे राजयोग आहे राजयोग जीवाचे मन,पाच आत्मा,त्रिगुणी माया आणि पारब्रम्ह काढून टाकतो आणि स्वत: हंसात ओतप्रोत होऊन जातो आणि जीवाला नेहमी करीता होणकाळातून काढून टाकतो.।।८३।।

**म्हेर भई सतगुरू की ता दिन ।। सता उदे घट होई ।।**
**ज्या दिन तिथ लिखी केवळ की ।। तामे कसर न कोई ।।८४।।**

अशा राजयोगी सतगुरुची मेहेर हंसावर ज्यादिवशी होते त्याच दिवशी हंसाच्या घटात सतगुरुची सत्ता उदय होऊन जाते सतगुरुची सत्ता जागृत झाली तो दिवस कैवल्य प्रगट होऊन गेले आणि होणकाळ सदा करीता सुटून गेला असा तो दिवस म्हणजे तिथी समजावी कैवल्य सतगुरु सत्ता प्रगट होण्यात कोणती ही कसर राहीली नाही असे समजणे.।।८४।।

**जात जात आनंद घर जासी ।। आगे पीछे सोई ।।**
**मिनखा देहे बिन और देहे रे ।। ओ हंस धरे न कोई ।।८५।।**

असे हंस मागे पुढे आनंदघरी जातील एका तिथीवर सतगुरुची सत्ता प्रगट झालेले सर्व



हंस,एकाच वेळी(सोबत)आनंदघरी जातील असे नाही आनंदघरी सर्वच्या सर्व जातील परंतु कोणी आधी जातील आणि कोणी मागावून जातील परंतु सत्ता प्रगट झालेला संत आनंदघरी जात नाही

तोपर्यंत तो होणकाळात जो सर्वात भारी देह आहे असा मनुष्य देहच धारण करतो तो अन्य कोणता देह धारण करत नाही. ।।८५।।

**ना धणी याप करे नही पाले ।। तीन लोक मे कोई ।।**
**पारब्रम्ह लग पूज्यो चावे ।। ओ एसो पद होई ।।८६।।**

सत्ता प्रगट झाली आहे अशा संताच्या वर तीन लोक १४ भवन व ३ ब्रम्हचे १३ लोकांमध्ये कोणी ही मालकी दाखवत नाही उलट पारब्रम्ह घरुन पारब्रम्ह पर्यंतचे सर्व पराक्रमी मायावी देवता,देव्या अशा सत्ताधारी हंसाला पुजु इच्छीता असे हे अलूत पद आहे.।।८६।।

**केवळ बीज सब्द ओ कहिये ।। सता जन घट जागे ।।**
**ओर सब्द सब माया रूपी ।। ध्यान समाधी लागे ।।८७।।**

घटात सत्ता जागृत होते तोच शब्द सतस्वरुप केवलचे खरे बीज आहे दुसरे शब्द ज्याच्याने घटात सतशब्द जागृत होत नाही ते सर्व शब्द मायारुपी आहेत त्या शब्दांनी लाखो वर्षापर्यंत मायेचे ध्यान लागेल व अनेक वर्षापर्यंत मायेची समाधी लागेल परंतु हंसाचा काळ सुटणार नाही अशा सतशब्दाला सोडून सर्व शब्द हे मायारुपी आहे हे ब्रम्हरुपी ही नाही असे समजा. ।।८७।।

**ब्रम्ह रूप सो सब्द कहावे ।। सो सोंहँ घट माही ।।**
**होणकाळ सुं उत्पत्त याँकी ।। सत्त सब्द ओ नाही ।।८८।।**

जीवब्रम्ह रुप मन शब्द सांगतात तो सोहम शब्द आहे तो सोहम शब्द प्रत्येक घटात श्वासात आहे श्वास सोहम शब्द,ओअम शब्द आणि अजप्पा चेतन अशा तीन पैलूंचा बनला आहे याप्रकारे प्रत्येक मनुष्याच्या घटात सोहम शब्द आहे तो शब्द सतशब्द नाही. ।।८८।।

**पारब्रम्ह केवळ कहे कोई ।। होणकाळ के ताई ।।**
**तां सुँ सब्द आद ओ ऊपज्यो ।। जिंग सब्द घट माई ।।८९।।**

होणकाळाला पारब्रम्ह केवल असे काही संत म्हणतात असे अजप्पा पारब्रम्हपासून प्रथम जिंग शब्द उत्पन्न झाला आहे तो ही सतशब्द नाही तो शब्द होणकाळ पारब्रम्हतच आहे म्हणजेच घटातच आहे.।।८९।।

**ता की सता देहे आ कहिये ।। सो बेराट कहावे ।।**
**जाँ मे सब्द अनाहद ऊपनो ।। सो ब्रम्हा मन भावे ।।९०।।**

या जिंग शब्दाची सत्ता घटातपर्यंतच आहे म्हणजे होणकाळाच्या खंड-ब्रम्हंडाच्या वैराटपर्यंतच आहे वैराटा पलिकडील नाही या जिंग शब्दापासून अनहद शब्द उत्पन्न झाला हाच अनहद शब्द ब्रम्हाच्या मनाला प्रिय वाटतो हा अनहद शब्द जिंग पासून जन्मतो

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

म्हणून हा शब्द माया आहे तो सतशब्द नाही. ।।९०।।

तामे नाद ऊपनो आई ।। सोहँ नाभ कवळ मे आयो ।।
रग रग रूँम आतमा पाँचुं ।। चेतन होय सुख पायो ।।९१।।

त्या अनहद शब्दाने नाद उत्पन्न झाला आणि नादपासून सोहम उत्पन्न झाला सोहम नाभी कमळात आला सोहम पासून देहाचे रोम-रोम व पाची आत्मा चेतन झाल्या हंसाने त्याचा देह आणि पाची आत्मा चेतन झाल्यानंतर देहाने पाची विकाराचे सुख घेतले.सोहम शब्दापासून मायेच्या विकाराचे सुख प्रगट झाले म्हणजे माया प्रगट झाली म्हणून अनहद आणि सोहम शब्द हे देखिल सतशब्द नाही. ।।९१।।

सोहँ सब्द सु उत्पत्त सारी ।। जो मुख बोल सुणाया ।।
सतस्वरूप की सत्ता न्यारी ।। सो केहे किणिहन पाया ।।९२।।

मुखाने बोलणारे सर्व ५२ अक्षर हे ओअम शब्दापासून उत्पन्न झाले आणि हा ओअम शब्द सोहम शब्दापासून उत्पन्न झाला घटात प्रगट झालेले जिंग, अनहद, नाद, सोहम, ओअम हे तोंडाने बोलुन दाखवले जातात म्हणजे जिंग हा मुखाने उच्चारला जातो, अनहद हा मुखाने उच्चारला जातो जसे जिंग,अनहद,नाद,सोहम,ओअम मुखाने उच्चारले जातात तसा सतशब्द मुखाने उच्चारला जात नाही असा तोंडाने न उच्चारले जाणारा अखंडित शब्द हा सतशब्द आहे तो सतशब्द सतस्वरुप आहे.त्याची सत्ता या जिंग अनहद,नाद,सोहम, ओअमच्या सत्तेहून वेगळी आहे ती सतस्वरुपाची सत्ता कोणी ही प्राप्त केली नाही.।९२।

नाद अनाद जिंग सो सोहँ ।। सब ब्रम्ह माया होई ।।
ज्हाँ लग कथे बके सो ग्यानी ।। ज्याँ पद लख्यो न कोई ।।९३।।

अनाद चेतन व नाद,अनहद,जिंग,सोहम,ओअम हे सर्व शब्द ब्रम्ह माया आहे ज्याने सतपद पाहिले नाही ते ज्ञानी नाद,अनाद,अनहद,जिंग,सोहम या पदांचे ज्ञान कथतात, बकतात.।९३।

क्या औतार पीर रिष साधु ।। सब ने ब्रम्ह बतायो ।।
पारब्रम्ह निर्गुण लग पूंथा ।। सत्त को भेद न आयो ।।९४।।

जगातील अवतार पीर,ऋषी तसेच साधु हे सर्व पारब्रम्ह निर्गुणची भक्ती करुन पारब्रम्ह पदापर्यंत पोहचते आणि पारब्रम्हचा भेद जाणला परंतु या कोणामध्येही सतपदास पोहचून सतपदाचा भेद आला नाही. ।।९४।।

के सुखराम दोस नही यामे ।। ना वामे सुण भाई ।।
आतो बिधी मिल्या हुवे कारज ।। ऊँच नीच के माई ।।९५।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व अवतार,पीर,ऋषी व साधु जे होऊन गेले तसेच

जे आता आहेत या कोणामध्ये ही दोष नाही असे सांगतात ही विधी त्यांना मिळाली नाही म्हणून त्यांचे महासुखात जाण्याचे कार्य झाले नाही ही विधी मिळाल्यावर उंच राहो वा निच राहो सर्वांचे कार्य होते.।।९५।।

**अेक बात कहु सब माही ।। जे कोई समझे भाई ।।**
**इण नाका सु चुक गया बिधी ।। आ फिर मिले न काई ।।९६।।**

याकरीता एकवेळा लक्ष देऊन समजा जर आज या संधी पासून चुकून गेले तर पुन्हा ही विधी कधी ही मिळणार नाही. ।।९६।।

**ज्या से हंस ऊपनो आदु ।। सो तो पिता कहावे ।।**
**माया आद हंस की जोरू ।। मुरख भेद न पावे ।।९७।।**

हंस ज्याच्या पहिल्यांदा उत्पन्न झाला तो होणकाळ पारब्रम्ह हंसाचे पिता आणि इच्छा ही माता आहे त्या होणकाळ पारब्रम्ह आणि इच्छेपासून रिध्दी–सिध्दी ही माया जन्मते ही रिध्दी–सिध्दी माया आधीपासूनच हंसाची पत्नी आहे अशी रिध्दी–सिध्दी जीवाची पत्नी आहे ती सतस्वरुप सतगुरु नाही,ही रिध्दी–सिध्दी पत्नी जसे देहाची पत्नी पाच इंद्रियांचे सुख देते तसे जीवाला ती रिध्दी–सिध्दी कुळातच ठेवेल आणि मायेचे परचे चमत्काराचे सुख देईल ती सतगुरु सारखे सतविज्ञानाचे सुख देणार नाही म्हणजे काळाच्या मुखातच ठेवेल काळाच्या मुखातून काढणार नाही हा भेद मुर्ख जीव समजत नाही.।।९७।।

**यां दोना सुं अगम अगोचर ।। सतस्वरूप सुण होई ।।**
**रिध न सिध्ध नही संग वाके ।। ग्यान रूप रंग जाणो ।।९८।।**

असे माया माता आणि ब्रम्ह पिता या दोघांपासून सतस्वरुप अगम आहे अगोचर आहे त्या सतस्वरुपात रिध्दी–सिध्दी ही माया नाही त्या सतस्वरुपात विज्ञान ज्ञान आहे अशाच प्रकारे सतस्वरुपी संतामध्ये रिध्दी–सिध्दी राहत नाही सतस्वरुपी संतात विज्ञान ज्ञान असते त्या संताचे रुप,रंग,रिध्दी–सिध्दीचे राहत नाही त्या संताचे रुप रंग विज्ञान ज्ञानाचे असते हे जाणा. ।।९८।।

**ग्यान ही कला ग्यान बल वांके ।। ग्यान रूप रंग जाणो ।।**
**ग्यान ही खाण पीण सुख सारा ।। ग्यान देहे बखाणो ।।९९।।**

जसे जगात गृहस्थी आणि वैरागी राहतात गृहस्थी पाच सुख घेतो परंतु वैरागी हे पाच सुख घेत नाही तो ज्ञानाचे सुख घेतो,त्याचे खाणे–पिणे सर्व ज्ञानाचे राहते तसेच सतस्वरुप वैराग्य विज्ञानी रिध्दी–सिध्दीचे परचे चमत्काराचे सुख घेत नाही तो वैराग्य विज्ञानाचे सुख घेतो त्याच्या जवळ विज्ञानाची सत्त कला असते त्याचे रुप,रंग,विज्ञान ज्ञानाचे असते वैराग्य विज्ञान हेच त्याचे बळ असते त्याचे खाणे–पिणे विज्ञान वैराग्याचे

।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

असते त्याचा देह विज्ञान ज्ञानाचा असतो त्याचे सर्व सुख विज्ञान वैराग्याचे असते ते सुख माया ब्रम्हच्या ज्ञानी,ध्यानीला समजत नाही ते सुख ज्याच्यात सतस्वरुप प्रगट होतो त्यालाच समजतो. ।।९९।।

**आणंद रूप पद वो असो ।। नकल कही म्हे आणी ।।**
**माया ब्रम्ह सकळ ज्यु धंधा ।। ज्यूँ जग च्यारू खाणी ।।१००।।**

आनंदपदाचा संत कसा असतो त्याची नक्कल वेदी वैरागी हा आहे त्याची अस्सल मुखाच्या शब्दांनी सांगता येत नाही आता माया ब्रम्ह अस्सल मध्ये कसे आहे?हे समजू जगात जरायुज,अंडज,अंकुर व उद्‌बीज हे ४३,२०,००० वर्षाच्या ८४,००,००० योनीच्या चार खाणी आहेत. ।।१००।।

**उपजे खपे नही थिर कोई ।। सुख दुख सब ही पावे ।।**
**पारब्रम्ह लग हे दु:ख लारे ।। कम जाफा होय आवे ।।१०१।।**

या चार खाणीत उपजणे,मरणे चालून राहीले आहे उपजण्या खपण्यापासून मुक्त असा स्थिर म्हणजे अमर कोणी नाही.त्या चारी खाणींमध्ये जीव सुख-दु:ख दोन्ही प्राप्त करुन राहिले काही जीव पारब्रम्ह जे स्थिर पद आहे तेथपर्यंत ही पोहचतात तेथे काही वेळ राहतात परत खाली मायेमध्ये येऊन तीन लोकाच्या चार खाणीत उपजतात अशाप्रकारे पारब्रम्हच्या स्थिर पदात पोहचल्यावर नंतरही दु:ख मागेच लागलेले राहते अशाप्रकारे जीव कमी जास्त सुख-दु:ख भोगत राहतो.।।१०१।।

**जन सुखराम साच मुख भाक्यो ।। बाधा रखी न काई ।।**
**केवळ मत समझ परे पेली ।। सो नर समझे आई ।।१०२।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज ज्ञानी, ध्यानींना सांगतात, मी जे जे सत्य आहे ते बोललो आहे त्यात काही कसर नाही ठेवली माझ्या या वचनांना माया ब्रम्हच्या पलिकडे ज्याचे मत आहे असा केवळी मताचा मनुष्यच समजेल. ।।१०२।।

**ओर सकळ जग मान न सक्के ।। केवळ मत्त बिन कोई ।।**
**आगे लारे समझ हुवे केती ।। नेक न भ्यासे सोई ।।१०३।।**

ज्याला केवळ मत नाही असे जगाचे ज्ञानी,ध्यानी,स्त्री-पुरुष माझे ज्ञान समजु शकणार नाही केवलच्या समज शिवाय माया ब्रम्हची किती ही मागची पुढची समज राहीली तरी ही माझे ज्ञान जराही समजण्यात येणार नाही. ।।१०३।।

**अेक अर्थ म्हे खोल बताऊं ।। प्रगट सुणज्यो सारा ।।**
**पारब्रम्ह आणंद पद ता को ।। केहुं बिध भेद बिचारा ।।१०४।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज पुढे सांगतात पारब्रम्ह व आनंदब्रम्हचा भेद तसेच विधी समजण्याकरीता एक आणखी जगाचा दाखला उघड करुन सांगतो ते सर्व ज्ञानी,

ध्यानी, स्त्री–पुरुष लक्ष देऊन ऐका. ।।१०४।।

**ज्यु जग किसब कळा बिध सारी ।। यू रिध सिध्ध सब होई ।।**
**सत्त बेराग बिग्यान कहावे ।। ज्यूं आणंद पद जोई ।।१०५।।**

जसे जगातील गृहस्थी लोकांजवळ अनेक प्रकारचे हुन्नर आणि कला असते तशीच माया ब्रम्हच्या संता जवळ रिध्दी–सिध्दीच्या अनेक प्रकारच्या पर्चे–चमत्काराच्या कला असतात जगात जसे वेदी वैरागी साधु असतात त्यांच्याजवळ वेदांचे वेगवेगळ्या प्रकारचे ज्ञान असते अशाचप्रकारे सत वैराग्य विज्ञान आनंदपदाच्या संताजवळ विज्ञान ज्ञान वेग–वेगळ्या प्रकारचे असते.।।१०५।।

**पुर्णब्रम्ह कहो तुम केवळ ।। तामे रिध सिध सारी ।।**
**ज्यूं कोयी स्हेर माँय सब सस्तर ।। नाँ नाँ बिध का भारी ।।१०६।।**

ज्या पूर्ण ब्रम्हला तु केवल म्हणतो त्याच्यात माया नाही असे म्हणतो परंतु त्याच्यातच तर सर्व रिध्दी सिध्दी भरली आहे.त्याच्याने तर सर्व रिध्दी–सिध्दी जगात प्रगट होते जसे कोण्या शहरात अनेक प्रकारचे शस्त्र असतात ते शस्त्र बाहेर दिसत नाहीत परंतु युध्द सुरु झाल्यावर ते शस्त्र बाहेर काढतात जसे ते शस्त्र जगातच असतात आणि युध्द सुरु झाल्यावरच काढतात अशाच प्रकारे रिध्दी–सिध्दी पूर्ण ब्रम्हमध्येच असते. ती पूर्ण ब्रम्हच्या ज्ञानींना ही समज असते ते ज्ञानी गरज पडल्यावर त्याचा पर्चे चमत्काराच्या रुपात उपयोग करतात परंतु विज्ञान हे शहरात जसे शस्त्र राहतात तसे जगात राहत नाही जसे राईट बंधुमध्ये विमानाचे विज्ञान ज्ञान प्रगटले.।।१०६।।

**सब ही के सब जक्त मे होई ।। एक बिध्ध आ नाही ।।**
**जो बिग्यान केहुँ म्हे तुम कू ।। ता की समझ न माही ।।१०७।।**

हे विज्ञान जगाच्या एखाद्या मनुष्यात प्रगट होते सर्वांमध्ये अशी विज्ञानाची समज राहत नाही अशाचप्रकारे माया आणि ब्रम्हच्या सर्व ज्ञान्याजवळ रिध्दी–सिध्दी असते परंतु सतस्वरुपाच्या विज्ञानाची समज राहत नाही ती विज्ञानाची समज ज्याच्यात सतकला प्रगट झाली आहे त्याच्यात राहते.।।१०७।।

**यु औतार ब्रम्ह नही जाणे ।। सतस्वरूप के ताई ।।**
**इनके कळा रिध सिध होई ।। ज्यू लस्कर जग माई ।।१०८।।**

तसेच हे अवतार आणि ब्रम्ह हे ही त्या सतस्वरुपाला जाणत नाही अवतारांची कला रिध्दी सिध्दीची आहे ज्याप्रकारे संसारात राजा जवळ लष्कर असते त्याचप्रकारे अवतारांजवळ रिध्दी–सिध्दी असते.।।१०८।।

**ज्यु बिग्यान रूप जन जग मे ।। तिनके सता कहावे ।।**
**और किसब जुग को कुछ नाही ।। ना ऊस पद मे मावे ।।१०९।।**

जसे जगात कोणी विज्ञानी(शास्त्रज्ञ)बनतो त्या विज्ञानीची चाल तुम्हाला सांगतो त्या विज्ञानी मध्ये संसाराच्या उद्योगाचे कोणते ही हुन्नर राहत नाही ना त्याला कोणता उद्योग येतो ना त्याला कोणते उद्योग आवडतात त्याला फक्त विज्ञान ज्ञान समजते, तेच त्याला आवडते अशाचप्रकारे सतपदाच्या संतामध्ये सतविज्ञानाची सत्ता असते. अशा सतपदाच्या संताच्या सत्तेमध्ये रिध्दी–सिध्दीला पर्चे चमत्कार करण्याकरीता कला प्रगटत नाही. ।।१०९।।

**यु सुखराम कहे सब सुणज्यो ।। सत भक्त बिध न्यारी ।।**
**तामे काळ रूप सो करणी ।। ग्यान द्रष्ट ऊर भारी ।।११०।।**

अशाचप्रकारे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व जगाला,ज्ञानी,ध्यानींना सांगतात सतभक्ताची विधी या सर्व रिध्दी–सिध्दींच्या विध्यांहून निराळी आहे अशा सतभक्ता मध्ये रिध्दी–सिध्दीच्या पर्चे चमत्काराच्या काळरुपाच्या करण्या राहत नाही सतभक्ताच्या उरात सतस्वरुप विज्ञानाज्ञानाची भारी दृष्टी भरलेली राहते.।।११०।।

**पाप न पुन्न न माने अेकी ।। न कीया डंड लागे ।।**
**ऊलटा कर्म धर्म सो चावे ।। भाग हमारो ई जागे ।।१११।।**

सतभक्तामध्ये भारी सत्तविज्ञान दृष्टी राहते त्या विज्ञान समज मुळे तो पुण्य म्हणजे देवतांच्या सुखांचे उंच कर्म मानत नाही तसेच पाप म्हणजे नरकाच्या दुःखांचे निच कर्म मानत नाही या सर्व कर्मांना तो काळाच्या मुखातील माया मानतो या व्यतिरिक्त अशा सतज्ञानीने निचकर्म केले तरी ही त्याला लागत नाही म्हणून त्याला नरकाचा दंड लागत नाही हे निच कर्म आणि धर्म जगाचे उंच कर्मीय व उच्च धर्मीय लोक करत नाही त्यांनी ही हे निचकर्म आणि निचधर्म करावे असे निच कर्म आणि निच धर्म चाहतात परंतु ते करत नाही म्हणून असे निच कर्म आणि निच धर्म सतपुरुषांनी करावे असे उलट चाहतात सतपुरुषांनी निचकर्म आणि निचधर्म केले तर ते निचकर्म व निचधर्म उंच बनून जातात उंच बनून गेल्याने सर्व उंच लोक त्या धर्मांना आणि कर्मांना प्रेमाने करतात संतांनी हे धर्म आणि कर्म केल्याने निचकर्माचे उंच कर्म बनून जाते व उंच कर्माच्या गणतीत येतो तसेच निच धर्माचा उंच धर्म बनून जातो व उंच धर्माच्या गणतीत येतो असे भाग्य बदलून जाते कर्म धर्म हलके भाग्याचे मोठे भाग्यवान बनून जातात म्हणून निच कर्म आणि उंच कर्म संतांकडून बनल्यावर स्वतःला भाग्यवान समजतात. ।।१११।।

**जो कोई चीज अर्थ सो लागे ।। तो सबही सुख पावे ।।**
**पांचुँ भोग आत्मा कुस होवे ।। दावो कोईन चावे ।।११२।।**

जसे जगात मोठे पराक्रमी मनुष्याच्या कामामध्ये कोणाची कोणती वस्तु आली तर त्याचे

सर्व संबंधी लोक खुश होतात तसेच संतत निचकर्म किंवा निचधर्म करुन पाची भोग घेतो त्याची पाची आत्मा खुष होतात,तर माया आणि ब्रम्ह खुष होतात जसे मोठ्या पराक्रमी मनुष्याच्या कामात आलेल्या वस्तुला देणारा परत मागण्याचा दावा करीत नाही तसेच माया आणि ब्रम्ह अशा महापुरुषांकडून झाले ते निच कर्म आणि निचधर्माच्या प्रित्यर्थ नरक भोगविण्याचा दावा करीत नाही. ।।११२।।

**घणी क्हाँ लग कहुं तुम तांई ।। जे देल कुंई ढयावे ।।**
**तो पण पाप न लागे जन कू ।। वो हंस पदवी पावे ।।११३।।**

मी सतस्वरुपी संतांच्या पराक्रमाची महीमा कोठपर्यंत करु?अशा संताच्या हातून कोणी जीव ही मरुन गेला येथ पर्यंत की कोणी मनुष्य मरुन ही गेला तरीही त्या संताला पाप लागत नाही तसेच तशा मरणाऱ्या जीवाला पदवी मिळते तो ८४००००० योनीचे किंवा अगतीच्या दु:खातून मुक्त होऊन जातो.त्याला पुढे चालुन मनुष्य देह मिळाल्यावर सतशब्दाची सत्ता मिळण्याचे योग बनतात आणि तो अमरलोकात जातो.।।११३।।

**ताँ को सुणो भेद सब ग्यानी ।। जग दिष्टांग बताऊं ।।**
**राज जोग ओ राजा जे से ।। फिर जन को गुण लाऊँ ।।११४।।**

सतस्वरुप भक्ताला पाप-पुण्य का नाही लागत?यावर आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व जगाच्या ज्ञानींना सांगतात की मी जगाचा एक दृष्टांत देतो जसे जगात राजा असतो तसेच होणकाळात राजयोगी संत असतो या दोघांमध्ये गुण सारखे असतात. ।।११४।।

**याँ दोना कुं डंड ना लागे ।। किसी रीत को कोई ।।**
**साहेब सोख भोग संभोगे ।। बेर न बांधे हे लोई ।।११५।।**

राजाने कोणत्या स्त्री सोबत निचकर्म केले तरी ही राजाला कोणत्याही प्रकारचा दंड लागत नाही कारण राजावर दंड देणारा राजापेक्षा मोठा कोणी राहत नाही तसेच राजा हाच राज्याचा सर्वात मोठा बलवान व्यक्ती राहतो.त्याच्या जवळ धन,लाव-लष्कर, फौज-फाटा सर्व बल राहते म्हणून त्याच्याशी कोणी वैरही बांधत नाही अशाचप्रकारे केवली संताने पर स्त्री सोबत हलके निच कर्म केले तरीही त्याला माया ब्रम्ह दंड देत नाही सतस्वरुप संतामध्ये सत परमात्मा असतो दुसऱ्या शब्दात सतपरमात्मा म्हणजेच केवली संत असतो होणकाळात सतपरमात्म्याहून कोणी ही मोठे राहत नाही तसेच हा भोग संताच्या प्राणाने नाही घेतले संतामधील सर्वांचा साहेब आहे त्याने घेतले म्हणून माया आणि ब्रम्ह राजयोगीला दंड लावत नाही सतस्वरुपी सतपरमात्मा पेक्षा होणकाळात कोणी मोठा नाही म्हणून त्याने चुकीचे ही केले तरी ही माया आणि ब्रम्ह

अशा राजयोगीशी वैर बांधत नाही. ।।११५।।

**जो कोई चीज मंगावे राजा ।। खुसी हुवे घर सारो ।।**
**धिन धिन भाग सकळ यु केहे ।। अब कछु होणे हारो ।।११६।।**

राजाने कोणाकडून काही वस्तु मागवली तर ज्याच्या येथून राजाने वस्तु मागवली तो व त्याचे घरावाले सर्व खुश होतात आणि जगाचे सर्व लोक त्याचे भाग्य धन्य आहे असे म्हणतात आणि राजा त्याचे निश्चित खूप करेल असे जगाचे लोक मनात समजतात. ।।११६।।

**हात घाल कर ले कुछ काई ।। तो पण बुरोन माने ।।**
**बेटी बेन नार लग खेचे ।। जब लग रहे सब छाने ।।११७।।**

राजाने कोणाला न मागता सरळ घरातून हात टाकून कोणती वस्तु घेतली तरी ही कोणी ही म्हणत नाही येथ पर्यंत की बहिण,मुलगी,स्त्री ही ताणून घेऊन गेला तरी ही ती गोष्ट उजागर होऊ देत नाही त्या गोष्टीला लपवून ठेवतात अशाचप्रकारे राजयोगीचे गुण आहेत त्याच्याने निचकर्मा हून निचकर्म झाले तरी ही माया आणि ब्रम्ह आपले भाग्यच समजतात. ।।११७।।

**ज्यूं बेराग लियाँ कुळ दावा ।। सब जग का रद होई ।।**
**उलटा सकळ पूजणे लागे ।। दंड ना मागे कोई ।।११८।।**

जसे संसारातील कोणी व्यक्ती वैरागी बनतो त्याच्या वैरागी बनण्याच्या आधी कुळाचे त्याच्या वरचे घेण्या-देण्याचे जे दावे होते,ते वैरागी बनताच रद्द होऊन जातात तसेच जगाचे समाजाचे गावाचे राज्याचे सर्व दावे रद्द होऊन जातात उलट कुळाचे,समाजाचे गावाचे,राज्याचे सर्व लोक त्याला पुजु इच्छीतात त्याच्या हाताने दंड लागेल असे काही चुकीचे झाले तरीही कुळ,समाज,गाव व राज्य त्याच्याकडून दंड मागत नाही अशाच प्रकारे हंस माया व ब्रम्हच्या कुळापासून वेगळे होऊन सत वैरागी बनतो अशा सतवैरागी हंसापासून माया आणि ब्रम्ह हे कर्माचे घेण्या-देण्याचे दावे रद्द करुन देतात आणि दोघे ही सतवैराग्याला पुजतात अशा सतवैराग्याकडून होणकाळाचे दंडनीय कर्म ही बनले तरी ही सतवैराग्याला दंड देत नाही. ।११८।

**ब्हो बिध चीज खुवावे लायर ।। पांच भोग लग भाई ।।**
**ना बदले कुछ जीम्यो चावे ।। जन के घरे वे आई ।।११९।।**

अशा वैराग्याला विविध प्रकारचे व्यंजन खाऊ घालतात व त्या वैरागीला पाची भोगांपर्यत सर्व सुख पोहचवितात या सर्व सुखांच्या देण्याच्या बदल्यात त्या वैरागीच्या घरी सुख पोहचविणारे त्याच्या घरी जाऊन भोजन देखिल करीत नाही इतकी त्या वैरागीची मर्यादा पाळतात.।।११९।।

यूँ अे पाप पुन्न नही लागे ।। राज जोग कू भाई ।।
ज्यूँ बेराग लिया सुण तूटे ।। दोय दंड इण काई ।।१२०।।

जसे वैरागीच्या कुळाचे,कुटूंबाचे तसेच राजाचे घेण्या–देण्याचे दोन्ही दंड तुटून जातात तसेच राजयोगी ही वैरागीच्या माया ब्रम्हचे पाप–पुण्याचे दोन्ही दंड तुटून जातात. ।।१२०।।

कुळ गिन्यात उलट कर पूजे ।। दावो करे न कोई ।।
भावे तिकण मते वे चाले ।। सब जग हजर होई ।।१२१।।

वैरागी कुळ आणि जातीचे तसेच जगातील लोकांना चांगले वाटत नाही अशा मताने ही चालला तरी ही त्या वैराग्यावर तु चुकीचे केले असा दावा कुळ,जात व जगाचे लोक करीत नाही उलट त्याच्या सन्मुख होऊन त्याला पुजायला हजर होतात. ।।१२१।।

राज दंड हासंल नही माँगे ।। ब्हो बिध पूजे आई ।।
बेटी धुराधुर सो देवे ।। राजा जना कू भाई ।।१२२।।

अशाचप्रकारे राजा ही त्या वैरागीकडून दंड वा कर मागत नाही त्याच्या नंतर त्याची नाना विधीने पुजा करतो कधी कधी कोणी राजा अशा वैराग्याला आपली मुलगी तसेच राज्य पण देऊन देतो.।।१२२।।

यु अे आप पुन्न हुवे हाजर ।। दावो करे न कोई ।।
माया ब्रम्ह सकळ सो बंदे ।। को दंड ले कहुँ तोई ।।१२३।।

अशाचप्रकारे राजयोगीकडून पाप–पुण्य म्हणजे उंच–निच कर्म त्याच्या हाताने होण्या–करीता हाजर राहते तसेच पाप पुण्याच्या कर्मांचे फळ राजयोगीने भोगायला पाहिजे असे पाप–पुण्य राजयोगीवर दाव ही करीत नाही त्या संताची माया आणि ब्रम्ह दोन्ही वंदना करतात पाप पुण्य भोगणारे जगात माया आणि ब्रम्हच आहे यांच्या शिवाय कोणी ही नाही राजयोगीला जेव्हा माया ब्रम्हच वंदना करतात तर राजयोगीकडून पाप–पुण्य ते कसे भोगवतील? ।।१२३।।

अे तो सदा कहे धिन्न दोनू ।। दरसण जन को चावे ।।
हाजर लियाँ खड़ा नित आगे ।। जो जन के मन भावे ।।१२४।।

हे माया ब्रम्ह दोन्ही ही राजयोगीला धन्य म्हणतात व अशा राजयोगीच्या दर्शनाची चाहणा ठेवतात ही माया–ब्रम्ह राजयोगीच्या मनात आवडते अशा वस्तु घेऊन नेहमी हजर उभे राहतात.।।१२४।।

नित आधीन ब्रम्ह सो माया ।। जन नही चावे काई ।।
रिध सिध आण धरे कहुँ च्रणा ।। पिन जन माने नाई ।।१२५।।

हे माया आणि ब्रम्ह अशा संतांशी नित्य आधीन राहतात परंतु संत माया ब्रम्हची कोणती

वस्तु चाहत नाही हे माया ब्रम्ह जनाच्या चरणात रिध्दी सिध्दी सुध्दा आणून ठेवतात तरी ही संत माया बम्हची गोष्ट मानत नाही. ।।१२५।।

ता को सुणो भेद म्हे भाकू ।। दिष्टांग देर सुणाऊँ ।।
जिऊँ बिग्यान ऊपजे किस कु ।। वो प्रसंग सुण लाऊँ ।।१२६।।

सर्व जगत माया ब्रम्हपासून रिध्दी–सिध्दी चाहतात रिध्दी सिध्दी प्राप्त करण्याकरीता करण्या करतात तीच रिध्दी सिध्दी माया ब्रम्ह संतांच्या चरणात आणून टाकतात तरी ही संत त्यांची गोष्ट मानत नाही याचे काय कारण आहे?यावर मी एक दृष्टांत ऐकवतो जसे जगात कोण्या व्यक्तीला विज्ञान प्रगट होऊन गेले आहे अशा व्यक्तीचा प्रसंग आणतो ते ऐका.।।१२६।।

मा अर बाप सनमुख जायर ।। अरज करे आ जाई ।।
प्रणो आप धन मो लेवो ।। तो नही माने काई ।।१२७।।

अशा विज्ञानी व्यक्तीला आई वडिल समोर जाऊन त्याला अर्ज करतात की,माझे धन घे,माझा माल घे आणि विवाह करुन घे.विज्ञानात लीन झालेला व्यक्ती आई–वडिलांची गोष्ट मानत नाही त्याला या गोष्टींमध्ये आनंद येत नाही त्याला विज्ञानातच आनंद येतो. ।।१२७।।

पुन प्रसाद सेज मे नित प्रति ।। प्रेम प्रीत सू लावे ।।
ता को नही कुछ भर कारण ।। पाँच भोग लग पावे ।।१२८।।

आणि पुन्हा सहजमध्ये प्रेम–प्रिती नित्यप्रती भोजन आणतात विज्ञानी सर्व पाच भोगापर्यंत सुध्दा भोगून घेतो परंतु विज्ञानाच्या पुढे या वस्तुंना गुंजभर ही मानत नाही. ।।१२८।।

ईऊं गत राज जोग की भाई ।। रिध सिध कळा न माने ।।
हंसा हेत सेज तन मन लग ।। सिष सेवा सत्त जाणे ।।१२९।।

अशाचप्रकारे राजयोगाची गती आहे तो विज्ञान वैराग्याच्या समोर रिध्दी–सिध्दीच्या कला गुंजभरही मानत नाही अशा विज्ञान वैराग्याशी जगत सहजमध्ये प्रिती करते त्याच्या जवळ रिध्दी–सिध्दी आहे किंवा नाही हे पाहून प्रिती करत नाही अशा विज्ञान वैरागीला तन,मन,धन सुध्दा जगाचे लोक अर्पण करतात त्यांचे शिष्य त्याची सेवा करणे आपला सत्त धर्म जाणतात. ।।१२९।।

जिऊं संसार माहे जन हुवा ।। दावो मुदो न कोई ।।
ना कुछ रीज देण कू माया ।। ना कुळ की पुछ होई ।।१३०।।

जसे संसारात वैरागी असतो त्याच्यावर कुळ,जग आणि राजाचा दावा,मुद्दा राहत नाही तसेच त्याच्या जवळ संसाराचे आणि कुळाच्या लोकांना देण्याकरीता माया ही राहत

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

नाही तसेच त्याला कुळाच्या प्रती संबंध ही राहत नाही. ।।१३०।।

कुळ सुं जोर न जग सु दावा ।। राज धुराधर भाई ।।
इऊँ सतस्वरूप ब्रम्ह सेंई न्यारा ।। रिध सिध जोर ना माई ।।१३१।।

त्याच्यात कुळ व जगाचा जोर राहत नाही म्हणून कुळ व जगाच्या जोराचा कोणी दावा ही करत नाही त्याच्यात राजाचा ही जोर चालत नाही म्हणून राजाच्या जोराचा ही कोणी दाव करत नाही अशाप्रकारे सतस्वरुपी विज्ञानी असते.तो माया ब्रम्हच्या कुळा पेक्षा वेगळा राहतो माया ब्रम्हच्या पसाऱ्या पेक्षा निराळा राहतो होणकाळ ब्रम्हपेक्षा निराळा राहतो म्हणून त्याच्यात रिध्दी-सिध्दींचा पर्चे चमत्कार करण्याचा जोर राहत नाही. ।।१३१।।

मार कूट अर त्रास बतावे ।। धन पदवी दे माया ।।
आ तो रित ब्रम्ह के घर मे ।। जिऊँ जग कुळ मे भाया ।।१३२।।

जसे कुळात आणि जगात मारुन-कुटुन तसेच त्रास देऊन धन किंवा पदवी मिळते अशाच प्रकारचा व्यवहार माया-ब्रम्हच्या घरात आहे माया-ब्रम्ह ही जगाच्या जीवांना मारुन-कुटुन तसेच त्रास देऊन म्हणजे खुप-खुप कष्टाने क्रिया करणी केल्यावर रिध्दी-सिध्दीचे पद तसेच धन देतात ते करणीचे बळ संपले की ते जन जसे आधी बिना रिध्दी-सिध्दीचे होते जसे बनून जातात असे नेहमी सुख देणारे पद नाही असत्य पद आहे.।।१३२।।

सतस्वरूप सत्त जिऊँ होई ।। ग्यान दिष्ट सुण लीजे ।।
बिना ग्यान कोई जोर न जन मे ।। इयाँ ऊर निर्णो कीजे ।।१३३।।

सतस्वरुप हे माया ब्रम्हसारखे असत्य नाही ते सत्य आहे त्याच्यात विज्ञानाचा पराक्रम आहे त्याच्यात विज्ञानाचा जोर आहे,त्याच्यात रिध्दी-सिध्दी या मायेचा जोर नाही.ते विज्ञान सत्य आहे एक वेळा संतात प्रगट झाले की सदा सुख देणारे आहे हे ज्ञान दृष्टीने पाहून ते माया ब्रम्हपासून कसे वेगळे आहे?हा हृदयात निर्णय करा. ।।१३३।।

के सुखराम सुणो सब ग्यानी ।। समज भेद ओ लीजे ।।
केवळ ब्रम्ह परे पद पूरण ।। ताँ को सिंव्रण किजे ।।१३४।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व ज्ञान्यांना समजावतात की माया ब्रम्हमध्ये खुप कष्टाने सुख मिळते ते ही नेहमीकरीता राहत नाही आणि सतस्वरुपात सदा बिना कष्टाने सुख मिळते हा फरक समजा म्हणून केवळ पारब्रम्हच्या पलिकडचे पूर्ण आनंदपद आहे त्याचे स्मरण करा. ।।१३४।।

पारब्रम्ह लग हे दुःख लारे ।। निर्भे मोख न होई ।।
जे तम मान सको नही भाई ।। तो भेद बताऊं तोई ।।१३५।।

पारब्रम्ह केवळ मध्ये मोक्ष आहे परंतु निर्भय मोक्ष नाही त्या संताला वेळेनुसार गर्भात येण्याचे दु:ख भोगावेच लागते यावर तुमचा विश्वास बसत नाही तर मी पारब्रम्ह केवळ प्राप्त केल्यानंतर गर्भात यावे लागते हे जगाचा प्रसंग सांगून समजवितो.।।१३५।।

**जग को देर दाखलो तोने ।। सत ओ न्याव सुणाऊँ ।।**
**जिऊं नर धंदो करे जग माहीं ।। अेक कहे तज जाऊँ ।।१३६।।**

जगाचा दाखला देऊन पारब्रम्हचा सत्य न्याय काय आहे? हे सांगतो जसे जगात दोन व्यक्ती धंदा करुन राहिले होते त्यातील एका व्यक्तीने धंदा सोडून दिला. ।।१३६।।

**वेसो ब्रम्ह जीव वो कहिये ।। फंद करे सो भाई ।।**
**वो तज काम नचीतो हुवो ।। धोको कछु न माई ।।१३७।।**

धंदा करणाऱ्या व्यक्तीचे धंद्याचे सर्व फंद जसे माल आणणे विकणे उधारी वसुल करणे,सरकारचा कर भरणे हे सुरु आहे धंदा करणाऱ्याला तोटा होण्याचा धोका बनला आहे या सर्व गोष्टींनी धंदा करणारा व्यक्ती चिंतेत आहे परंतु ज्याने धंदा त्यागून दिला,त्याचे माल आणणे,विकणे,उधारी वसुल करणे हे सर्व फंद कटून गेले त्याला नफा तोट्याचा थोडा ही धोका नाही राहिला त्याला धंद्याची कोणत्या प्रकारची चिंता राहीली नाही तो निश्चित होऊन गेला.।१३७।

**अेके दु:ख काज फंद त्याग्या ।। कहे मुज धंदो न होई ।।**
**केवळ ब्रम्ह सुणो इण पड ।। न्हेचे दु:ख न कोई ।।१३८।।**

जसे एकाला धंदा करता येत होता तरीही सोडून दिला तसेच एकाने धंद्याच्या कामात अनेक दु:खाचे फंद आहेत हे दु:खाचे फंद माझ्याने होत नाही म्हणून धंदा बंद करुन दिला केवल ब्रम्ह या दोघांचे धंदे सोडण्यासारखे आहे धंदा सोडल्यानंतर दोघे जसे निश्चिंत होऊन गेले तसेच केवली ब्रम्ह संत मायेच्या करण्यांच्या कष्टापासून निश्चिंत होतात. ।।१३८।।

**सब फंद काट नचीता हुवा ।। कसर रही नही आई ।।**
**अेक जात कुळ छूटे नाही ।। ग्यान न ऊगो माई ।।१३९।।**

दोघे धंद्याचे दु:खाचे फंद कापून निश्चिंत झाले निश्चित होण्यात काही कसर राहीली नाही परंतु दोघांचे ही जात व कुळ सुटले नाही ते वेदाचे ज्ञानी नाही झाले ते वैरागी नाही बनले अशाचप्रकारे केवल ब्रम्ह बनून मायेचे फंद सुटतात परंतु माया–ब्रम्हची जात व कुळ सुटत नाही आणि सतस्वरुप विज्ञान प्रगट होत नाही. ।।१३९।।

**जब किणी समे न्यात मे च्रचा ।। काम पडयो बिध आणी ।।**
**जब वां घेर न्यात कु पकड्यो ।। धन दियो ब्हो आणी ।।१४०।।**

जेव्हा काही वेळेस कुळ जातीत धन,मालाचे काम पडले तर धंदा बंद करुन देणारे दोघे

ही उद्योगी कुळापासून वेगळे न झाल्याकारणाने कुळ परिवार तसेच जातीवाल्याला आपल्या जवळील धन काढून देतात हेच धंदा सोडून वैरागी बनला तर कुळापासून वेगळा राहतो त्याला कुळ परिवार तसेच जातीशी काही घेण्या-देण्याचा संबंधच राहत नव्हता व त्याच्या जवळ द्यायला धनही राहत नव्हते याकारणाने कुळात येऊन कुळाचे काम करत नसता. ।।१४०।।

इंऊं ब्रम्ह होय जीव हुवे भाई ।। सुणो सकळ जग ग्यानी ।।
जो बेराग ग्यान पद होतो ।। तो नही पड़तो आनी ।।१४१।।

अशाचप्रकारे होणकाळ पारब्रम्ह केवल पदामध्ये गेलेल्या ब्रम्ह संताचे होते या ब्रम्ह संताजवळ सतविज्ञान नसते या ब्रम्ह संताजवळ पारब्रम्हची रिध्दी-सिध्दी असते जेव्हा धरतीवर रिध्दी-सिध्दीच्या बळावर राक्षस जगाला दुःख देतात तेव्हा हे ब्रम्ह संत पारब्रम्ह सोडून जगात येऊन जीव बनतात आणि आपली रिध्दी-सिध्दीचा जगात उपयोग करतात जगात येऊन ब्रम्हचा जीव बनल्यामुळे जगात गर्भ तसेच आवागमनाचे दुःख भोगतात.ह्याच संताने वैराग्य विज्ञान पद प्रगट केले असते तर तो जगात जीव ब्रम्ह बनून आला नसता त्याच्या जवळ सतज्ञान राहिले असते सतज्ञान दृष्टीने त्याला माया ब्रम्हचे सर्व खेळ असत्य दिसले असते बिना साराचे दिसले असते हे राक्षसांमध्ये अनीतीचा जोर आणण्याचे कार्य माया ब्रम्हनेच केले हे ज्ञानाच्या न्यायाने दिसत होते माया-ब्रम्हच काही जीवांना राक्षसी रिध्दी-सिध्दी देतात आणि लढण्याकरीता बलवान बनवतात तर काही जीवांना दैवीक रिध्दी-सिध्दी देतात आणि राक्षसांना मारण्या करीता प्रेरीत करतात हा त्यांचा नेहमीचा खेळ आहे हे सतस्वरुपी विज्ञानीला सतज्ञानाच्या दिव्यदृष्टीने समजत राहते म्हणून ते यांच्या फंदांमध्ये पडत नाही उलट यांच्या फंदांमधून निघण्याचा जोर लावतात ही दिव्य दृष्टी होणकाळ केवल मध्ये पोहचलेल्या ब्रम्हला येत नाही. ।।१४१।।

ना गिन्यात लेत सो माही ।। जे या को मन चावे ।।
इऊं सतस्वरूप की कळा प्रगटया ।। आवागवण न आवे ।।१४२।।

जसे कुळातून व जातीतून निघालेल्या वैरागीचे मन कुळात कष्ट पडल्यावर परत कुळात जायचे झाले तरी ही कुळाचे व जातीचे लोक त्याला कुळात घेत नाहीत जसे वैरागीला कुळात घेत नाही याकरीता त्याच्यावर संसाराच्या घेण्या-देण्याचे फंद पडत नाही असेच सतस्वरुपी वैरागीला माया-ब्रम्ह घेत नाही म्हणून त्याला आवागमनाचा फंद लागत नाही. ।।१४२।।

निर्भे मोख ग्यान पद पायाँ ।। ब्रम्ह हुवाँ सुण नाही ।।
ओ तो अंग एक सुखरूपी ।। रहे कुळ पंगत मांही ।।१४३।।

अशाप्रकारे महासुखाचे निर्भय मोक्ष पद केवल पारब्रम्हचे ब्रम्ह बनल्याने प्रगट होत नाही निर्भय मोक्षपद सतस्वरुपाचे विज्ञान प्रगटल्यावरच होते हे केवळ ब्रम्ह होणे हा एक ब्रम्ह बनण्याचे सुखरुपी भाव राहतो जसे धंदा सुटल्याने किंवा सोडून दिल्याने धंद्याचे फंद तुटेल याचे सुख मिळते तसे मायेच्या करण्यांचे कष्ट सुटून गेले,त्याचे सुख त्याला मिळते जसे सुटून जाणे किंवा सोडणाऱ्याचे कुळ कुटूंब सुटत नाही याप्रकारे केवळ पारब्रम्हचे माया ब्रम्हचे कुळ सुटत नाही तो माया ब्रम्हच्या कुळात राहत नाही. ।।१४३।।

**आवागवण मिटे नही यांकी ।। ओ फिर किसब कमायो ।।**
**ऊण तो सतस्वरूप नही पायो ।। वो कुळ तज नही आयो ।।१४४।।**

जसे धंद्यावाल्याने धंदा सोडला परंतु कुळ नाही सोडले,कुळातच राहीला वैरागी बनला नाही त्याच्यात वैराग्य आले नाही याकारणाने प्रसंग आल्यावर धंदा सोडलेली व्यक्ती परत धंदा टाकून धंद्यात लागुनच जाते त्याचप्रकारे कैवल्य पारब्रम्हीचे होते तो कैवल्य पारब्रम्ही सतवैरागी बनला नाही त्याच्यात सतवैराग्य प्रगट झाले नाही या कारणाने तो पारब्रम्ही प्रसंग आल्यावर परत मायेच्या कर्म-कांडात लागूनच जातो याकारणाने त्या पारब्रम्ही संताचे आवागमन मिटत नाही होणकाळातून मुक्त होण्याचे कार्य होत नाही. ।।१४४।।

**ब्रम्ह होण की दोय ऊपायाँ ।। सुण पिंडत क्हुँ ग्यानी ।।**
**जो दोनू हंसे बस भाई ।। प्रगट नही जग छानी ।।१४५।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज पंडितांना सांगतात की,केवली पारब्रम्ही होण्याचे दोन उपाय आहे दोन्ही उपाय हंसांच्या हातात आहे ते दोन्ही उपाय प्रगट आहे लपलेले नाहीत.।।१४५।।

**ज्यूँ धन क्षिण स्हेज मे हुयगो ।। दमड़ी एक न होई ।।**
**दूजे सर्ब त्याग धन दीयो ।। कवडी रही न कोई ।।१४६।।**

जसे जगात दोन मनुष्य आहेत एका मनुष्याने धन त्याला न समजता सहजात संपून गेले आणि एक पैसा ही जवळ राहीला नाही तसेच दुसऱ्याने सर्व धन त्यागून दिले व एक कवडी स्वत: जवळ ठेवली नाही असे दोन्ही व्यक्ती धनहीन होऊन गेले.।।१४६।।

**दोनु सुखि धंध फंद तूटा ।। मन निर्मळ हुवो भाई ।।**
**यु महा प्रळे लग सर्ब सिष्ट ।। आ मिले ब्रम्ह मे जाई ।।१४७।।**

एक व्यक्ती धन नाही म्हणून व्यवसाय करु शकत नाही तर दुसरी व्यक्ती धनाचे त्यागन केले म्हणून धंदा करत नाही याकारणाने दोघांचे धंद्याचे फंद तुटून गेले धंदाच नाही म्हणून धंद्यांच्या फंदातून मन मुक्त होऊन गेले आणि निर्मल होऊन गेले

अशाप्रकारे एकाने मायेचा फंद सोडून ब्रम्हज्ञान प्राप्त करुन ब्रम्हपद प्राप्त केले तर एक महाप्रलयात आकाश,वायु,अग्नी,जल,पृथ्वी सर्व मिटून गेले म्हणून मायेचे कर्मकांड मिटून गेले.महाप्रलय झाल्याने सृष्टी राहीली नाही,म्हणून सृष्टीमध्ये पुढे कर्मकांड करण्याचा देह मिळाला नाही आणि प्राण महाप्रलयाच्या विधीनुसार पारब्रम्हमध्ये जाऊन पारब्रम्ही बनून गेला अशाप्रकारे हे दोन्ही ही मायेच्या कर्मकाडांपासून मुक्त होऊन निर्मळ बनून गेले आणि पारब्रम्हमध्ये पारब्रम्ही बनून राहू लागले अशाप्रकारे पारब्रम्हचा ब्रम्ह बनण्याची विधी प्रगट करुन घ्या किंवा महाप्रलया पर्यंत थांबलेले रहा स्वता:हून सहजमध्ये ब्रम्ह होऊन जातात कोणते ब्रम्हज्ञान साधण्याची गरज पडत नाही.।।१४७।।

**निर्धन दोंय रीत सु होवे ।। सो हंसा बस जाणो ।।**
**ओ दिष्टंग ग्यान किम सीखे ।। इऊँ आ कळा पिछाणो ।।१४८।।**

जसे निर्धन होण्याच्या दोन्ही रित हंसाच्या वशमध्ये आहेत एक गाफिल राहून धंदा विचार न करता करा,आपोआप धन खुंटून जाईल आणि निर्धन बनून जाल किंवा धनाला त्यागून द्याअशाचप्रकारे महाप्रलयापर्यंत सत परमात्म्याने जो देह दिला तो सतज्ञानात लावू नका.मायेच्या कर्मकांडात टाकत रहा,त्याच्याने सुख दु:ख येत राहतील एक दिवस महाप्रलय येईल जग मिटून जाईल जगाच्या कर्मकांडाच्या सर्व विध्या आपोआपच संपलेल्या राहतील आणि हंस जग सोडून पारब्रम्हमध्ये जाईल व तेथे ब्रम्ह बनून राहील अशाप्रकारे ब्रम्ह बनण्याची एक रीत आहे तर दुसरी कर्मकांड करु नका ब्रम्हज्ञान उरात धारण करा आणि ब्रम्ह बनून जा ह्या दोन्ही रित हंसाच्या हातातच आहे जसे जगातील मनुष्य दोन प्रकाराने निर्धन झाले.निर्मळ झाले परंतु वैराग्य ज्ञान शिकले नाही याकारणाने वैराग्य ज्ञानाचे सुख या दोघांनाही धंदा सोडून वा सुटून निर्मळ झाल्यावरही मिळत नाही अशाचप्रकारे पारब्रम्हचे ब्रम्ह दोन प्रकाराने बनले परंतु या दोघांमध्ये सतज्ञान प्रगट झाले नाही म्हणून या दोघांनाही सत्तकलेचे सुख समजले नाही. ।।१४८।।

**मेरी मेहेर बिना कोई हंसो ।। आणंद लोक न जावे ।।**
**ज्यू कोई ग्यान न सीखे गुर बिन ।। कोट क्रम कर आवे ।।१४९।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की माझ्याशिवाय ही सत्तकला कोणत्याही हंसात प्रगट होत नाही म्हणून अन्य कोणत्या उपायांनी हंस आनंदलोकात जात नाही जसे जगात कोट्ट्यावधी उद्योग करणारे जीव आहेत परंतु वेदाचे ज्ञान शिकायचे आहे तर वैरागी गुरुच्या जवळ जावे लागते ते ज्ञान आई-वडिल किंवा राजापासून मिळत नाही.अशाच प्रकारे सतज्ञान माया-ब्रम्हाच्या जवळ जाऊन करोडो प्रकारचे वेगवेगळ्या क्रिया कर्म केले तरीही प्रगट होत नाही सतज्ञान प्रगट करायचे आहे तर माझ्या जवळच

यावे लागेल.माया ब्रम्हजवळ जाऊन सतज्ञान प्रगट होत नाही. ।।१४९।।

**यू सत लोक पठाऊ म्हेई ।। ओर ऊपाय न कोई ।।**
**जिऊं गुरू बेद नाही ।। से कर किमत जग माई ।।१५०।।**

जसे अनेक उपाय करुन वेद शिकले जात नाही वेद शिकायचे आहेत तर वेदाच्या जाणकार गुरुजवळच जावे लागते तसेच अनेक कर्मकांड आणि ज्ञान–ध्यानाने सतविज्ञान प्रगट होत नाही सतविज्ञान प्रगट झाले नाही तर सतलोकात जाता येत नाही म्हणून सतलोक जायचे आहे तर सतविज्ञान प्रगट करावे लागेल आणि त्या सतविज्ञानाचा उपाय माझ्याजवळ आहे त्या सतविज्ञानाने मी हंसांना सतलोकात पाठवतो या सतविज्ञानाशिवाय सतलोकास जाण्याचा जगात आणखी काही उपाय नाही. ।।१५०।।

**ब्रम्हा बिस्न महेसर सक्ती ।। फिर औतार कहावे ।।**
**इन की मेहेर धन्न न निर्धन लग ।। ग्यान दिष्ट नही पावे ।।१५१।।**

जगात ब्रम्हा,विष्णु,महादेव,शक्ती तसेच अवतार आहे त्यांची मेहेर धनवान करण्या पर्यंत राहते व कुमेर धनहीन करण्यापर्यंत राहते यांच्या मेहेरने सतपद प्राप्त करुन सतज्ञानाची दृष्टी येत नाही घटात सतज्ञानाची समज माझ्याच मेहेरने येते. ।।१५१।।

**अेतो सरब हमेसा भाई ।। कुळ ऊजीयागर होई ।।**
**हम कुछ छाड़ हुवा सतरूपी ।। रिध सिध रखुँ न कोई ।।१५२।।**

हे ब्रम्हा,विष्णु,महादेव,शक्ती व अवतार जीवांना माया–ब्रम्हचे रिध्दी–सिध्दीचे पर्चे चमत्कार देऊन माया–ब्रम्हच्या कुळातच ठेवणारे आहे हे माया ब्रम्हच्या कुळात ठेवण्याचे काम प्रगट रुपाने करतात माया–ब्रम्हच्या कुळाला त्यागून सतस्वरुपी वैरागी बनलो आहे मला माया–ब्रम्हच्या कुळामध्ये जीवांना काळाचे अनंत कष्ट पडतात हे ज्ञानाने समजते म्हणून मी ज्ञानाने न्याय करुन ज्याकारणाने जीव काळाच्या तावडीत येऊन दु:ख भोगतात असे पर्चे चमत्कार करणारे रिध्दी–सिध्दीला सोबत ठेवतच नाही.।।१५२।।

**गुरू सो पदवी हमारी कहिये ।। वे कुळ राजा होई ।।**
**बिना भेद कोई मोहे न जाणे ।। ग्यानी पिंडत लोई ।।१५३।।**

जसे जगात राजा आणि वेदाचे गुरु राहतात राजाला सर्व प्रजा जाणते परंतु वेदाच्या गुरुला काहीच लोक जाणतात अशाचप्रकारे ब्रम्हा,विष्णु,महादेव,शक्ती व अवतार हे होणकाळाचे राजे आहेत जसे प्रजेला राजापासून राजापर्यंतचे सुख मिळते असेच ब्रम्हा, विष्णु,महादेव,शक्ती तसेच अवतारांनी होणकाळपर्यंतचे मायेचे सुख मिळतात राजा पासून वेदाच्या ज्ञानाचे सुख मिळत नाही ते वेदाच्या गुरुपासूनच मिळते अशाच प्रकारे सतज्ञानाचे सुख सतगुरुपासूनच मिळते ती पदवी माझी आहे ती सतगुरुची पदवी ब्रम्हा,विष्णु,महादेव,शक्ती व अवतारांची नाही हे ज्ञानी पंडीत व जगाला समज नाही

म्हणून हे जगत ज्ञानी,पंडीत मला सतगुरु म्हणून जाणत नाही ते ब्रम्हा,विष्णु,महादेव, शक्ती व अवतारांचे व त्यांच्या साधूंचे ज्ञान सांगणाऱ्यांना सतगुरु मानून बसतात जेव्हा ब्रम्हा,विष्णु,महादेव,शक्ती आणि अवतार हे स्वत: सतगुरु नाही ते होणकाळाचे राजे आहेत.जसे जगात राज्यांचे राजरीतीचे ज्ञान सांगणारे राजा राजरीतीचा उद्योग शिकवितात हे वेद ज्ञान शिकविणारे गुरु होत नाही अशाचप्रकारे जेव्हा जगात राजाची राजरीत सांगणारे राजे गुरु बनू शकत नाही तर ब्रम्हा,विष्णु,महादेव,शक्ती आणि अवतार तसेच यांचे ज्ञान सांगणारे साधु गुरु कसे होऊ शकतात?ही समज ज्ञानी,पंडीत व जगात राहत नाही याचकारणाने ब्रम्हा,विष्णु,महादेव,शक्ती आणि अवतार तसेच त्यांच्या साधुला गुरु मानून त्याच्यात लागलेले राहतात सतस्वरुप पद हे होणकाळ पदाचा आधी पासून गुरु आहे तो सतस्वरुप गुरु प्रगट रुपाने माझ्यात आला आहे म्हणून मी होणकाळ सृष्टीचा म्हणजे सर्व जगाचा गुरु बनलो आहे याकारणाने गुरु पदवी माझी आहे ब्रम्हा,विष्णु,महादेव,शक्ती व अवतार आणि त्यांचे साधु जे गुरु बनून बसले आहे त्यांची ही गुरु पदवी नाही परंतु जगाच्या लोकांना ज्ञानी, पंडीतांना ब्रम्हा,विष्णु,महादेव, शक्ती आणि अवतार हे होणकाळाचे राजे आहेत आणि मी सतस्वरुपाचा सतगुरु आहे हा भेद नाही याकारणाने हे मला मानत नाही. ।।१५३।।

**म्हे गुरदेव सिष्ट सब ही का ।। जाण मा जाणो कोई ।।**
**मो सूं मिल्या अगम घर मेलू ।। आणंद पद मे सोई ।।१५४।।**

मी म्हणजे सतस्वरुप सतस्वरुप हा आधीपासून सर्व सृष्टीचा गुरु आहे आता मला ज्ञानी,पंडीत व जगाने जाणले काय?किंवा नाही जाणले काय?याच्याने फरक माझ्या मध्ये पडत नाही मला नाही जाणल्याने फरक ज्ञानी,पंडीत आणि जगाच्या लोकांमध्ये पडेल ते मला जाणणार नाही तर मी त्यांना आंनदपदात घेऊन जाऊ शकणार नाही जर ज्ञानी,पंडीत,जग मला जाणतील आणि माझ्याशी मिळतील तर मी त्यांच्यात अगम घरी जाण्याचे बीज टाकेल आणि आनंदपदात घेऊन जाईल. ।।१५४।।

**मेरो अंग आद से ओई ।। जिऊँ जग ग्यान कहावे ।।**
**सत लोक कू हंस पठाऊँ ।। जिऊँ दु:ख ग्यान ना मावे ।।१५५।।**

मी म्हणजे सतस्वरुप,सतस्वरुप म्हणजे सतगुरु/सतगुरुचा आधीपासूनच स्वभाव सतलोकाला पाठवण्याचा आहे.जसे जगात गुरु असतात,त्यांना जीवांचे संसारातील दु:ख सहन होत नाही म्हणून तो जीवांना संसारातून काढून वैराग्य ज्ञानी बनवतात अशाचप्रकारे सतगुरुला जगातील जीव काळाचे भारी दु:ख भोगतांना दिसतात ते दु:ख बघुन सतगुरुला दया येते म्हणून ते जीवांना होणकाळच्या दु:खातून काढून महासुखाच्या सतलोकात पाठवत राहतात. ।।१५५।।

मेरो किसब कळा सोई आई ।। रीझ मोज धन माया ।।
सत लोक मे हंस पठाऊं ।। ओ बी बिडद ले म्हे आया ।।१५६।।

जीवांना होणकाळाच्या महादु:खातून काढून सतस्वरुपाच्या महासुखांमध्ये पाठवणे ही कला मीच जगात प्रगट केली आहे मला भेटल्यावर सतलोकाच्या महासुखांच्या देशात जीव जाईल आणि तेथे खुप सुख घेईल ही रीज मोज तसेच धन मी मला भेटणाऱ्याला बक्षीस मध्ये देतो अशा सुखाच्या सतलोकात पाठवण्याचा मीच ओहदा आणला आहे, बिड्द आणले आहे हा ओहदा ब्रम्हा,विष्णु,महादेव,शक्ती व अवतारांचा नाही हे ज्ञानी, पंडीत आणि जगाचे लोक समज नसल्याकारणाने मला जाणत नाही(ओहदा,हंस भावाने नाही आहे सतस्वरुप भावाने आहे ब्रम्हा,विष्णु,महादेव ही त्रिगुणी माया हंस भावाने नाही ब्रम्हामध्ये रजोगुणा ची सत्ता असते विष्णुमध्ये सतोगुणाची सत्ता असते शंकरात तमोगुणाची सत्ता असते हे सांगणे) ।।१५६।।

ब्रम्ह ब्रम्ह तम सब ही गावो ।। ब्रम्ह हुवाँ क्या होई ।।
किस दिन हा ब्रम्ह तम सारा ।। सो दिन कहिये मोई ।।१५७।।

ब्रम्ह बनायला पाहिजे,ब्रम्ह बनायला पाहिजे असे तुम्ही सर्व लोक सांगून राहीले आहे मला हे सांगा की ब्रम्ह झाल्याने काय होईल?साकारी सृष्टीत येण्याच्या आधी सर्व ब्रम्हच होते का किंवा नव्हते?तो दिवस लक्ष्यात आणा.जेथे तुम्ही ब्रम्ह होते तेथे सुख नव्हते म्हणून ब्रम्हपद सोड्न जीवपदाचा देह धारण केला आणि मायेत आले आहात हे बरोबर आहे का नाही मग ब्रम्ह बनाल तेथे सुख मिळणार नाही तेथे गेल्यानंतर सुखाची इच्छा होईल मग परत मायेत याल याच्यात आजच्या मायेच्या पाच आत्म्याच्या सुखापेक्षा जास्त सुख मिळणार नाही आज जसे आहात तसेच सुख दु:खात पड्लेले रहाल यांच्यापेक्षा जास्त महासुखावाले बनणार नाही याची समज आणा याकरीता परत ब्रम्ह बनण्याकरीता न खपता त्याच्या पुढचे सुख सांगणारे सतगुरु धारण करा.।।१५७।।

ओ तो आद अनाद अगम लग ।। ब्रम्ह रूप सुण होई ।।
ना कुछ घटे बधे कुछ नाही ।। काम रूप फळ दोई ।।१५८।।

असे तर प्रत्येक जण आधीपासून शेवट पर्यंत ब्रम्हच आहे आधीपासून आधीही ब्रम्ह होता आणि अंतपासून अंतपर्यत ही ब्रम्हच राहील त्याचे ब्रम्हरुप कधी ही घटत नाही किंवा कधीही वाढत नाही हा ब्रम्ह सुखाकरीता कर्म करतो त्याच्यात सुखाचे आणि दु:खाचे दोन प्रकारचे कर्म असतात त्या कर्माच्या घट आणि वाढमुळे मायेत सुखांच्या फळांमध्ये घट–वाढ होते परंतु याचे मुळ ब्रम्हरुपात काहीही फरक पड्त नाही.।।१५८।।

जिऊं नर किसब छाड़ कर देवे ।। तोही नर का नर होई ।।
यु ब्रम्ह माया त्याग दूर होय ।। तोई कम बधो न कोई ।।१५९।।

जगातील मनुष्यांमधून एक मनुष्य धंदा करुन राहीला आहे आणि एका मनुष्याने धंदा त्यागून दिला आहे धंदा त्यागून देणारे आणि धंदा करणाऱ्या मनुष्याच्या मनुष्यापणात काय फरक झाला असेच आधी पासून पारब्रम्हमध्ये सर्व ब्रम्ह होते ते मायेत आले, मायेत रमले,रमत-रमत त्यातील एकाने माया त्यागली आणि दुसऱ्याने मायेत रमणे बनून ठेवले असे दोन्ही ब्रम्हच्या ब्रम्हपणात माया त्यागल्याने किंवा धारण केल्याने का फरक पडला?दोघांना मायाब्रम्हच्या शिवाय वेगळे जास्त काही मिळाले नाही ब्रम्ह मायेपासून वेगळा व जास्त आनंदपद प्राप्त केल्या शिवाय मिळत नाही. ।।१५९।।

**यूँ ओ सदा ब्रम्ह ही जाणो ।। ता मे कसर न काई ।।**
**ज्यू ओ करे सोई बिध होवे ।। हे हद बेहद के माई ।।१६०।।**

जीव नेहमीपासून ब्रम्ह आहे आणि नेहमी ब्रम्ह राहील याच्यात कोणी कसर जाणू नका ब्रम्ह करण्यांची जी विधी करेल तसा तो हद बेहदमध्ये बनेल परंतु राहील ब्रम्हचा ब्रम्हच. ।।१६०।।

**क्रणी सकळ छाड़ कर देवे ।। तोई कुछ दूजो नाही ।।**
**जिऊं नर ग्यानी--कळ नार मे प्रगटे । सत बिन जळे न आही ।१६१।**

सर्व मायावी करण्या त्यागून दिल्या तरी तो ब्रम्हच्या शिवाय दुसरा काही बनणार नाही तो ब्रम्ह सतज्ञान प्रगट झाल्यावरच दुसरा बनेल जसे जगात स्त्रीयाँ खुप आहेत ज्ञानवंत आहे,कुलवंत आहे,व्यभीचारीणी आहेत ह्या सर्व स्त्रीयाच आहेत यांच्या स्त्री पणात काही फरक नाही ह्या स्त्रीयाँ पती सोबत राहतात परंतु पतीचे शरीर सुटल्यावर पतीसोबत जात नाही जगातच राहतात यांच्यातून कोणी एखादी असते जिच्यात सत प्रगट झालेले असते ती जगात राहत नाही ती जगापासून वेगळी होऊन पती सोबत सतवाड्च्या लोकात जाते अशाचप्रकारे जगातील सर्व मनुष्य ब्रम्हच आहेत ते होणकाळातच राहतात त्यांच्यातील एखाद्या ब्रम्हला सतस्वरुपाचे सत प्रगट होते आणि तो होणकाळ सोड्रन सतस्वरुपा सोबत सतपदात जातो.।।१६१।।

**ग्यानवंत कुळ सुध असल हुवे ।। फिर प्रणी जग माही ।।**
**बिना सत सुण जळयो न जावे ।। यू ब्रम्ह को बळ नाही ।।१६२।।**

स्त्री ज्ञानवंत आहे,असली उंच कुळाची आहे,विवाह करुन आणलेली आहे असे असली शुध्द लक्षणांची आहे अशा स्त्रीचा पती मरुन गेला आता पत्नीला पती जळून शरीर त्यागायचे आहे तसेच पती सोबत जायचे आहे अशी इच्छा असल्यावर ही ती स्त्री पती सोबत तिच्यात सत प्रगट न झाल्याकारणाने शकणार नाही आणि जळू शकली नाही तर शरीर सुटणार नाही शरीर नाही सुटणार तर ती पती सोबत सतवाड्च्या लोकात जाऊ शकणार नाही अशाप्रकारे ब्रम्ह स्वत:च्या ब्रम्ह बळावर

होणकाळ सोडू शकत नाही त्या स्त्री मध्ये जसे सत प्रगट झाले तसे आनंदपदाचे सत ब्रम्हमध्ये प्रगट व्हायला पाहिजे आंनदपदाचे सत प्रगट झाल्यावर तो ब्रम्ह होणकाळ सोडून होणकाळापासून वेगळा महासुखाच्या आनंदपदात जाईल. ।।१६२।।

सत की मेहेर भई तिण ऊपर ।। सोई सुण जळणे जावे ।।
राणी खास छोकरी बीच ।। कारण कोई न क्वावे ।।१६३।।

कोणत्याही स्त्री मध्ये सतप्रगट झाले तर ती पतीसोबत जळून जाते आणि हे जग सोडून देते सतप्रगट होण्याकरीता ज्ञानवंत,कुलवंत,राणी,रखेल किंवा वेश्या या लक्षणांचे कारण राहत नाही जीच्यावर सत्तची मेहेर होते ती सती बनून जाते अशाचप्रकारे ब्रम्ह मायावी आहे किंवा ब्रम्हज्ञानी उंच कर्मी आहे किंवा निच कर्मी आहे उंच धर्मी आहे किंवा निच धर्मी आहे हे लक्षण अमरलोकास जाण्याच्या आड्वे येत नाही.ज्या ब्रम्हवर सत्तची मेहेर होत तो ब्रम्ह होणकाळ त्यागून आनंदपदात जातो.।।१६३।।

वो सतस्वरूप मेहेर ज्याँ कर हे ।। से हंसा व्हाँ जावे ।।
वाहा की खबर झूट भाई ।। पाछो कोई हन आवे ।।१६४।।

ज्या हंसावर सतस्वरुप मेहेर करतो तोच हंस सतस्वरुपात जातो सतस्वरुपातून होणकाळात कर्म भोगण्यासाठी परत येतो ही वार्ता म्हणजे गोष्ट कोणी सांगतो आहे,ती गोष्ट त्यांची खोटी आहे एक वेळ आनंदपदात पोहचल्यानंतर तो होणकाळात परत कधी येत नाही. ।।१६४।।

के सुखराम सुणो सब ग्यानी ।। ध्यानी पिंडत सारा ।।
राज जोग बिन कोई न पहुँचे ।। आणंद लोक बिचारा ।।१६५।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व ज्ञानी ध्यानी तसेच पंडितांना सांगत आहे की आनंदलोकात मायेचे ज्ञान,ध्यान,पंडीताई व ब्रम्ह बळावर जाता येत नाही तेथे राजयोगाच्या बळानेच पोहचता येते अन्य कोणत्या उपायांनी पोहचता येत नाही. ।।१६५।।

मेहेर बिना यूं नाही पहुंचे ।। सत लोक कू जाई ।।
अेक पद मे ओ गुण आदु ।। धिंगन तारे आई ।।१६६।।

(सतस्वरुप)सतगुरुच्या मेहेर शिवाय सतलोकात जाता येत नाही याच्यात आदिपासून एक गुण आहे,तो धिंगांपासून म्हणजे मनाने होणकाळ माया-ब्रम्हशी मगरुर बनले आहे अशा धिगांना कधी तारत नाही. ।।१६६।।

गरिब निवाज बिड़द हे वा को ।। धिंग निवाज न होई ।।
यू अे बड़ा पुर्ष नही पावे ।। सतरूप कऊं तोई ।।१६७।।

सतस्वरुप हा फक्त गरीबांना म्हणजे ज्याच्यात होणकाळ पारब्रम्ह व मायेची कोणती मगरुरी नाही अशा गरीबांना तारतो होणकाळ ब्रम्ह व मायेच्या मगरुर धिंगांना कधी

नाही तारत होणकाळ पारब्रम्ह व मायेची कोणती मगरुरी नाही अशा गरीबांना तारण्याचाच आधीपासून त्याचे बिड्द आहे याकारणाने मोठे पुरुष जसे ऋषी,मुनी, ज्ञानी,ध्यानी,पंडीत जे होणकाळ पारब्रम्ह व मायेचे ज्ञान–ध्यानाच्या मगरुरीत आहे ते सतस्वरुपाला कधी प्राप्त करीत नाही. ।।१६७।।

**ब्रम्हा बिसन महेसर सक्ती ।। केवळ ब्रम्ह कहावे ।।**
**अे तो धिंग धिंग सुंई धिंगा ।। क्युं कर वो पद पावे ।।१६८।।**

ब्रम्हा,विष्णु,महादेव,शक्ती व माया आणि ब्रम्ह हे धिंगाहून ही धिंग आहेत ते स्वत:ला केवळ ब्रम्ह म्हणजे सतस्वरुप ब्रम्ह समजतात याकारणाने सतस्वरुप या धिंगावर मेहर करीत नाही याकारणाने हे सर्व धिंग सतस्वरूपाचे पद प्राप्त करीत नाही. ।।१६८।।

**ज्या को सुणो देस दिखलाऊं ।। जो कोई बिद्या चावे ।।**
**बाळक थका म्हेर सरसती की ।। पढे पाठ कंठ आवे ।।१६९।।**

हे धिंग सतस्वरुप पद का प्राप्त करीत नाही आणि गरीब सतस्वरुप पद का प्राप्त करतात.यावर मी जगाचा एक दृष्टांत सांगतो विद्येचे शिकणे सरस्वतीच्या मेहेरने होते सरस्वतीची मेहेर बाल वयापर्यंतच होते बालक वेदाचे पाठ वाचतो सरस्वतीच्या मेहेरने पाठ वाचताच वेदाचे पाठ त्या बालकाचे कंठस्थ होऊन जातात. ।।१६९।।

**जोबन जोर छक्के जो होवे ।। धन राज मद माई ।।**
**तो नही म्हेर सरस्वती कर हे ।। बेद न सिख्या जाई ।।१७०।।**

जवानीच्या मदाचा जोर,धनाचा जोर,राजाचा जोर ज्या व्यक्तींमध्ये आहे त्यांच्यावर सरस्वतीची मेहेर होत नाही ते वेदाचे पाठ वाचतात परंतु ते पाठ यांच्या कंठस्थ होत नाही.।।१७०।।

**बाळक ब्होत गुराँ सूं धूजे ।। इंद्रयाँ जोर न कोई ।।**
**जब वा म्हेर सरस्वती कर हे ।। यू सतगुरू बिध जोई ।।१७१।।**

बालक गुरुला खुप धुजतो व त्याच्यात इंद्रियांचा जोर राहत नाही याकारणाने सरस्वती त्या बालकावर मेहेर करते अशीच विधी सतगुरुची आहे सतगुरुशी म्हणजे सतस्वरुपाशी जो हंस धजेल तसेच त्याच्यात माया व ब्रम्हचे ज्ञान,ध्यानाचा जोर राहणार नाही त्या हंसावर सतगुरुची मेहेर होईल. ।।१७१।।

**और किसब चावे सो कर ले ।। धन जोबन हुवा राजा ।।**
**अेक बेद ब्याक्रण नही सूझे ।। वो केवळ नाही काजा ।।१७२।।**

धन,जवानी व राज्याचा जोर आल्यावर त्या हंसाला धनाचा जवानीचा व राज्याचा कोणताही हुन्नर इच्छा केल्यावर प्राप्त करता येतो परंतु त्याची वेद,व्याकरण शिकण्याची इच्छा राहीली तरीही त्याच्याने वेद,व्याकरण शिकले जात नाही.अशा हंसावर सरस्वती

मेहेर करत नाही.त्याचप्रकारे हंसात त्रिगुणी मायेचा जोर आल्याने हंसाची केवळ प्राप्त करण्याची इच्छा असली तरी ही कैवल्य प्राप्त होऊ शकत नाही असे मायेचा जोर आलेल्या हंसावर सतगुरुची मेहेर होत नाही. ।।१७२।।

**जो कोई जोर सकळ ही त्यागे ।। तो देहे गुण नही जावे ।।**
**बाळक जवान कोण बिध होवे ।। इऊं केवळ गुण कवावे ।।१७३।।**

कोणी जवान व्यक्ती धनाचा जोर,राज्याचा जोर त्यागून गुरु जवळ वेद कंठस्थ करायला येतो तरी ही सरस्वती त्याच्यावर मेहेर करीत नाही जवान व्यक्ती धनाचा जोर राज्याचा जोर त्यागून देतो परंतु देहाचा जवानीचा गुण त्यागू शकत नाही बालका सारखा बिना वासनेचा बनू शकत नाही याकारणाने सतस्वती मेहेर करु शकत नाही.अशाचप्रकारे मायेचा कैलास वैकुंठ पद त्यागू शकतो परंतु मोठेपणाचा आलेला शोभेचा असर त्यागु शकत नाही आणि सतगुरुला निजमन देऊ शकत नाही याकारणाने त्याला सतपद प्राप्त होऊ शकत नाही. ।।१७३।।

**बाळक ब्होत गुराँ सूं धूजे ।। ऊंच नीच के माही ।।**
**केवळ माहे दोस नही कोई ।। पूरण पण पणो न जावे ।।१७४।।**

बालक गुरु पेक्षा प्रत्येक गोष्टीत अज्ञानी आहे हेच समजतो तो मी गुरुपेक्षा ज्ञानी आहे हे कधी समजत नाही परंतु धिंग हे मी सतगुरु पेक्षा अज्ञानी आहे असे कधी समजत नाही उलट आम्ही ज्ञानी आहोत त्रिगुणांचे मालक आहोत,आम्ही पूर्ण आहोत असे समजतात याकारणाने या धिंगावर सतस्वरुप मेहेर करीत नाही सतस्वरुप मेहेर न करण्याचा दोष सतस्वरुप केवल मध्ये राहत नाही सतस्वरुप केवल घेणे चाहणाऱ्या हंसात राहतो.।१७४।

**सतस्वरूप को हे अंग ओई ।। गरिब नवाज कहावे ।।**
**के सुखराम ब्रम्ह अर माया ।। इंऊं सतस्वरूप न पावे ।।१७५।।**

अशाप्रकारे ब्रम्ह आणि माया धिंग बनून बसले आहे सतस्वरुप हा गरीब नवाज आहे धिंग नवाज नाही याकारणाने माया आणि ब्रम्ह सतस्वरुपाला प्राप्त करत नाही. ।।१७५।।

**ज्यु संसार बंध्यो आपे मे ।। गुरू बस कोई न आई ।।**
**फळ फूल पात झड़ पड़ियो ।। हे सब तर्वर माही ।।१७६।।**

संसारातील सर्व लोक माता-पिताच्या कुळाशी बांधले आहे गुरुशी बांधले नाही जसे वृक्षाला फळ,फुल पान आले आणि ते झडून गेले अशाचप्रकारे सर्व ब्रम्ह होणकाळा पासून आले,ते महाप्रलयात होणकाळात गेले होणकाळाच्या पलिकडे सतगुरु पदात नाही गेले. ।।१७६।।

जळ मे जाय मिल्यो जळ जाई ।। वे जब क्या इधका होई ।।
रूख राय घट घट ब्रम्ह भरियो ।। ज्हाँ ही जळ औरन कोई ।।१७७।।

पाण्यापासून निघून झाड वनस्पती बनले.झाड मेल्यानंतर वनस्पती परत पाण्यात मिसळून पाणी बनून गेले वनस्पती पाण्यापासून निघाली,परत पाण्यात जाऊन मिळून गेली याच्यात जास्त काय झाले?अशाचप्रकारे ब्रम्ह होणकाळापासून निघाला हा तीन लोकाच्या माया पदात आला.येथे ब्रम्हचा जीव म्हणवला मायापद महाप्रलयात मिटून गेले परत जीवाचा ब्रम्ह बनून गेला याच्यात ब्रम्हपेक्षा नवा काय बनला? ।।१७७।।

जिऊं घर तार खड़डा कर दीया ।। क्हा ध्रण गुण जावे ।।
पाछी पड़या दाध क्हा होई ।। इंऊं ब्रम्ह जीव कुवावे ।।१७८।।

धरतीवर तार खड्डा करुन घर बनविले याच्याने घरातील धरतीचा गुण गेला नाही घर पडून गेल्या वर परत घर धरतीतच मिळून गेले अशाचप्रकारे ब्रम्ह मायेमध्ये येऊन जीव बनून गेल्याने जीवाचा ब्रम्ह गुण जात नाही महाप्रलयात माया मिटून गेल्यावर जीव परत ब्रम्ह बनून जातो.।।१७८।।

नाँ नाँ बिध किया आभूषन ।। सोई कंचन हे सारा ।।
पाछो भाँग घाट सो मेटे ।। जब क्या इधक बिचारा ।।१७९।।

सोन्यापासून विविध प्रकारचे आभुषण(दागिणे)बनविले ते सर्व सोनेच आहे अशा आभुषणांना भाजून मिटवून दिल्यावर परत सोनेच बनते सोन्याहून जास्त काय बनेल? अशाचप्रकारे ब्रम्हपासून मायापदात वेग-वेगळे शरीर बनतात मायापद महाप्रलयात मिटून गेल्याने सर्व शरीर ही मिटून जाते आणि ब्रम्ह मायेतून निघून ब्रम्हपदात ब्रम्ह बनून सामावून जाते.।।१७९।।

जात छाड़ बेस्या हुय बेठी ।। क्या गयो घट भाई ।।
पाँचु भोग नार वा सागे ।। सो पत ब्रता माई ।।१८०।।

कुलवंत जात सोडून वैश्या होऊन गेली त्याच्यात काय घटले?जसे कुलवंत पतीव्रता स्त्री पाची सुख घेते तसेच्य तसे वैश्याही घेत आहे ब्रम्हपणा सोडून जीव बनून गेला त्याच्यात ब्रम्हचे काय घटले?पारब्रम्हमध्ये जसा ब्रम्ह होता तसाच जीवपणात ब्रम्हच आहे ब्रम्हपेक्षा वेगळे काही नाही. ।।१८०।।

राजा रंक हुवो जे कब ही ।। क्या गयो घट सोई ।।
नर को नर ई बण्यो वो सागे ।। पदवी घट बध होई ।।१८१।।

राजा काही कारणाने रंक बनून गेला तर त्याचे काय घटून गेले?राजा ही मनुष्य होता आणि रंक ही मनुष्य आहे दोघांच्या मनुष्यपणात काही फरक झाला नाही त्याच्या पदवी मध्ये कमी जास्त झाले मनुष्य राजा होता तेव्हा मोठी राजा पदवी होती तो

मनुष्य रंक बनून गेला तर त्याला रंक पदवी मिळाली बाकी मनुष्यपणात काही फरक झाला नाही.अशाचप्रकारे ब्रम्ह जीव बनला आणि कर्मकांडात पडला याच्याने ब्रम्ह आणि जीवाच्या ब्रम्हपणात काही फरक पडला नाही फक्त पदवीत फरक पडला एका ब्रम्हला ब्रम्हज्ञानीची पदवी मिळाली तर दुसऱ्याला कर्मकांडाची मायावी पदवी मिळाली पदवीत फरक पडल्याने दोघांच्या ब्रम्हपणात थोडासाही फरक पडला नाही. ।।१८१।।

**जो नर नर प्रण घर लायो ।। पुर्ष पणो नही जावे ।।**
**जो नर जन्म ब्याँव नही कीयो ।। तोई नर पुर्ष कहावे ।।१८२।।**

पुरुषाने लग्न करुन स्त्रीला घरी आणले,त्याचा पुरुषपणा गेला नाही म्हणजे तो स्त्री नाही बनला पुरुषच बनून राहीला तसेच कोणत्या पुरुषाने जन्मभर विवाह केला नाही तरी ही तो पुरुषच बनून राहीला अशाचप्रकारे कोणी ब्रम्हमाये सोबत रमला आणि कोणी ब्रम्हमाये–पासून वेगळा राहीला तर ब्रम्हच्या ब्रम्हपणात फरक होत नाही. ।।१८२।।

**जात पाँत सू दूरो करदे ।। धसे ओर कुळ माही ।।**
**क्हो जी घटयो क्या उण नर को ।। यूं ब्रम्ह जीव क्वाही ।।१८३।।**

कोण्या व्यक्तीला जातीपाती पासून दूर करुन दिले कालांतराने पुन्हा तीच व्यक्ती जातीपातीत घुसून गेली जात पातीपासून दूर केले तरीही तो मनुष्यच होता आणि जाती पातीत घेतले तेव्हा ही तो मनुष्यच आहे.त्याच्या मनुष्यपणात काही फरक झाला नाही असेच कोणी ब्रम्ह ब्रम्हज्ञानाच्या जातीपासून वेगळा झाला व मायावी ज्ञानाच्या जातीचा बनला पुढे कालांतराने मायावी ज्ञान त्यागून दिले आणि ब्रम्हज्ञानी बनून ब्रम्हज्ञानीच्या जातीचा बनून गेला ब्रम्हज्ञानाची जात सोडून दिली आणि मायावी ज्ञानाची जात धारण करुन घेतली याच्याने त्या ब्रम्हचा ब्रम्हपणा बदलला नाही त्याच्या पदात व ज्ञानात फरक पडला परंतु त्याच्या ब्रम्हरुपात काही फरक पडला नाही. ।।१८३।।

**हे तो आद ब्रम्ह अर माया ।। तीजो पद सुख माही ।।**
**ताँ कूं कहे आणंद पद सारा ।। ज्याँ सत चीन्यो नाही ।।१८४।।**

आधीपासून ब्रम्ह आणि माया दोन पद आहेत या ब्रम्ह आणि मायेपासून तिसरा साकारी मायेचा पाच सुख घेण्याचे पद जन्मले या तिसऱ्या मायेच्या पदाला सर्व ज्ञानी, ध्यानी आनंदपद म्हणतात हे पद असत्य आहे हे पद माया व ब्रम्ह पासून जन्मलेले पद आहे हे आनंदचे सतपद नाही सतपद माया–ब्रम्हपासून तसेच त्याच्या पासून जन्मलेले साकारी मायेच्या पदाहून वेगळा आहे त्याला ज्ञानी,ध्यानींनी प्राप्त करुन ओळखले नाही म्हणून मायेच्या सुखाच्या पदाला सत्य मानून आनंदपद पकडून बसले आहे.।।१८४।।

**युँ दिष्टाँग देर समझाऊँ ।। ग्यानी बुध घट लावो ।।**

सतस्वरूप ज्हाँ म्हे सतगुर हुँ ।। तम ओ भेद न पावो ।।१८५।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज मी सतगुरु कसा आहे,याचा भेद दृष्टांत देऊन ज्ञानींना सांगत आहे तसेच तो भेद घटात बुध्दी आणून समजा असे सांगत आहेत. ।।१८५।।

ज्यूँ संसार बंध्यो पख माही ।। कुळ गिन्यान पिछाणो ।।
राम राम की केबत मुख मे ।। मिलियाँ प्रीत न ठाणो ।।१८६।।

जसे जगातील लोक पक्षात बांधलेले असतात व जाती–पातीवाल्यांनाच ओळखतात आणि आपसातच प्रित करतात.कुळ आणि जाती–पातीच्या बाहेरचा मिळाला तर आपसात राम राम म्हणण्याच्या रीतीनुसार राम राम म्हणतात परंतु आपसात भेटल्यावर ही प्रित करीत नाही. ।।१८६।।

यु वे सकळ सिष्ट का ग्यानी ।। मेरो भेद न पावे ।।
ब्रम्हा बिसन महेसर सक्ती ।। पूरण ब्रम्ह लग न जावे ।।१८७।।

अशाच प्रकारे सृष्टीचे सर्व ज्ञानी,ध्यानी,माया–ब्रम्हच्या कुळाचे ब्रम्हा,विष्णु,महादेव, शक्ती पारब्रम्ह पर्यंतच ओळखतात आणि त्यांच्याशी प्रित करतात याकारणाने पूर्ण ब्रम्ह पर्यंतच्याच पदात जातात मी सतस्वरुपाचा सतगुरु आहे हा भेद समजत नाही याकरीता माझ्याशी प्रित करत नाही याकारणाने पूर्ण ब्रम्हच्या पुढच्या आनंदपदाला जात नाही. ।।१८७।।

इनकी सकळ कहे जग सोभा ।। ग्यानी पिंडत सारा ।।
ताँको सुणो अरथ ओ कहिये ।। जिऊं कुळ ध्रम बुहारा ।।१८८।।

जसे कुळ,धर्मातील सर्व लोक मोठ्या समजदार ज्ञानी लोकांची शोभा करतात त्याच प्रकारचा व्यवहार जगाचे ज्ञानी,ध्यानी आणि जगातील लोकांचा ब्रम्ह,विष्णु,महादेव, शक्ती व पारब्रम्ह पर्यंतची शोभा करण्यात राहतो.।।१८८।।

ब्रम्हा बिस्न महेसर सक्ती ।। अे मा बाप ज जाणो ।।
पुर्ण ब्रम्ह जिसो कुळ राजा ।। यू सत भेद पिछाणो ।।१८९।।

जसे कुळात देहाचे आई–वडील जाणा पूर्ण ब्रम्ह हा जसा जगात राजा असतो तसा जीवांचा राजा समजा जगात देहाचे वेदीगुरु असतात असा मी जीवांचा सतगुरु आहे,हा सतभेद ओळखा. ।।१८९।।

सतस्वरूप ज्युं गुरू जग माही ।। ओ प्रसंग सुण लीजे ।।
केता जीव गुराँ मे समझे ।। सो मुझ निर्णो दीजे ।।१९०।।

जगात देहाचे वेदी गुरु आहेत तसेच जीवाचे कैवल्य विज्ञानी गुरु आहेत जगात आई–वडिलांना किती लोक जाणतात.राजाला किती लोक जाणतात व गुरुला किती लोक

जाणतात हा प्रसंग लक्षात घेऊन गुरुला किती लोक जाणतात याचा निर्णय करा. यावरुन ब्रम्हा,विष्णु,महादेव,शक्ती या माता पित्याला किती लोग जाणतात,पारब्रम्ह राजाला किती लोक जाणतात तसेच सतस्वरुपी सतगुरुला किती लोक जाणतात हे ज्ञानींनो ज्ञानाच्या न्यायाने निर्णय करुन समजा. ।।१९०।।

**मा अर बाप मे सब ही समझे ।। लड़का लड़की भाई ।।**
**बांदी बहु पसू सूकर लग ।। सब सन्मुख हुवे आंई ।।१९१।।**

आई-वडिलांना लहानापासून मोठे मुल-मुली सर्व समजतात जगाचा विवादी मनुष्य सुध्दा आपल्या आई-वडिलांना समजतात.पशु,पक्षी,डुक्कर हे सर्व आपल्या आई-वडिलांना समजतात.यांच्यापैकी एकही असा नाही की जो आई-वडिलांना समजत नाही आणि त्यांच्या सन्मुख राहत नाही हे सर्व आई-वडिलांना समजतात आणि त्यांच्या सन्मुख राहतात.।।१९१।।

**कुळ राजा कू अे नही जाणै ।। पसू श्वान नर नारी ।।**
**यू पूरण ब्रम्ह पिछाणे कोई येक ।। जामे हे बुध भारी ।।१९२।।**

जसे जगात कुळाचे आई-वडिल आहे तसेच जगात जगाचा राजा आहे त्या राजाला पशु,कुत्रा इत्यादी प्राणी तसेच कमी बुध्दीवाले,काही मोठ्या घनदाट जंगलात नेहमी राहणारे स्त्री-पुरुष ही जाणत नाही परंतु अशा राजाला भारी बुध्दीवाले स्त्री-पुरुष जाणतात अशाचप्रकारे पारब्रम्हला जग व मायेचे ज्ञानी,ध्यानी जाणत नाही त्याला भारी समजवाला एखादा ब्रम्हज्ञानीच जाणतो.।।१९२।।

**मेहेमा कियाँ सकळ ही समझे ।। अे गुण राजा माही ।।**
**छोडे बडे सकळ सुख पायो ।। पसवाँ कू गम नाही ।।१९३।।**

राजा जगात सर्वात मोठा असतो,तोच प्रजेला सुख देतो,प्रजेचे रक्षण करतो हे जगातील लहान-मोठे,कमी-जास्त समजणाऱ्याला समजावून सांगितले तर राजाला ही सर्व तो असा राजा आमच्यावर आहे त्याचे सुख प्राप्त करतात पंरतु अशा राजाचे किती ही वर्णन पशु-पक्षी समोर केले तरी ही राजाला पशु पक्षी कोणत्याही स्थितीत समजू शकत नाही. ।।१९३।।

**गुरू की करे आण कोई सोभा ।। कोहो कुण समझे भाई ।।**
**ओर गुरू की मत्त ऊठावे ।। तो सब बरजे आई ।।१९४।।**

कुळात,राज्यात गुरुची महीमा केली तरी ही कुळाचे लोक राज्याचे लोक गुरुला समजत नाही उलट गुरुचे मत उठवून कुळाचे आणि जगाच्या लोकांसमोर ठेवले तर कुळ आणि जगाचे लोक मना करतात. ।।१९४।।

**मात पिता राजा की मेहेमा ।। चाल सकळ मन भावे ।।**

गुरू की टेहल तिसी कोई पकड़े ।। तो सब ही दु:ख पावे ।।१९५।।

आई–वडिलांची तसेच राजाची स्तुती आणि सेवा सर्व लोकांच्या मनाला आवडते या जगातून कोणी गुरुची सेवा धारण केली तर कुळाचे आणि जगाचे सर्व लोक दु:खी होतात. ।।१९५।।

माया ब्रम्ह सुणो सिष्ट का ।। माता पिता सकळ कुळ होई ।।
पुर्ण ब्रम्ह लग सब मेहेमा ।। जिऊं कुळ राजा जोई ।।१९६।।

कुळात जसे आई–वडिल आहेत तसे सृष्टी मध्ये माया–ब्रम्ह म्हणजे ब्रम्हा,विष्णु, महादेव,शक्ती जीवाचे आई–वडिल आहेत जगात जसे राजा आहे तसे सृष्टीमध्ये पारब्रम्ह हा जीवाचा राजा आहे.आई–वडिल आणि राजाची पर्यंतची सेवा करणे हे कुळ आणि राजापर्यंतचीच सेवा आहे ती वेदी गुरुची सेवा नाही वेदी गुरुची महीमा नाही अशाच प्रकारे ब्रम्हा,विष्णु,महादेव,शक्ती व पारब्रम्ह पर्यंतची भक्ती ही माया–ब्रम्हच्या कुळ आणि होणकाळाच्या राज्यापर्यंतचीच भक्ती आहे ती सतस्वरुप सतगुरुची भक्ती नाही.।।१९६।।

ग्यानी साध संत अे जुग मे ।। जिऊं सेणा कुळ माही ।।
इनकी पदवी नही गुरू देव की ।। भोळा समझे नाही ।।१९७।।

कुळाला समजणारे कुळात लोक राहतात परंतु ते वेदी गुरु राहत नाही अशाचप्रकारे जगाचे ज्ञानी–ध्यानी,साधु,माया–ब्रम्हला समजणारे साधु संत आहे हे सतस्वरुपाचे साधु संत नाहीत सृष्टीचे सतगुरु फक्त सतस्वरुप आहे याकारणाने माया–ब्रम्ह जाणणारे साधु,ज्ञानी ज्यांना जग साधु समजतात ते सतस्वरुपी गुरु नाहीत हे भोळे जगातील लोक समजत नाही. ।।१९७।।

गुरू तो पदवी हमारी आदु ।। सुण ग्यानी कहुँ तोई ।।
भोळा जीव भेष सू ड़रपे ।। इऊँ नही माने मोई ।।१९८।।

ज्ञानींनो गुरु पदवी आधीपासुनच माझी आहे परंतु जगाचे भोळे लोक वेषधारी म्हणजेच गुरु आहे असे समजतात वेषधारी म्हणजेच परमात्मा आहे असे समजतात त्यांच्यात काळातून काढून देणारा सतस्वरुप परमात्मा आहे असे समजून घाबरतात जेव्हा की त्यांच्यात परमात्मा राहत नाही उलट होणकाळ राहतो माझ्या जवळ सतस्वरुप परमात्मा आहे परंतु मला गुरु म्हणून कोणी मानत नाही. ।।१९८।।

सुणो खून सकळ सिर भारी ।। ब्राम्हण जाणर ज्या मुज त्यागे ।।
ओ सुण खून कहुं नही छूटे ।। जे मोसू ई नर लागे ।।१९९।।

काही लोक मला ब्राम्हण जाणतात पंचाग,वेद पर्यंतचा जाणणाराच जाणतात मी पंचाग, वेद वाचणारा ब्राम्हण नाही मी सृष्टीचा परमात्मा,सतज्ञान जाणणारा खरा ब्राम्हण आहे

मी सतशब्द जाणणारा खरा ब्राम्हण आहे माझी खरी समज न आणता माझ्या सतज्ञानाशी लागत नाही,माझ्या सतज्ञानाला तजून राहिले आहे आणि माझ्याशी तोंड फिरवीत आहे अशा मनुष्यांच्या शिरावर सतस्वरुपाचा भारी गुन्हा राहील तो गुन्हा सृष्टीमध्ये ब्रम्हा, विष्णु,महादेव,शक्ती,माया ब्रम्ह या कोणाकडून ही सुटणार नाही. ।।१९९।।

**बे मुख फिरे भटकता आंधा ।। माया का गुण गावे ।।**
**सतस्वरूप आणंद पद कहिये ।। ओ कोई भेद न पावे ।।२००।।**

हे आंधळे ज्ञानी,ध्यानी माझ्याशी बेमुख होतात आणि मायेचे गुण गात होणकाळात फिरतात आणि होणकाळाच्या सुख–दुःखातच पडलेले राहतात सतस्वरुप आनंदपद जेथे सुखच सुख आहे त्याचा हे आंधळे भेद प्राप्त करत नाही. ।।२००।।

।। आगे की ५६ साखी लादी नही ।।

।। याचे पुढील सत्तावन्न श्लोक सापडले नाहीत,ते सत्तावन्न श्लोक सोडून पुढील श्लोकापासून भाषांतर सुरु केले आहे. ।।

**क्हे सुखराम सुणो सब ग्यानी,म्हे वो भेद बताऊँ ।**
**तीन पद आगे पद चोथो,सो प्रगट क्हे जाऊँ ।।५७।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व ज्ञानी,ध्यानींना सांगतात की,तीन पदाच्या पुढे चौथा आनंदपद कसे आहे हा लभेद प्रगट करुन सांगतो.।।५७।।

**ग्यानी सरब तिन पद जाणे, चोथे लग बुध नाही ।**
**जे कोई कहे प्रम पद चोथो तोही तिना के माही ।।५८।।**

ज्ञानी ध्यानी फक्त तीन पद जाणतात यांची चौथ्या पदापर्यंतची बुध्दी नाही कोणी ज्ञानी परमपद चौथा आहे असे तोंडाने म्हणतात परंतु त्यांचे परमपद म्हणजे चौथे पद तीन पदांच्या आतच आहे.।।५८।।

**तां को सुणो भेद म्हे भाकु, प्रगट कहुं बजाई ।**
**म्हा ग्यान सुई ग्यानी ध्यानी से सब समझो आई ।।५९।।**

त्याचा भेद मी प्रगट वाजवून ऐकवतो तो महाज्ञानींहूनही महाज्ञानींना तसेच ध्यानींहून महाध्यानींनो सर्व समजा. ।।५९।।

**करणी कियाँ प्रम पद मिलसी,जे एसी क्है आई ।**
**जे सब सुण सुख लग गावे,तिन पद के माई ।।६०।।**

कोणी मायेची करणी केल्याने परमपद म्हणजे चौथे पद मिळते असे येऊन सांगतात आणि त्यांची पोहच मायेच्या सुखांपर्यत आहे हे सांगतात मायेचे सुख तीन पदाच्या आतच असते ते सुख चौथे पद म्हणजे विज्ञान सुखाचे पद नाही. ।।६०।।

**जाँको सुणो अर्थ वो प्रगट,जग मे तोहे बताऊँ ।**
**नाना बिध उधम कर सुख हुवे, सो तिजो पद गाऊँ ।।६१।।**

हे ज्ञानी,ध्यानी चौथे पद म्हणतात ते चौथे पद नाही.ते तिसरेच पद आहे हे ज्ञानाने प्रगट करुन तुम्हाला मी सांगतो जसे जगतात मनुष्य नाना विधीचे उद्योग करुन गुरुच्या ज्ञानाचे सुख प्राप्त करतात,चौथ्या सतविज्ञान ज्ञानपदाला प्राप्त करीत नाही. ।।६१।।

**जिऊँ जग सर्ब उधम कर सुख ले,राज धुरा धुर भाई ।**
**आणंद मिले सकल कर्मा कर,इऊँ क्रणी जग मांई ।।६२।।**

जसे जगात उद्योग करुन राज्यापर्यंतचे सुख घेतात त्या उद्योगांमधून आनंद मिळतो ठिक याचप्रकारे होणकाळात करण्या करुन ज्ञानी,ध्यानीला त्रिगुणी मायेचा आनंद मिळतो करण्यांच्या फळांनी आनंद मिळतो,म्हणून त्याला आनंदपद म्हणून चौथे पद समजतात.ते आनंदपद म्हणून चौथे पद समजतात ते चौथे पद नाही ते तिसरेच पद आहे.।।६२।।

**तिजो पद क्रम कर लेवे,बोहो क्रणी कर भाई ।**
**जिऊँ संसार ब्होत कर हिकमत,ग्रेहे सुख लुटे जाई ।।६३।।**

जसे संसारातील लोक अनेक हिकमत करुन गृहस्थीचे सुख लुटतात असेच जीव अनेक करण्या,कर्म करुन मायेचे सुख घेतात हे सुख घेण्याचे पद माया-ब्रम्हपासून बनलेले साकारी मायेचे तिसरे पद आहे.।।६३।।

**चौथो पद क्रम सो न्यारो,सुन लो सब नर भाई ।**
**जिऊँ बिज्ञान उपजे नर कु ,कोण उदम से आई ।।६४।।**

चौथे पद हे कर्मकांडाहून वेगळे आहे हे सर्व स्त्री-पुरुष ऐका जसे संसारात कोणाला ज्ञान उपजते तो विज्ञानी कोणत्या उद्योग म्हणजे(कर्म)च्या बळावर विज्ञानी बनतो तो संसाराचा कोणताही उद्योग करीत नाही तरी ही त्याला विज्ञान उपजते अशाप्रकारे सतविज्ञान हे कर्माने प्रगट होत नाही ते सतगुरुच्या मेहेर ने प्राप्त होते.।।६४।।

**जोग तो आण तप कर सुख ले,आनंद ऊन केहे होई ।**
**ज्ञान आनंद पद सब सु न्यारो,गुरूु किर्पा करे सोई ।।६५।।**

योगी तप करुन योग प्राप्त करतो त्याच्यात त्याला योग प्रगट करण्याचे सुख येते या आनंदाला ही कोणी आनंदपद म्हणतात परंतु या आनंदापेक्षा विज्ञान आनंद वेगळा आहे ते विज्ञान आनंदपद सतगुरु कृपा केल्या शिवाय प्रगट होत नाही. ।।६५।।

**ज्ञान भेद आनंद सुख लीजे,ताँ की एक उपाई ।**
**गुरू आधीन ग्यान ही पढणे,ओर कछु नही भाई ।।६६।।**

जगात ज्ञानाचा आनंद घ्यायचा आहे तर गुरुशी आधीन होऊन ज्ञान शिकणे हाच एक उपाय आहे याच्या शिवाय दुसरा कोणता उपाय नाही अशाचप्रकारे सतविज्ञान पाहिजे असेल तर सतस्वरुप गुरुच्या आधीन होऊन विज्ञान प्रगट करुन घ्यायला पाहिजे याच्या

शिवाय होणकाळात दुसरा कोणता उपाय नाही. ।।६६।।

**ईऊँ सत स्वरूप आणंद पद चोथो,जिऊं बिज्ञान कहावे ।**
**तिजो आनंद जक्त सुख जेसो,सो करमा कर पावे ।।६७।।**

अशाप्रकारे सतस्वरुप आनंदपद हे चौथे पद आहे हे विज्ञान पद आहे हे कर्म केल्याने प्रगट होत नाही जगाचे ज्ञानी,ध्यानी आनंदपद चौथे पद ज्याला समजतात ते तिसरे पद आहे जसे जगातील लोक मन आणि पाच ज्ञानेद्रियांनी गृहस्थी जीवनात सुख घेतात तसे मन आणि ५ ज्ञानेंद्रियांनी वैरागी बनून वेदाच्या ज्ञानाचे सुख घेतात.।।६७।।

**क्हे सुखराम सत्त ईऊँ सबही,नास्त तो कछु नाही ।**
**आनंद होय फेर दु:ख आवे,आ कसर वाँ माही ।।६८।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की असे तर जगात सर्व खरे आहे,खोटे काही नाही परंतु ते ज्ञानी,ध्यानी जे आनंदपद म्हणतात त्याच्यात आनंद मिळतो परंतु परत दु:ख येते ही कसर ज्ञानी ध्यानी ज्याला आनंदपद म्हणतात त्याच्यात आहे परंतु मी जे आनंदपद प्रगट करतो आहे त्याच्यात फक्त सुखच सुख असते दु:ख मागितल्यावरही मिळत नाही तपाचा आनंद मिळतो.।।६८।।

**जिऊं जग आनंद पाय दु:ख पावे, राज धुरा धुर भाई ।**
**इंऊं जन मिल्या तिसरे पद मे,पडे संकट के मांही ।।६९।।**

जसे जगात कोण्या मनुष्याला राजपद मिळाल्याने सुख होते आणि काही दिवसांनी मिळलेले राजपद जाते मग असे राजपद गेल्याने मनुष्यावर दु:ख येते अशाच संताला तिसऱ्या पदात सुख मिळते त्याचे सुकृत संपले की तो दु:खात पडतो.।।६९।।

**जिऊं बिग्यान उपज्याँ निर्भे, बेरी सीर नही होई ।।**
**इंऊं सतस्वरूप पदवो चोथो, धारे हे बिर्ळा कोई ।।७०।।**

जगात विज्ञान कोणाला उपजते अशा विज्ञानीचा जगात कोणी ही वैरी राहत नाही तसेच चौथे सतस्वरुप विज्ञानपद प्रगट केल्यावर त्रिगुणी माया व काळ हे वैरी राहत नाही असे विज्ञान(बिरला)विरळाच धारण करतो.।।७०।।

**चोथो पद मिलण की जगमे, सतगुरू एक उपाई ।**
**क्रणी सकळ पद तिजेकी,नाँ नाँ बिध कर भाई ।।७१।।**

असे महासुखाचे चौथे पद मिळण्याकरीता चौथ्या पदाचे जाणकार सतगुरुची कृपा हाच एक उपाय आहे परंतु तिसऱ्या पदाला पोहचण्याकरीता मायावी करण्याचे नाना प्रकारचे उपाय आहेत. ।।७१।।

**सतगुरू म्हेर सता घट जागे,से सतगुरू सत जाणो ।**
**क्रणी ग्यान बतावे आयर ।। जे गुरू कुळस पिछाणो ।।७२।।**

ज्या सतगुरु मेहेरने चौथ्या पदाची सत्ता जागृत होते तेच सतगुरु खरे माना जे गुरु मायेच्या करण्या,ज्ञान शिष्याला शिकवितात ते गुरु मायेचे आहेत,सतपदाचे नाहीत असे माना माया मृतक आहे गुरु मृतक देशाच्या करण्या करायला लावतो तर समजा सतपदाचा पोहचवाला गुरु नाही तो काळ बुध्दीचा कलुवित गुरु आहे असे समजा. ।।७२।।

**क्हे सुखराम सतगुरू सोई, सत की भक्त बतावे ।**
**सतस्वरूप घट माहे प्रगटे,ऊलट अगम घर जावे ।।७३।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,जो सतची भक्ती सांगतो तोच सतगुरु आहे त्याच्या कृपेने शिष्याच्या घटात बंकनाळच्या रस्त्याने उलटून अगम घरी जातो शिष्यात ही रीत बनत नाही तर ते सतगुरु नाही,मायेचे गुरु आहे असे समजा. ।।७३।।

**सतगुरू सोई सेज में शिष कुं ,नावँ प्राप्त होई ।**
**नख चख माहे सत प्रकासे, निमष खंडे नही कोई ।।७४।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,सतगुरु तेच आहेत ज्यांच्याने शिष्याला सहजात सतनाम प्रगट होते ते सतनाम शिष्याच्या घटात नखापासून डोळ्यापर्यंत ध्वनी आणि सतप्रकाश प्रगट करुन देतात ते ध्वनी आणि प्रकाश निमिष मात्राकरीता ही खंडीत होत नाही. ।।७४।।

**ओर सकळ गुरू बचन सरूपी, जिऊं कुळ में ग्यानी**
**सबही बुझ काम कु लागे, न्यात पाँत लग जानी ।।७५।।**

जसे कुळात आणि जाती–पातीमध्ये ज्ञानी असतात त्या ज्ञानीला कुळाचे आणि जाती –पातीचे लोक विचारतात त्यावर कुळाचे आणि जाती–पातीच्या लोकांना ज्ञानी ज्ञान सांगतो अशा सांगितलेल्या वचनांनुसार कुळाचे आणि जाती–पातीचे लोक संसाराचे काम करतात परंतु त्या ज्ञानींच्या संसाराच्या कामांच्या वचनांनी कोणी ही वैरागी बनत नाही असेच मायेचे गुरु जगात पाप,पुण्य लक्ष्यात ठेवून उपाय सांगतात त्यांच्या या पाप–पुण्याच्या उपायांनी कोणालाही सतस्वरुप वैराग्य प्रगट होत नाही असे बाकी सर्व गुरु सतगुरु होत नाही. ।।७५।।

**आप आपके सब बस माही,समज वान कु बूझे ।**
**जात पाँत कुळ चाल कसर सो, सब सेणे कु सूजे ।।७६।।**

समजदाराला जाती–पाती,कुळाच्या चालीमध्ये जी कसर आहे ती समजते ती कसर या समजने मनुष्य कुळाच्या तसेच जाती–पातीच्या लोकांना समजावतो याकारणाने कुळाचे व जाती पातीचे लोक समजदाराच्या वश मध्ये राहतात. ।।७६।।

**क्रणी आण बतावे कोई, सिंवरण लग जन काई ।**

से सब गुरू जात में सेणा,हद बेहद लग भाई ।।७७।।

जसे कुळात व जातीपातीत कुळ व जाती–पातीचे उंच्च समजचा मनुष्य असतो तसेच जो संत येऊन करणी व स्मरण एकाच मायेच्या विध्या करण्यास सांगेल तो गुरु माया ब्रम्हच्या कुळाचा उंच समजचा साधु आहे असे समजावे या संतापासून हद व बेहद पर्यंतची प्राप्ती होईल हद बेहदच्या पलिकडे सतस्वरुपाची प्राप्ती होणार नाही. ।।७७।।

**कुळ गिन्यान माहे सब समजे,राज रीत लग जाणे ।**
**ईऊँ अे गुरू सकळ कन फूंका, माया ब्रम्ह बखाणे ।।७८।।**

जसे समजदार कुळ व राज्यापर्यंतच्या ज्ञानाला जाणतो परंतु वेदाच्या ज्ञानाला जाणत नाही तसेच जगाचा गुरु माया ब्रम्हचे कुळ व होणकाळ पारब्रम्हच्या राज्यापर्यंत वर्णन करतो परंतु सतस्वरुपाच्या सतगुरु पदाचे वर्णन करीत नाही अशा जगातील गुरुला कानफुका गुरु म्हणतात ते गुरु सतपदाचे गुरु नाहीत. ।।७८।।

**अे सब गुरू सकळ सो न्यारा,जात पाँत जिऊँ होई ।**
**कुळ मरजाद जिसी इण सब की, पाप पुन्न में दोई ।।७९।।**

जगात अनेक जाती–पाती असतात तसेच त्या जाती–पातीच्या अनुसार प्रत्येक जातीची कुळ मर्यादा जाणणारे शहाणे समजदार ज्ञानी मोठे लोक जातीत असतात. अशाच प्रकारे होणकाळात अनेक करण्या ज्ञान,ध्यान असतात या प्रत्येक करणी ज्ञान ध्यानाच्या अनुसार प्रत्येक करणी ज्ञानी ध्यानाचे उंच कर्म आणि निच कर्म म्हणजे पाप–पुण्य परिणाम जाणणारे अनेक गुरु जगाचे शहाणे समजदार ज्ञानी मोठ्या लोकांसारखे होणकाळात राहतात त्या सर्व गुरुची पोहच पाप पुण्यापर्यंतची राहते पाप पुण्याच्या पलिकडे विज्ञान ज्ञान आनंदपदाची राहत नाही. ।।७९।।

**इंन कुं गुरू कहे सो भोळा, गुरू पद इनके नाही ।**
**आतो नकल क्हेण की शोभा, जिऊं दिपक जग मांही ।।८०।।**

अशा कुळात ठेवणाऱ्या ज्ञानीला भोळे लोक सतगुरु म्हणतात ते गुरुपदाचे गुरु नाहीत ते मायेचे कानपुंके गुरु आहेत हे गुरुची नक्कल आहे जगात सांगण्या पुरते शोभेच्या कामाचे आहे जगात जसा सुर्याचा प्रकाश आणि दिपकचा प्रकाश आहे त्याला प्रकाशच म्हणतात दिपकच्या प्रकाशाने सुर्यासारखे जग सुझू शकत नाही घराच्या आतपर्यंतच बघु शकतात तसेच या गुरुंपासून होणकाळच समजू शकतो,सतस्वरुप समजू शकत नाही सतस्वरुपाच्या समज करीता दिपक समोर सुर्य आहे तसा होणकाळी गुरु समोर जे सतस्वरुपी गुरु आहेत तेच धारण करावे लागतात. ।।८०।।

**अे तो सकळ ऊजागर कुळका, ब्रम्ह भेद कु जाणे सो पद**
**सकळ सिष्ट कु क्रता, ताकु ताण बखाणे ।।८१।।**

जसे कुळाचे समजदार मनुष्य असतात असे हे मायाब्रम्ह कुळाचे ज्ञानी आहेत हे पितारुपी ब्रम्हच्या भेदालाच जाणतात पितारुपी ब्रम्ह हाच सृष्टीचा कर्ता आहे असे जगाला ताणून-ताणून वर्णन करुन सांगतात पितारुपी कर्त्याच्या पुढचे गुरुपद यांना माहीत राहत नाही. ।।८१।।

**से गुरू नहीं सुणो नर नारी,जे कुछ कारण राखे ।**
**नार पुर्ष न्यारा गुरू करणा, ऐसी दुर्मत भाखे ।।८२।।**

सर्व स्त्री-पुरुष ऐका काही गुरु पती-पत्नीने एक गुरु करु नये असे सांगतात एक गुरु केला तर पती-पत्नी राहत नाही,भाऊ-बहीण बनून जातात असे निचमतीचे कारण सांगतात ते गुरु सतगुरु नाहीत. ।।८२।।

**ए तो मधम गुरू जग मांही, माया का गुण लावे ।**
**ज्यूँ मर्जाद जक्त में बांध्या,कोई न छूटण पावे ।।८३।।**

ते मध्यम गुरु आहे ते सतस्वरुप पदाला पोहचलेले गुरु नाही याकारणाने देहाला बघुन कारण सांगतात.ते जीवाला बघुन कारण बोलत नाही जीव तर आधीपासून एक आहे त्या जीवात पती-पत्नी हे वेगळेपण नाही पती-पत्नी देहाचे वेगळेपण आहे म्हणून असे हे देहाचे गुरु आहे जीवाचे गुरु नाही अशा मध्यम गुरुंनी जगात खोटी मर्यादा बांधली परंतु जीवांना हे खोटे आहे हे समजत नाही म्हणून या मर्यादेत सर्व जग असते या मर्यादेला कोणी ही त्यागने इच्छीत नाही. ।।८३।।

**मधम गुरू सबही जे जग में, जाँ म्रजादा बाँधी ।**
**एक ब्रम्ह बिचे कर दुबद्या, बेर दिष्ट कर सांधी ।।८४।।**

जगात सर्व मध्यम गुरुंनी ही मर्यादा बांधली आणि आधीपासून सर्व जीव एक ब्रम्ह होते,त्याच्यात देहाची मर्यादा टाकून एकच ब्रम्ह दोन सांगितले अशी जीवांमध्ये दुविधा उभी करुन जीवांमध्ये वैर दृष्टि उत्पन्न केली आहे.।।८४।।

**न्हाक्यो भ्रम झूट केबत को, ज्याँ बिच लेण न देणा ।**
**उलटा बेर बंदे हंस ऊर, जुग जुग दावा लेणा ।।८५।।**

अमरलोक जाण्याकरीता ज्याचे काही घेणे-देणे नाही असे या गुरुंनी जगाच्या लोकां मध्ये,जीवांमध्ये गुरु भाऊ,गुरु बहीणीचे खोटे केबत टाकून भ्रम टाकून दिले या कारणाने हंसाचे मी ही ब्रम्ह आहे आणि सर्व जग ही ब्रम्ह आहे हे पाहतो बंद होऊन गेले त्याच्याने हंसाने ब्रम्ह असूनही जीवपणा धारण करुन घेतला.जीवपणा धारण केल्याने तुझ्या-माझ्यात लागून गेले जीवाची आधी आपसात तुझे माझे नव्हते सर्व एक दुसऱ्याचे मित्र होते तुझे-माझे कारणाने सर्वांच्या मनात एक-दुसऱ्यांचे वैरी बनून गेले आणि वैऱ्यांच्या नुसार आपसात कर्म करु लागले अशा कर्माचे दावे युगा युगा

पर्यंत जीवाला भोगावे लागून राहिले आहे या गुरुंच्या आसऱ्याने जीव अमरलोकात तर गेला नाही परंतु यांच्या मध्यम ज्ञानाने युगा युगापर्यंत काळाचे दुःख भोगून राहिला आहे. ।।८५।।

**मधम गुरू की अे सब बाँता, भ्रम द्रढावे आणी ।**
**गुण ओगण माया को देखे, ब्रम्ह न चिने प्राणी ।।८६।।**

जीवामध्ये भ्रम दृढ करणे ही मध्यम गुरुची गोष्ट आहे हे देहरुपी मायेचा गुण–अवगुण पाहतात हा जीव अमरब्रम्ह आहे,हे शोधत नाही. ।।८६।।

**देहे आकार कसब सो देखे, माया का गुण गावे**
**ब्रम्ह अखंड अपर बळ मांही, सो गुण सर्ब उठावे ।।८७।।**

हे गुरु जीवाच्या आकारी देहाचा कसब पाहतात जीवाचा देह माया आहे,असे मायेच्या गुणाचे वर्णन करतात.ब्रम्ह अखंड अमर आहे,अपरबळ आहे त्यामुळे मायेचा देह मिळाला आहे हे हंसाच्या ब्रम्हचा गुण उठवून देतात आणि मायेचा गुण थापून देतात म्हणजे देहाचा गुण थापून देतात. ।।८७।।


**मधम गुरू की अे सब बाताँ, सुणज्यो सब नर नारी ।**
**ब्रम्ह छाड माया कु पूजे, ब्हो सीर क्रिया धारी ।।८८।।**

सर्व स्त्री–पुरुष ऐका या मध्यम गुरुच्या गोष्टी आहेत हे मध्यम गुरु सतस्वरुप ब्रम्हला सोडून नश्वर मायेला पुजतात आणि या नश्वर मायेच्या सर्व क्रिया शिरावर धारण करतात. ।।८८।।

**इण की बुध अक्कल सो आई,आगे दोड़ न कोई ।**
**जिऊं बस नार कियो नर सेती, इऊं अे ग्यानी सोई ।।८९।।**

यांची बुध्दी व अक्कल मायेपर्यंतच आहे मायेच्या पलिकडे सतस्वरुप ब्रम्हची अक्कल नाही जसे कोणी स्त्री–पुरुषाला वश करुन घेते त्या स्त्रीच्या वश झालेला पुरुष स्त्रीच्या अक्कले पुढे जाऊ शकत नाही अशाचप्रकारे हे मध्यम गुरु मायेच्या सुख दुःखापर्यंत सिमीत होऊन गेले म्हणून त्यांना मायेच्या पलिकडील सतस्वरुप ब्रम्ह सुख समजत नाही. ।।८९।।

**ब्रम्ह रूप उजळ गुरू कहिये,से सब भ्रम उड़ावे ।**
**कारण मेर तोड़ म्रजाद, ब्रम्ह देश पर लावे ।।९०।।**




ब्रम्हज्ञान जाणणारा गुरु उज्ज्वल गुरु आहे ते गुरु पारब्रम्ह रुपी आहे ते गुरु अशा मध्यम गुरुने बांधलेली मायावी मेर मर्यादा तोडून देतात आणि हंसाला होणकाळ ब्रम्हदेशाच्या ज्ञानीची समज देतात आणि हंसाची समज बुध्दी होणकाळ ब्रम्हदेश वर आणतात. ।।९०।।

क्रणी सकळ भ्रम माया का, सो नहीं माने कोई ।
केबत सकळ झूठ कुळ करणी, से मरजाद बणाई ।।९१।।

सर्व प्रकारच्या करण्या सर्व प्रकारचे मायावी भ्रम जसे पती–पत्नी ने एक गुरु करु नये असे सर्व भ्रम केबत व ब्रम्हा,विष्णु,महादेव,शक्तीच्या करण्या आणि ब्रम्हा,विष्णु,महादेव, शक्तीने बनवलेल्या मर्यादा मानत नाही ह्या सर्व गोष्टी माया समजतात, खोट्या समजतात. ।।९१।।

अेकी ब्रम्ह सकळ में देखे, माया गुण नहीं माने ।
उत्तम गुरू सेई जग केहे, पाप न पुन्न न जाने ।।९२।।

हे उत्तम गुरु सर्वांमध्ये ब्रम्ह पाहतात हे कोणाचेही माया गुण पाहत नाही यांना सर्व जग उत्तम गुरु म्हणतात असे उत्तम गुरु त्रिगुणी मायेला मानत नाही म्हणून शुभ कर्म आणि अशुभ कर्म मानत नाही याकारणाने पाप–पुण्याला मानत नाही. ।।९२।।

बेटी बेण नार सो चेली, ना माको गुण जाणे ।
सबही त्याग भावे सो बरतो, सब में ब्रम्ह पिछाणे ।।९३।।

हे उत्तम गुरु मुलगी,पत्नी,बहिण व चेली आणि आई या सर्वांना देहाने पाहत नाही माझ्या सारखे सर्व ब्रम्ह आहे,असे ओळखतात याकारणाने मुलगी,पत्नी,बहिण,चेली व आई सोबत ब्रम्हला कर्म लागत नाही मी पण ब्रम्ह आहे आणि हे सर्व ब्रम्ह आहेत या भावाने या सर्वांसोबत देहाने वर्तन करतात. ।।९३।।

उत्तम गुरू तिके सुण कहिये,भ्रम उड़ावे सारा ।
पाँचु भोग आत्मा भाड़ो,ब्रम्ह नहीं डूबण हारा ।।९४।।

हे ब्रम्हज्ञानी मी ब्रम्ह आहे,मी देह नाही समयानुसार मी देहात आलो आहे,देहाला पाच आत्मा आहे ह्या पाच आत्मा देहापासून पाच सुख चाहतात मला या देहात राहायचे आहे तर देह जे चाहतो ते पुरवले पाहिजे जसे कोणी कोण्याच्या घरी राहायला जातो, तो घराचा उपयोग करतो घर उपयोगात आणतो म्हणून राहणारे घराचे भाडे देतो. अशाप्रकारे देह हे माझे घर आहे,त्याला पाच सुख पाहिजे तर भाड्यासारखे ते मी द्यायला पाहिजे मी तर ब्रम्ह आहे,मला कोणते कर्म लागतच नाही याकारणाने मी पाची आत्म्याच्या देहाला सुख दिले तरी ही मी कर्मांच्या दु:खामध्ये बुडेल हे काही कारण नाही असे ब्रम्हज्ञानी समजतात. ।।९४।।

ओतो आप भ्रम में भुलर,क्रमा के बस होवे ।
भ्रम ग्यान सुण गेहे कर्मा कु,उलटो उन कुं रोवे ।।९५।।

ब्रम्हज्ञानी असे समजतात की जीव हा ब्रम्ह आहे,हा ब्रम्ह भ्रमात पडून मी ब्रम्ह आहे हे विसरुन गेला आणि कर्मांच्या वश होऊन गेला आणि ब्रम्हज्ञान विसरुन भ्रम ज्ञान धारण

करुन घेतले आणि कर्म मला काळाचे दु:ख भोगवेल असा चिंतीत होऊन गेला. ।।९५।।

**नहीं तो क्या क्रम कर सक्के,जे आपो ओ जाणे ।**
**ओ तो ब्रम्ह अग्न की झाळा,क्हा गेहे कचरो ताणे ।।९६।।**

हे ब्रम्हज्ञानी समजतात की हा जीव मी ब्रम्ह आहे,असे समजतो तर कर्म बिचारा या ब्रम्हचे काय करु शकेल हा ब्रम्ह तर अग्नीज्वाले सारखा आहे आगी पुढे कचरा काय करु शकतो जीवाने भ्रम ज्ञान धारण केले आणि कर्मांच्या वश होऊन गेला ब्रम्ह अग्नी सारखे आहे हे समजत नाही जर ब्रम्ह अग्नी सारखे आहे हे समजत होते तर हे ब्रम्ह जीव बनून कर्मांच्या वश झालाच नसता. ।।९६।।

**ओ तो बचन रूप सुण होई,क्हो कुण गहे बिच्चारो ।**
**सातुँ भाँत भोग कर निकसे, कंही नहीं अटकण हारो ।।९७।।**

ब्रम्हज्ञानी समजतात की हा ब्रम्ह माये सारखा स्थुल नाही हा वचनस्वरुप आहे जसे वचन बोलल्यानंतर देहासारखे वचन पकडू शकत नाही अशाच प्रकारे ब्रम्हला कर्म पकडू शकत नाही हा ब्रम्ह वेगळे वेगळे साती भोग घेऊन निघुन गेला तरी ही त्याला त्या कर्मांमधून कोणते ही कर्म अटकवू शकत नाही. ।।९७।।

**निजर दोड़ भिष्टा पर पड़गी, फिर इम्रत पर जाई ।**
**तिल भर बोझ बास नही वाँ कुं ,इंऊं ब्रम्ह हे क्रम माई ।।९८।।**

जसे कोण्या मनुष्याची नजर विष्टेवर पडून गेली व नजर तेथून निघुन अमृतावर चालली गेली तर त्या नजरवर तीळभरही ओझे होत नाही.विष्टेची तीळभरही वास लागली नाही अशाप्रकारे ब्रम्हला कर्म लागत नाही. ।।९८।।

**ईया कुं क्रम न लागे कोई,ज्यूं पर अंग न भिजे ।**
**ओतो उलट गहे क्रमा कुं ,सोच करे कर छिजे ।।९९।।**

जसे आड पक्षी पाण्यात लागोपाठ डुबक्या लावतो परंतु त्या आड पक्ष्याच्या पंखापासून तर शरीर भिजत नाही,तसेच ब्रम्हला कर्म लागत नाही हा जीव ब्रम्ह होऊन ही भ्रमात पडून कर्मांना पकडतो आणि कर्माच्या प्रती विचार करुन क्षिण होत असतो.।।९९।।

**क्रम बिचारा क्या कर सक्के,जे बस्तर सम होई ।**
**ज्यु धन माल हवेली घोडा,नर पकडया कँहु तोई ।।१००।।**

जसे मनुष्य शरीरावर वस्त्र घालतो तसे कर्म ब्रम्हवर राहतात शरीरावर कपडे घातले म्हणून ते शरीरावर दिसतात जर आम्ही घातले नसते तर ते शरीरावर दिसले नसते ते कपडे शरीरावर त्यांच्या बळाने येत नाही आले असते जसे मनुष्याजवळ धन,माल, हवेली,घोडे इत्यादी आहेत हे धन,माल,हवेली,घोडे इत्यादींना मनुष्याने पकडले यांना त्या मनुष्याने सोडून दिले तर हे धन,माल,हवेली,घोडे,मनुष्याला पकडतील काय?अशाच

प्रकारे ब्रम्हने कर्माला पकडले आहे ब्रम्ह जर कर्माला त्यागून देईल तर हे कर्म ब्रम्हला पकडणार नाही. ।।१००।।

**छाडर चलें डार नर इनकु ,जब कुण पकडे आई ।**
**यू सब ध्रम क्रम सों माया, जे समझे ब्रम्ह भाई ।।१०१।।**

जसे धन,माल,हवेली,घोडे यांना कोणी सोडून गेले तर यांच्यातून सोडणाऱ्याला कोणी पकडत नाही अशाचप्रकारे सर्व धर्म आणि कर्म माया या ब्रम्हने पकडून ठेवली आहे जर ब्रम्ह हे सोडून देतो तर हे कर्म,धर्म आणि माया ब्रम्हला ही कधी पकडणार नाही.।।१०१।।

**क्हे सुखराम करम को काँई, जे अपणे बस सारा**
**सतगुरू बिना छूट नही सक्के, मुरख जीव बिचारा ।।१०२।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,ब्रम्हज्ञानी समजतात की जीव भ्रमामुळे मुर्ख होऊन गेला सर्व कर्म जीवाच्या वश आहेत तरी ही जीव भ्रमामुळे कर्माच्या वश होऊन गेला आहे हा भ्रम पारब्रम्ह जाणणाऱ्या सतगुरु शिवाय सुटू शकत नाही.।।१०२।।

**ज्युं आधीन भ्रम सुण कोई,पाखंड के बस हुवा ।**
**इऊं आधीन क्रम से हंसो, भेद न जाणे जुवा ।।१०३।।**

हा जीव भ्रमाच्या आधीन झाल्याकारणाने अशा पाखंडी समजच्या वश होऊन गेला या पाखंडी समजच्या कारणाने कर्म हंसाच्या वश आहे हा भेद जाणत नाही. ।।१०३।।

**सतगुरू मिले तबे सुध आवे,क्हा क्रम अटके मोई ।**
**जे सब जीभ भछन खाणे कीं,चाय बराबर होई ।।१०४।।**

ब्रम्ह समजणारे सतगुरु मिळाल्यावर ही पाखंडी समज संपून जाईल आणि कर्म ब्रम्हला पकडू शकत नाही म्हणून मला कर्म काय अटकवतील ही खरी समज येईल जसे जीभ अनेक पदार्थ भखण करते परंतु भक्षण केलेला एक ही पदार्थ जीभेला चिपकलेला राहत नाही या सर्व पदार्थांपासून जीभ वेगळी राहते.अशाचप्रकारे ब्रम्ह सर्व कर्म करतो परंतु जसे खाल्लेल्या पासून जीभ वेगळी राहते तसे जीवब्रम्ह सर्व कर्मां पासून वेगळा राहतो असे ज्ञान सतगुरु पासून(कडून)समजल्यावर ब्रम्हला कर्म लागतात हे खोटे भ्रम संपून जातील(निघून)।।१०४।।

**पवन बास लेत सब सारी,कछु नही छोड़े भाई ।**
**क्हो वा चीज कोण सी छोडर,गहे पवन कहुँ माई ।।१०५।।**

श्वास सर्व सुगंधी आणि दुर्गंधी सहज घेतो एक ही सुगंध व दुर्गंध सोडत नाही आता तुम्ही विचार करा तो कोणती सुगंध पकडून ठेवतो व कोणती दुर्गंधी सोडून देतो अशाच प्रकारे ब्रम्ह नीच आणि उंच कर्म करतो परंतु त्याच्या सोबत एक ही कर्म राहत नाही. ।।१०५।।


**यूं सब क्रम हंस से न्यारा,जे सोझी सुध पावे ।**
**मन मांगे सोई करो जक्त मे,आडो कोई न आवे ।।१०६।।**

अशाचप्रकारे हंस सर्व कर्मांहून न्यारा आहे हे ज्ञान पारब्रम्ह सतगुरुशी भेटल्यावरच खरी समज येते अशाचप्रकारे जीवाला कोणते कर्म लागत नाही याकारणाने मन मागेल ते जगातील सर्व निच कर्म असो वा उंच कर्म असो हे सर्व करा या ब्रम्हला भोगविण्या करीता कोणते ही कर्म आड्वे येत नाही. ।।१०६।।

**असो भेद उत्तम गुरू पायाँ, मिले हंस के ताँही ।**
**पूर्ण ब्रम्ह लग सो पहुँचे आगे की गम नाँई ।।१०७।।**

अशी समज उत्तम गुरु मिळाल्यावर हसांला येते असे ज्ञान प्राप्त करणारे ब्रम्हज्ञानी पूर्णब्रम्ह पर्यंत पोहचतात त्याच्या पुढे सतस्वरुप सुखात कधी पोहचत नाही. ।।१०७।।

**उत्तम गुरू जक्त मे असा,ब्रम्ह सरूपी जाणो ।**
**जिण प्रताप ब्रम्ह हुवे हंसा ऊद बुद कळा पिछाणो ।।१०८।।**




असे उत्तम गुरु जे जगात आहेत त्यांना पारब्रम्हस्वरुपी जाणा यांच्या प्रतापाने हंस मायेतून निघून ब्रम्ह बनतो अशा गुरुजवळ ब्रम्ह बनण्याची अद्‌भूत कला आहे हे ओळखा. ।।१०८।।

**म्हा प्रळे लग रहे पद माही, पिछे सब यहाँ आवे ।**
**निर्भे मोख नही इण गुरू से, जे निर्गुण पद जावे ।।१०९।।**

असे ब्रम्हज्ञानी महाप्रलयापर्यंत निर्गुण ब्रम्हपदात राहतात महाप्रलयानंतर परत सृष्टीची रचना होते तेव्हा हा हंस परत सृष्टीत येतो आणि सृष्टीचे सुख दु:ख भोगतो ते काळाच्या मुखातून बाहेर निघत नाही याकारणाने अशा उत्तम गुरुपासून निर्भय मोक्ष होत नाही नेहमी काळापासून सुटणे होत नाही. ।।१०९।।

**के सुखराम सतगुरू समरथ,सतासरूपी होई ।**
**निर्भे मोख हंस सो पावे,से गुरू कहु अब तोई ।।११०।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी आता पर्यंत मध्यम व उत्तम गुरुचे वर्णन सांगितले आता सत्तास्वरुपी समर्थ सतगुरु कसे राहतात त्यांचे वर्णन सांगत आहेत ज्या गुरुमुळे हंस निर्भय मोक्ष प्राप्त करतो त्या गुरुचे वर्णन आता सांगत आहे. ।।११०।।

**ओर गुरू सब कहे उपायाँ,कर क्रणी जग माही ।**
**सतगुरू म्हेर सता घट जागे,क्रणी कुछ भर नाही ।।१११।।**

हे मध्यम गुरु शिष्यांना होणकाळाच्या करण्यांचे उपाय सांगतात हे सतस्वरुपी सत्ता करण्यांनी प्रगट होत नाही म्हणून सतगुरु सत्ता प्रगट होत नाही याकरीता सतगुरु सत्ता

प्रगट करण्या करीता फक्त सतगुरुची मेहेर पाहिजे असते मायेची एक ही करणी करण्याची गरज राहत नाही. ।।१११।।

राव रंक क्रमी अर धर्मी,सरणे आयाँ सारा ।
सता सकळ घट जागे तनमे,उलटर चडे बिचारा ।।११२।।

राजा असो वा रंक असो,उंच धर्माचा असो वा निच धर्माचा असो,सतगुरुच्या शरणात आल्यावर सर्व घटात सत्ता जागृत होते आणि शिष्याचा हंस घटात बंकनाळेने उलटून दहाव्याद्वाराच्य गडावर चढतो.।।११२।।

सतगुरू दया सोई सब कर्णी,भजन भाव सब सारा ।
साझन जोग तपसो क्रिया, द्रसन हेत बिचारा ।।११३।।

सतगुरुच्या दयेमध्ये मायेच्या सर्व करण्या भजन आणि भाव सर्व येऊन जाते सर्व साधन,सर्व योग,सर्व तपस्या व सर्व क्रिया कर्म सतगुरुच्या दर्शनात तसेच व सतगुरुशी प्रिती करण्यात येऊन जाते.।।११३।।

हंसे बस नहीं कुछ काई,जोग रीत बिध होवे ।
उलटर पीठ फाड चले जे,दसवे द्वार जाय खोवे ।।११४।।

सतगुरुच्या सत्तेत वश झालेल्या हंसाने योग,तप,क्रिया इत्यादी मायावी विध्या होत नाही.ही सतगुरुची सत्ता हंसाला मुखाच्या पुढे करते आणि पाठीतील बंकनाळच्या रस्त्याने उलटून पाठीचे २१ मणी छेद्न करते आणि दहाव्येद्वार उघडते.।।११४।।

कर्म न धर्म न नही लागे कोई, सब हाजर हुवे आई ।
म्हा निच सुंई नीच क्रम हे,सेई सब उधरे भाई ।।११५।।


अशा संताला होणकाळाचे कोणतेही कर्म,धर्म लागत नाही सर्व कर्म,धर्म संताला सुख देण्यासाठी हजर असतात.संताच्या हाताने कर्म झाल्यावर संताने केलेल्या कर्मांचा उध्दार होतो म्हणून महानीचहून नीच कर्म आणि महानीचहून नीच धर्म संताच्या हातून व्हावे या इच्छेत राहतात. ।।११५।।

सत्त लोक आणंद पद पावे,निर्भे वे हँस होई ।
म्हा प्रळा उत्पत हुवो केती,उठेसों डिगे न कोई ।।११६।।

ते हंस सतलोक आनंदपदात जाऊन निर्भय बनून जातात महाप्रलय आणि उत्पत्ती किती वेळाही झाली तरी ही ते हंस अमरलोकाच्या सुखात स्थिर राहतात ते होणकाळाच्या काळाच्या दु:खात येत नाही. ।।११६।।

सतगुरू सकळ सिष्ट का गुरू हे,भेद बिना नहीं जाणे ।
इम्रत जडी सजीवन जग मे,खिण नर कोइन आणे ।।११७।।

सत्तास्वरुपी सतगुरुच सर्व सृष्टीचे गुरु आहेत हे जगातील ज्ञानी,ध्यानीला भेद




माहित नसल्या कारणाने सतगुरुला जाणत नाही अमर करणारी संजीवनी जडी जगात असते परंतु तिला कसून शोधुन घरी कोणी आणत नाही अशाचप्रकारे अमर करुन देणारे सतगुरु जगात असतात परंतु कोणी शोधून कसून त्यांच्या शरणात जात नाही. ।।११७।।

**घास काट सबही घर आणे अष्ट धात कूं खोदे ।**
**चिंत्रामण कु कोइन चिने,ना कस कर नर सोधे ।।११८।।**

गवत कापून सर्व घरी आणतात येथपर्यंत की अष्ट धातुला ही खोदून घरी आणतात परंतु संजीवनी जडी व चिंतामणीला कोणी ओळखत नाही याकरीता कसून शोधत ही नाही अशाप्रकारे सर्व दु:खांची चिंताहरण करणारे आणि सर्व सुख प्रदान करणारे सतगुरु होणकाळात राहत असतांनाही अशा सतगुरुना ओळखत नाही याकारणाने असे सतगुरु होणकाळात असूनही शोधत नाही. ।।११८।।

**सोध्या ज्याँ रतन नही पावे,नर इण जग के माही ।**
**जे कहुँ सेज मिले नर सेती, तो ओ माने नाही ।।११९।।**

जसे जगातील लोकांनी काही ठिकाणी रत्न शोधले परंतु तेथे रत्न नव्हते.म्हणून त्यांना रत्न मिळाले नाही आणि जेथे सहज मध्ये रत्न मिळते अशा जगाचा विश्वास येत नाही.म्हणून तेथे रत्न असेल हे मानत नाही अशाचप्रकारे होणकाळाचे ज्ञानी,ध्यानी, योगी, तपस्वीमध्ये सतगुरु सत्ता शोधली परंतु तेथे सतगुरु सत्ता नव्हती याकरीता शोधणाऱ्याला सत्तारुप रत्न मिळाले नाही जेथे सतगुरु सत्ता प्रगट आहे आणि त्यांच्या शरणात गेले ती सत्ता हंसाच्या घटात सहज प्रगट होऊन जाते अशा संतावर जगाचा विश्वास बसत नाही या कारणाने खरे सत्ताधारी जगात असुन ही अशा सतगुरुला मानत नाही. ।।११९।।

**किंऊं उण चीज सुणी येहे शोभा, लिदी कदे न कोई ।**
**केसे प्रख पले ओ बांधे,केण चीन गुण दोई ।।१२०।।**

संजीवन जडी,चिंतामणी,रत्न या वस्तुंची आधी शोभा ऐकली होती परंतु कोणी ही त्यांना घेतले किंवा दिले असे कधी पाहिले नाही या कारणाने प्रत्यक्ष पारख समजली नाही प्रत्यक्ष पारख शिवाय या वस्तुंना आधी ऐकलेल्या शब्दांनी पारखणे आणि त्यांचे गुरु बघणे हे कोणाला येत नाही या कारणाने खरी संजीवनी जडी,चिंतामण,रत्न मिळाले तरीही कोणी पदरी बांधत नाही.या वस्तुंचे गुण शब्दांमध्ये सांगणाऱ्याकडून बरोबर सांगितले जात नाही मग ऐकणारा सांगणाऱ्याचे गुण सांगण्यात आणि ऐकणाऱ्याचे ऐकण्यात दोघांमध्ये खुप अंतर पडून जाते.याकरीता ती वस्तु पारख करुन घेता येत नाही अशाचप्रकारे सत्ताधारी सतगुरुची संतांच्या मुखाने शोभा ऐकली परंतु खरे तर

सतगुरु शिष्यात सत्ता प्रगट करुन देते वेळी कोणी पाहीले नाही ज्या संतांनी सतगुरुची शब्दांमध्ये पारख सांगितली त्यांनाही सतगुरु कसे असतात हे पूर्ण माहीत राहत नाही याकारणाने सतगुरु सांगणारा सतगुरु पारखचे गुण सांगण्यात फरक करुन देतो आणि पारख शिकवणारा पारख कशी करावी हा गुण योग्य प्रकारे समजू शकत नाही म्हणून ऐकणारा ही समजण्यात अंतर करुन देतो.याकारणाने सत्ताधारी सतगुरु जगात असतांना ही जग अशा सतगुरुची पारख करु शकत नाही.अशा सतगुरुची पारख होत नाही याकरीता त्यांचा शरणा धारण करीत नाही.।।१२०।।

**बाताँ गल्ला सुणी जग माही,तामे भेळ अपारा ।**
**खंड बंड इधकी कहुँ ओछी, किऊँ कर गहे बिचारा ।।१२१।।**

जगात अपार मिश्रणासहीत सतगुरुच्या गुणाच्या गोष्टी,गप्पा साधुंकडून ऐकल्या साधुंनी इकडचे तिकडचे जोडून सतगुरुंच्या गुणांना कमी–जास्त करुन जगाला समजावले जगाला सतगुरुचे खरे गुण समजले नाही याच्याने जीव सतगुरुला धारण करु शकला नाही. ।।१२१।।

**मिलियां भ्रम खडो हुवे माही,वो वाँ बातां कुं ले जोवे ।**
**जे कहुं सुणी माहे कम इधकी,तो मन खुसी न होवे ।।१२२।।**

शिष्याला अस्सल सतगुरु प्रत्यक्षात मिळून जातात.शिष्याने साधुं कडून सतगुरुच्या परिक्षेची काही वेगळ्याच गोष्टी ऐकलेल्या असतात याकारणाने हे सतगुरु अस्सल सत्ताधारी आहे किंवा खोटेच सत्ताधारी आहे असे सांगत आहे हा शिष्यात भ्रम उभा राहून जातो.याकारणाने अशा सत्ताधारी सतगुरुला धारण करण्यात मन खुश राहत नाही मनात खुशी राहत नाही याकरीता सत्ताधारी सतगुरु मिळूनही शिष्य धारण करीत नाही. ।।१२२।।

**चिज सकळ की सोभा जग मे,कम जाफा सुण होई ।**
**जाको सुणो अरथ ओ कहिये,भेद बताऊं तोई ।।१२३।।**

शब्दांमध्ये सर्व वस्तुंचे वर्णन करते वेळी कमी–जास्त होतच राहते ज्याचा भेद घडलेल्या गोष्टींनी समजवितो.।।१२३।।

**मेहमा सुणर करे जे सोभा, घट बध व्हेत बावे ।**
**कोई चिज की सुण लो जग में, इऊँ सब पुराण कवावे ।।१२४।।**

वस्तुची महिमा ऐकून जे शोभा करतात त्या वर्णनात वस्तुचे गुण कमी–जास्तच सांगितले जाते हे पुराणा साारख्या वस्तुत ही झाले आहे.पुराण खरे सांगणे चाहतो व जगाचे पंडित त्याला काय समजतात हे पुराणाच्या दाखल्यावरुन समजमध्ये येईल. ।।१२४।।

चार सिलोक सांभळे ब्रम्हा, चारू बेद बणाया ।
सो मत सुणो ब्यास नारद सु, पुराण अठारूँई गाया ।।१२५।।

ब्रम्हाने चार श्लोक ऐकले आणि त्या चार श्लोकांच्या आधारावर चार मोठ-मोठे वेद बनवले हे वेदांचे ज्ञान नारदाने धारण केले आणि वेद व्यासाला ऐकवले वेद व्यासाने, नारदाने ऐकवलेल्या ज्ञानाच्या आधाराने जितके समजमध्ये आले,त्याचा आधार पकडून मोठ-मोठे अठरा पुराण सांगितले.।।१२५।।

साधु रिख बोलिया जग में,ब्यास बुध ले भाई ।
कथा किरतन डिंगळ पिंगळ, बक्या ब्होत जग माई ।।१२६।।

वेद व्यासाकडून ज्ञान ऐकून साधु,ऋषींनी आपल्या व्यासाच्या बुध्दीनुसार जगाला समजावले व्यासाच्या बुध्दीचे समजवाले साधु आणि ऋषी गेल्यानंतर अनेक साधुंनी पुराणांमध्ये कथा किर्तन सुरु ठेवले काही साधुंनी पुराणाच्या कथा किर्तनात इकडच्या तिकडच्या डिंगल-पिंगल जोडून नाना प्रकारे पुराण जगाला सांगितले.।।१२६।।

इतना कहो किणे ब्रम्ह देख्यो,सुण सुण सोभा किवी ।
जेसी मती बुध थी एसी,सो सो खेंचर लिवी ।।१२७।।

आता मला इतके सांगा की ज्या-ज्या साधूंनी पुराणाला ऐकून-ऐकून आपल्या आपल्या समजने पुराणाला समजले यांच्यामधून कोणी(पारब्रम्ह)पाहिला साधुंची जशी-जशी मती आणि बुध्दी होती तसे-तसे पारब्रम्हला ताणून समजले खरी पारब्रम्हची विधी समजमध्ये आली नाही याकारणाने या साधुंनी पारब्रम्ह प्राप्त केला नाही. ।।१२७।।

चोर हरप जिण बोल्या पेली,सो ब्रम्ह रीत पिछाणो ।
पीछे सकळ सुण सुण गायो,जे कुछ भेद न जाणे ।।१२८।।

पहिल्यांदा चार श्लोक ज्याने बोलले त्याच्याच जवळ(पारब्रम्ह)ब्रम्ह ओळखण्याची खरी रीत होती मागे ब्रम्हापासून नारद,वेदव्यास,साधु,ऋषी,डिंगल-पिंगल कथा करणारे एकाला ही(पारब्रम्ह)ब्रम्हची रीत मिळाली नाही कारण ब्रम्हापासून नारद,वेदव्यास,साधु,ऋषींनी, सर्वांनी ब्रम्हला ऐकून ऐकून गायले खरे तर तो ब्रम्ह कसा आहे?याचा भेद याच्यातील कोणीही जाणला नाही. ।।१२८।।

मुळ बस्त ज्याँ देखी जग मे,वे केबत ना माने ।
यूं ब्रम्ह जीकाँ देखियो संत,बेद सें झूट बखाणे ।।१२९।।

मूळ ब्रम्ह वस्तु ज्याने पाहिली ते ऐकून ऐकून सांगून गेले असे चार वेद आणि पुराण मानत नाही याकारणाने ज्या संताने ब्रम्ह पाहिला आहे तो भेद,पुराण,शास्त्रला खोटे म्हणतात कारण वेद,शास्त्र,पुराण ऐकल्याने पारब्रम्ह ब्रम्ह आयुष्यभर ही पचून गेले तरी ही मिळणार नाही. ।।१२९।।

भोळो सकळ क्हेण गेहे राखे,मूळ मिल्याई नही चावे ।
जीऊं लड़का गेवर कर खेले,देख्याँ सब भग जावे ।।१३०।।

भोळ्या लोकांनी अशा ब्रम्हा,नारद,वेदव्यास,साधु ऋषींनी सांगितलेल्या ज्ञानाला पकडून ठेवले आहे हे भोळे लोक या सांगितलेल्या ज्ञानाचे मुळ ब्रम्हचे ब्रम्हज्ञानीच्या मिळाल्या–वरही त्याच्यापासून ब्रम्हज्ञान धारण करु इच्छित नाही जसे बालक माती,प्लॉस्टीक, लाकडा पासून बनवलेल्या हत्ती सोबत खेळतो,परंतु खरा हत्ती समोर आला तर तो त्याला पाहून घरात पळून जातो,पहायला बोलवल्यावरही बाहेर येत नाही. ।।१३०।।

एसी मत सकळ पिंडताँ की,बाळक रूपी होई ।
केबत पकड़ करी याँ गाढ़ी, मुळ न चिने कोई ।।१३१।।

अशाचप्रकारे पंडित पारब्रम्ह ब्रम्हला वेदांमध्ये पुराणांमध्ये शोधतात परंतु खरा ब्रम्हज्ञानी मिळाला तर त्याच्याकडून ब्रम्हज्ञान धारण करीत नाही जसे बालक खऱ्या हत्तीला सोडून देतो तसे हा पंडीत खऱ्या ब्रम्हज्ञानीला भेटल्यावरही त्यागून देतो या पंडितांनी ज्ञानी,ध्यानींनी ब्रम्हा,वेदव्यासाने सांगितलेल्या ज्ञानाला आपल्या बुध्दीमध्ये पक्के पकडून ठेवले आहे या कारणाने जे मूळ पारब्रम्ह ब्रम्हचे ज्ञान आहे ते समजू शकत नाही. ।।१३१।।

मुळ बस्त जिण जन ने पाई,तिन ने अे नहीं माने ।
ज्यूं लड़का गेवर सुं भागे, यूं अे निंद्या ठाणे ।।१३२।।

मूळ पारब्रम्ह ब्रम्ह ज्यांनी–ज्यांनी प्राप्त केले अशा संताला हे पंडित,ज्ञानी,ध्यानी जग मानत नाही जसे बालक खऱ्या हत्तीला बघुन पळून जातो तसे खरे ब्रम्हज्ञानी संत न समजल्यामुळे अशा संतांना त्यागून देतो आणि अशा संतांची महिमा करण्याच्या जागी खोटी निंदा करतो. ।।१३२।।

ब्रम्ह लग इनकी बुध नाही, जे मोकुँ क्या जाणे ।
पूर्ण ब्रम्ह आद ही तिल भर, मो कुँ नाहे पिछाणे ।।१३३।।

असे पंडित,ज्ञानी,ध्यानींची बुध्दी ब्रम्हलाही समजण्याची नाही तर ते मला काय ओळखतील?पूर्ण ब्रम्ह स्वत: हा ही मला तिळभर ही जाणत नाही तर हे मायेचे पंडित, ज्ञानी,ध्यानी मला काय जाणतील? ।।१३३।।

जे आ बात सुणे नर कोई, मान सके नहीं भाई ।
तो दिष्टांग बताऊँ जग में, प्रगट कहुं म्हे लाई ।।१३४।।

माझी गोष्ट पंडित,ज्ञानी,ध्यानी या कोणीही ऐकली तरी ही मानू शकत नाही यावर जगाचा एक प्रगट दृष्टांत सांगतो.।।१३४।।

जीऊं माँ बाप जग मे दोई,सूत्त बित्त नार कहावे ।

ज्हाँ बेराग ऊपणो ताँ कुं,सोई कुळ तज बन जावे ।।१३५।।

जसे संसारात कोणाला आई आणि वडिल आहे व सोबत पत्नी,पुत्र तसेच धन भरपूर आहे काही कारणाने त्याला वैराग्य उत्पन्न होते तर तो कुळ न कुळाचे आई,वडिल, पत्नी,पुत्र,धन सर्वांना सोडून वनात चालला जातो यामुळे त्या वैराग्याची संसाराची उपत खपत तसेच गृहस्थीपण मिटून जाते.।।१३५।।

यूं सतस्वरूप चीनीया,माया ब्रम्ह पणो सब जावे ।
ओपत खपत काहे कुं होती,जीव ब्रम्ह क्यूँ कवावे ।।१३६।।

अशाचप्रकारे जीवाने सतस्वरुप वैराग्य प्राप्त केल्याने त्याच्या जीवाचे होणकाळी ब्रम्हपणा सर्व जातो जीवाला सतस्वरुप ब्रम्ह सारखी विज्ञान वैराग्य प्रकृती येते जीव आपल्या माया ब्रम्ह,आई-वडिलांना त्यागून देतो त्याच्यात सतस्वरुप ब्रम्हपणा आल्या कारणाने त्याची होणकाळाची उपत-खपत,जीवपणा हे सर्व संपून जाते जसे जगात आई-वडिल,मुलाच्या वैराग्य गुणाला समजत नाही अशाचप्रकारे संताच्या गुणाला माया आई व वडिल ब्रम्ह समजत नाही जर मुलाच्या सतस्वरुप वैराग्य स्थितीला जाणत होते,तर होणकाळाची उपत,खपत झालीच नसती आणि जीव व ब्रम्ह असे वेगवेगळ्या प्रकृतीचे हंस राहीले नसते सतस्वरुपी वैरागी प्रकृतीचे महासुखी राहीले असते.जसे जगाचे आई-वडिल आपल्या मुलाला संसाराचा उपज खपत मध्ये लावले नसते वैरागीचा शिष्य बनवून वैरागी बनविले असते अशाचप्रकारे होणकाळाचे आई-वडिल माया ब्रम्हला सतस्वरुपाच्या वैराग्य विज्ञानाचे सुख होणकाळाच्या कुळापेक्षा खुप जास्त आहे असे समजत होते तर माया ब्रम्ह आई-वडिल हंसाला त्रिगुणी माया जीव किंवा होणकाळ पारब्रम्हचे ब्रम्ह होऊच देत नव्हते फक्त सतस्वरुपी विज्ञानी वैरागी बनू देत होते अशाचप्रकारे माया आई ब्रम्ह वडिल हे माझ्या सतस्वरुप विज्ञान वैराग्याला तीळमात्र ही जाणत नाही हे सर्व जगाचे लोक समजा असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।१३६।।

एक ओर दिष्टंग बताऊँ,ब्रम्ह घटो घट होई ।
बेद पाठ पढियाँ बिन राजा,रंक न बोले कोई ।।१३७।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज ज्ञानी,ध्यानी,पंडितांना एक दृष्टांत देऊन सांगत आहेत की,ब्रम्ह तर प्रत्येक घटात आहे ब्रम्ह राजाच्या घटात आहे ब्रम्ह रंकच्या घटात आहे ब्रम्हज्ञानीच्या घटात आहे राजाला व रंकला संसारातील सर्व उद्योग करता येतात परंतु वेदाचे ज्ञान येत नाही वेदाचे ज्ञान ज्ञानीलाच येते.।।१३७।।

अकल वान बळवान सुर्वो, बादस्या लग भाई ।
बेद पढयाँ बिन बोल न सके, इऊं कुद्रत हे काई ।।१३८।।

अक्कलवान,बलवान,शुरवीर तसेच सर्व खंडाचा बादशहा ही राहीला तरी ही वेद शिकल्या शिवाय त्या बादशहाला वेदाचे ज्ञान येत नाही अशाचप्रकारे ही कुद्रतकला आहे चतुर हूनही चतुर ज्ञानी,ध्यानी,पंडित,ब्रम्हा,नारद,वेदव्यास,ऋषी,मुनी,साधु सर्वां मध्येच ब्रम्ह आहे आणि तोच ब्रम्ह सतगुरुमध्ये आहे जसे चतुर बादशहाला वेदाचे ज्ञान प्राप्त होत नाही तसेच या चतुर ज्ञानी,ध्यानी,पंडित,ब्रम्हा,नारद,वेदव्यासाला कुद्रतकला प्राप्त होत नाही त्याकरीता सत्ताधारी सतगुरु पासून सतज्ञान धारण करावे लागते. ।।१३८।।

**अेक ओर दिष्टांग बताऊँ, पिंडत बेद सरावे ।**
**मूढ ने सुणत बिज्ञान ऊपणो, वो वें घर छोड़ न जावे ।।१३९।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज जगातील विज्ञानीचा दृष्टांत जगातील स्त्री-पुरुषांना सांगतात जसे चतुर राईट बंधुला विमानाचे विज्ञान उपजले होते त्याचप्रकारेचे विज्ञान एखाद्या मुर्ख मनुष्याला उपजते तो मनुष्य त्याच विज्ञानाची आधी खुप प्रशंसा करतो परंतु उपजल्यावर समजत नाही उलट त्या विज्ञानाला भ्रम समजून सोडून देतो अशाच प्रकारे पंडित,ज्ञानी सतस्वरुपाची प्रशंसा करतात परंतु सतस्वरुप मिळाल्यावर भ्रम समजून त्यागून देतात.।१३९।

**इऊँ ब्रम्ह सुणो संत कऊ जाणे, धार सक्के नहीं कोई ।**
**ज्यूं बिग्यान समझकर सत बिन, पच पच मुवा न होई ।।१४०।।**

अशाचप्रकारे जगाचे ज्ञानी,ध्यानी,पंडित यांच्यातील एखादा संत सतस्वरुपी विज्ञानीला जाणतो परंतु विज्ञानाची खरी समज नसल्याने त्या सतस्वरुपी विज्ञानाला त्यागुन देतो आणि अन्य मायेच्या करण्यांमध्ये ब्रम्हज्ञानात पचून-पचून मरुन जातो.।।१४०।।

**अेक ओर दिष्टांग सुणाऊँ,सुणो सकळ अर---**

।। इति अगाध बोध ग्रंथ अपूर्ण ।।